सोलापूर तरुण भारत
Solapur Tarun Bharat
न मे कर्मफले स्पृहा
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर | शनिवार, ०१ फेब्रुवारी २०२५ | वर्ष दुसरे | अंक ३०७ | पाने : ८ | किंमत रु. ६/- | www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

CIN: U36911PN2017PLC173262

हिऱ्यांच्या दागिन्यांच्या घडणावळीवर
100% पर्यंत सूट
16 फेब्रुवारी पर्यंत
*नियम व अटी लागू
REVA DIAMONDS
पु. ना. गाडगीळ आणि सन्स १८३२
सोने | चांदी | रत्ने
www.pngadgilandsons.com | www.onlinepng.com
पोलीस लाईन समोर, राम नगर, धाराशिव – ७८८७८ ९९८७०
सुभाष रोड, बीड ७७९६६ ९९३११
बसमत रोड, परभणी ८६६९६ ०३१७६
ग्राउंड फ्लोअर, हॉटेल मातोश्री शिर्डी – ९६५७० ०१६६९

# विकसित भारत२०४७ च्या संकल्पूर्तीसाठी पायाभूत सुविधा क्षेत्रात खाजगी सहभागाचे महत्त्व आर्थिक पाहणी अहवालातून अधोरेखित

नवी दिल्ली : केंद्रीय अर्थ आणि कॉर्पोरेट व्यवहार मंत्री निर्मला सीतारामन यांनी आज संसदेत आर्थिक पाहणी अहवाल २०२४-२५ सादर केला. भारताला उच्च विकास दर कायम राखण्यासाठी पुढच्या दोन दशकांमध्ये पायाभूत सुविधांच्या गुंतवणुकीत सातत्याने वाढ करत राहण्याची गरज आहे, असे त्यांनी हा अहवाल सादर करताना सांगितले.



केंद्र सरकारने गेल्या पाच वर्षांत देशभरात भौतिक, डिजिटल आणि सामाजिक पायाभूत सुविधांची उभारणी करण्यावर प्रामुख्याने भर दिला, असे या आर्थिक पाहणी अहवालात म्हटले आहे. पायाभूत सुविधांवरील सार्वजनिक खर्चात वाढ, मंजुरी आणि अंमलबजावणीतील अडथळे दूर करण्यासाठी संस्थांत्मक व्यवस्थांची निर्मिती आणि संसाधने वापराच्या सुनियोजनासाठी नवोन्मेषाधारीत पद्धती, असे अनेक बहुआयामी पैलू सरकारच्या या प्रयत्नांसोबत जोडलेले असल्याचे या अहवालात नमूद केले आहे. विकसित भारत२०४७ च्या संकल्पूर्तीच्या गरजांनुसार देशभरातील पायाभूत सुविधांमध्ये सुधारणा घडवून आणण्याच्या दृष्टीने असलेल्या गरजा पूर्ण करण्यासाठी केवळ सार्वजनिक भांडवल पुरेसे ठरणार नाही, असेही या अहवालात अधोरेखित केले गेले आहे.

भारताला पायाभूत सुविधा विकासाच्या प्रक्रियेत खाजगी क्षेत्राचा वाढता सहभाग राहील, याची सुनिश्चिती करण्याची गरज आहे. यादृष्टीने प्रकल्पांची संकल्पना आखण्याच्या त्यांच्या क्षमतेत सुधारणा घडवून आणण्याची, तसेच जोखीम पत्कारण्यासह महसूल वाटणी पद्धती, करारांचे व्यवस्थापन, संघर्षांचे निवारण आणि प्रकल्पांची समाप्ती, अशा सर्व प्रक्रिया आणि घटकांवरचा त्यांचा विश्वास वाढेल, यासाठी प्रयत्न करणे आवश्यक असल्याचेही या अहवालात नमूद केलेले आहे. यादृष्टीने केंद्र सरकारकडून केल्या जाणारे प्रयत्न, हे देशभरातील पायाभूत सुविधांमध्ये सार्वजनिक-खाजगी भागीदारीच्या गरजेपोटीच केले जात असल्याचे सर्वांनी मनापासून मान्य केले असून अशा प्रयत्नांना पाठबळ देण्याची गरज असल्याचे या अहवालातून व्यक्त केले आहे. त्याचवेळी सरकारच्या अशा प्रयत्नांना खाजगी क्षेत्रानेही प्रतिसाद देण्याची गरज असल्याचे या पाहणी अहवालात स्पष्ट केले गेले आहे.

खाजगी क्षेत्राचा सहभाग वाढविण्यासाठीच्या धोरण आखणीमध्ये संबंधित विविध स्तरांवरील सरकारे, वित्तीय बाजारातल्या दिग्गज संस्था आणि व्यक्तिमत्वे, प्रकल्प व्यवस्थापन तज्ञ आणि नियोजनतज्ञ तसेच स्वतः खाजगी क्षेत्र, अशा सर्व भागधारकांच्या समन्वित कृतीची आवश्यकता असल्याचेही या अहवालात म्हटले आहे. प्रकल्पांची संकल्पना आखण्याच्या क्षमता तसेच जोखीम आणि महसूल वाटप, करारांचे व्यवस्थापन-संघर्ष निराकरण आणि प्रकल्प समाप्ती यांसारख्या टप्प्यांसाठी क्षेत्रनिहाय नवोन्मेषाधारीत धोरणांची आखणी करणे, अशा प्रत्येक बाबतीत मोठ्या प्रमाणात आणि शाश्वत सुधारणांची गरज असल्याचेही या अहवालात नमूद केले आहे.

आर्थिक वर्ष २०२५ च्या पहिल्या तिमाहीत देशात सार्वत्रिक निवडणुकांसाठी आदर्श आचारसंहिता लागू होती. त्यामुळे या काळात प्रमुख पायाभूत सुविधा क्षेत्रातील केंद्र सरकारच्या भांडवली खर्चाच्या गतीवर विपरीत परिणाम झाल्याचेही या अहवालात म्हटले आहे. गेल्या हंगामात पर्जन्यमानाचा कल अनपेक्षितरित्या अनियमित होता, त्यामुळेही अनेक कामांची गती मंदावल्याचेही या अहवालात म्हटले आहे. या कारणांमुळे आर्थिक वर्ष २०२५ च्या पहिल्या तिमाहीच्या कामगिरीची वर्षनिहाय तुलना योग्य ठरणार नसल्याचे या अहवालात नमूद केले आहे. देशात निवडणूक प्रक्रिया पार पडल्यानंतर जुलै ते नोव्हेंबर २०२४ या काळात भांडवली खर्चात वाढ झाली. तसेच चालू आर्थिक वर्षाच्या उर्वरित महिन्यांमध्ये पायाभूत सुविधा क्षेत्रातील भांडवली खर्चाला आणखी गती मिळेल, अशी शक्यताही या अहवालात वर्तवली गेली आहे. एप्रिल ते नोव्हेंबर २०२४ या कालावधीत पायाभूत सुविधा क्षेत्राशी संबंधित मंत्रालयांनी भांडवली खर्चासाठीच्या अर्थसंकल्पीय तरतुदीपैकी सरासरी ६० टक्के इतका खर्च केला असल्याचे या अहवालात म्हटले आहे. आर्थिक वर्ष २०२० मध्ये ज्यावेळी १७ व्या लोकसभेसाठी निवडणुका पार पडल्या होत्या, त्या कालावधीच्या तुलनेत ही प्रगती सकारात्मक असल्याचे या पाहणी अहवालात म्हटले आहे.

अनेक प्रकल्प मार्गी लागण्यात येणारे अडथळे दूर करण्यासाठी तसेच प्रकल्प सुरळीत व्हावेत यासाठीच्या सुविधा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने केंद्र सरकारने नॅशनल इन्फ्रास्ट्रक्चर पाईपलाईन, नॅशनल मॉनिटायझेशन पाईपलाईन आणि प्रधानमंत्री-गती शक्ती यांसारख्या अनेक यंत्रणा स्थापन केल्या आणि त्यात आजवर मोठी प्रगती घडून आली आहे, असेही या अहवालात म्हटले आहे. वित्तीय बाजार नियामकांनी देखील खाजगी क्षेत्राच्या सहभागाला प्रोत्साहन देण्यासाठी सुधारणा सुरू केल्या असल्याचेही या अहवालात म्हटले आहे. अशा सर्व प्रयत्नांनंतरही अनेक प्रमुख क्षेत्रांमध्ये खाजगी उद्योगांचा सहभाग मर्यादित असल्याचे निरीक्षणही या आर्थिक पाहणी अहवालात मांडले गेले आहे.

# विकसित भारत हेच ध्येय : राष्ट्रपती

नवी दिल्ली : विकसित भारत हे आमचे ध्येय असल्याचे प्रतिपादन राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू (ऊीरिवळ चीीर्ळी) यांनी आज, शुक्रवारी केले. संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनापूर्वी त्या दोन्ही सभागृहांना संबोधित करताना बोलत होत्या.



याप्रसंगी राष्ट्रपती मुर्मू म्हणाल्या की, संसदेच्या या बैठकीला संबोधित करताना मला खूप आनंद होत आहे. दोन महिन्यांपूर्वीच, आपण संविधान स्वीकारल्याचा ७५ वा वर्धापन दिन साजरा केला आणि काही दिवसांपूर्वीच, भारतीय प्रजासत्ताकाने ७५ वर्षांचा प्रवास पूर्ण केला. हा प्रसंग लोकशाहीची जननी म्हणून भारताच्या वैभवाला नवीन उंची देईल. आज, माझे सरकार अभूतपूर्व कामगिरीद्वारे भारताच्या विकास प्रवासाच्या या अमृत काळाला नवीन ऊर्जा देत आहे. तिसऱ्या टर्ममध्ये, काम तिप्पट वेगाने केले जात आहे. आज, देशात मोठे निर्णय आणि धोरणे असाधारण वेगाने अंमलात आणली जात आहेत. देशातील ३ कोटी अतिरिक्त कुटुंबांना नवीन घरे देण्यासाठी प्रधानमंत्री आवास योजनेचा विस्तार करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यासाठी ५ लाख ३६ हजार कोटी रुपये खर्च करण्याची योजना आहे. आदिवासी समाजातील ५ कोटी लोकांसाठी धरती आबा आदिवासी ग्राम विकास अभियान सुरू करण्यात आले आहे. यासाठी ८० हजार कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. आयुष्मान भारत योजनेअंतर्गत, ७० वर्षे आणि त्याहून अधिक वयाच्या ६ कोटी ज्येष्ठ नागरिकांना आरोग्य विमा देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यांना दरवर्षी ५ लाख रुपयांचे आरोग्य विमा मिळेल असे राष्ट्रपतींनी सांगितले.

'माझ्या सरकारने तरुणांच्या शिक्षणावर आणि त्यांच्यासाठी नवीन रोजगाराच्या संधी निर्माण करण्यावर विशेष लक्ष केंद्रित केले आहे. उच्च शिक्षणासाठी गुणवंत विद्यार्थ्यांना आर्थिक मदत देण्यासाठी पंतप्रधान विद्या लक्ष्मी योजना सुरू करण्यात आली आहे. एक कोटी तरुणांना टॉप ५०० कंपन्यांमध्ये इंटर्नशिपच्या संधीही दिल्या जातील. त्या म्हणाल्या की, माझे सरकार महिलांच्या नेतृत्वाखाली म्हणजेच महिलांच्या नेतृत्वाखालील विकासावर देशाला सक्षम बनवण्यावर विश्वास ठेवते. नारी शक्ती वंदन कायद्याद्वारे लोकसभा आणि विधानसभांमध्ये महिलांना आरक्षण देणे हे या दिशेने एक महत्त्वाचे पाऊल आहे. राष्ट्रीय ग्रामीण उपजीविका अभियानांतर्गत ९१ लाखांहून अधिक बचत गटांना सक्षम केले जात आहे.

देशातील १० कोटींहून अधिक महिला याच्याशी जोडल्या गेल्या आहेत. बँक लिंकेजद्वारे त्यांना एकूण ९ लाख कोटी रुपयांपेक्षा जास्त रक्कम वितरित करण्यात आली आहे. आमच्या बँकिंग आणि डिजी पेमेंट सखी दुर्गम भागातील लोकांना वित्तीय व्यवस्थेशी जोडण्यात महत्त्वाची भूमिका बजावत आहेत. कृषी सखी नैसर्गिक शेतीला प्रोत्साहन देत आहेत आणि पशु सखींद्वारे आपले पशुधन अधिक मजबूत होत आहे. ड्रोन दीदी योजना महिलांच्या आर्थिक आणि तांत्रिक सक्षमीकरणाचे एक माध्यम बनली आहे. आज आपले तरुण स्टार्टअप्सपासून ते क्रीडा आणि अंतराळ या प्रत्येक क्षेत्रात देशाचे नाव उंचावत आहेत. माय भारत पोर्टलच्या माध्यमातून लाखो तरुण राष्ट्र उभारणीच्या कामात सामील होत आहेत. माझे सरकार राष्ट्रीय शिक्षण धोरणाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांसाठी आधुनिक शिक्षण व्यवस्था तयार करत आहे. कोणीही शिक्षणापासून वंचित राहू नये म्हणून, मातृभाषेत शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून दिल्या जात आहेत. १३ भारतीय भाषांमध्ये विविध भरती परीक्षा आयोजित करून भाषेतील अडथळे देखील दूर करण्यात आल्याचे राष्ट्रपतींनी नमूद केले.

# केरळमध्ये २७ बांगलादेशी घुसखोरांना अटक

कोच्ची : केरळच्या कोच्चीमध्ये बेकायदेशीरपणे राहणाऱ्या आणि काम करणाऱ्या २७ बांगलादेशी घुसखोरांना अटक करण्यात आली आहे. एर्नाकुलम जिल्ह्यातील उत्तर परवूर भागात एर्नाकुलम ग्रामीण पोलिस आणि दहशतवाद विरोधी पथकाने (एटीएस) केलेल्या संयुक्त कारवाईत या घुसखोरांना अटक करण्यात आल्याचे पोलिसांनी सांगितले. पोलिसांनी आज, शुक्रवारी ही माहिती दिली.

यासंदर्भात वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्याने सांगितले की, बांगलादेशी नागरिक पश्चिम बंगालमधील स्थलांतरित कामगारांच्या नावाखाली विविध ठिकाणी काम करत होते आणि अटक केलेल्यांची सविस्तर चौकशी सुरू आहे. सुमारे २ आठवड्यांपूर्वी तस्लिमा बेगम हिच्या अटकेनंतर एर्नाकुलम ग्रामीण जिल्हा पोलिस प्रमुख वैभव सक्सेना यांनी सुरू केलेल्या विशेष ऑपरेशन 'ऑपरेशन क्लीन'चा भाग म्हणून ही अटक करण्यात आली आहे. उत्तर परवूरमध्ये बांगलादेशी नागरिक राहत असल्याची माहिती मिळाल्यानंतर, एर्नाकुलम ग्रामीण पोलिसांच्या पथकाने एटीएसच्या मदतीने शोध घेतला, असे एका अधिकाऱ्याने सांगितले. त्यांनी सांगितले की त्यांच्या कागदपत्रांची पडताळणी केली असता असे दिसून आले की ते बांगलादेशी नागरिक आहेत जे भारतात बेकायदेशीरपणे राहत होते आणि स्वतःला भारतीय नागरिक असल्याचा दावा करत होते. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ते पश्चिम बंगालमधून सीमा ओलांडून आले होते, जिथे त्यांनी कोचीला पोहोचण्यापूर्वी एजंट्समार्फत आधार कार्ड आणि इतर कागदपत्रे मिळवली. ते विविध क्षेत्रात काम करत होते, काही कामगार छावण्यांमध्ये राहत होते. त्याच्या कारवायांचा पुढील तपास सुरू असल्याचे पोलिसांनी सांगितले.

# आजपासून महाराष्ट्रातील सगळ्या पोर्टवर आधार कार्ड अनिवार्य

## सागरी सुरक्षेच्या दृष्टीने मासेमारी करणाऱ्या प्रत्येक खलाशाकडे आधार कार्ड आणि मासेमारी नौकेचा नोंदणी क्रमांक आवश्यक

मुंबई : महाराष्ट्र राज्याची सागरी सुरक्षा अत्यंत महत्त्वाची असल्याने राज्यातील सागरी क्षेत्रात मासेमारीसाठी जाणाऱ्या प्रत्येक खलाशांकडे जठ उेवशव आधार कार्ड जवळ बाळगणे आवश्यक आहे. तसेच इंडियन मर्चट शिपिंग ॲक्टच्या, १९५८ मधील ४३५ (क) मधील तरतूदीनुसार व महाराष्ट्र सागरी मासेमारी नियमन अधिनियम, १९८१ व (सुधारीत २०२१) कलम ६ (४) नुसार भारतातील मासेमारी नौकेचा नोंदणी क्रमांक नौकेवर कायम स्वरूपी दिसेल असे रंगविणे आवश्यकच्या असल्याचे नमूद करण्यात आले आहे.

मत्स्यव्यवसाय व बंदरे विकास मंत्री नितेश राणे यांनी मत्स्यव्यवसाय विभागाला यासंबंधी निर्देश दिले होते. त्याअनुषंगाने सागरी सुरक्षेच्या दृष्टीने मासेमारी नौकेवरील प्रत्येक खलाशांने स्मार्ट कार्ड / ठठ उेवशव आधार कार्ड जवळ बाळगणे बंधनकारक राहील. नौकेचा नोंदणी क्रमांक नौकेच्या मागील (वरच्या) भागात दोन्ही बाजूने स्पष्टपणे दिसेल तसेच नौकेच्या केबीनच्या छतावर कोरून रंगविणे बंधनकारक राहील, असे निर्देश मत्स्यव्यवसाय विभागाचे आयुक्त यांनी दिले आहेत.

जिल्ह्यातील सर्व मच्छिमार सहकारी संस्थांना कळवून याबाबत सर्व मासेमारी नौका मालकांस अवगत करून खलाशांनी ठठ उेवशव आधार कार्ड अथवा स्मार्ट कार्ड जवळ बाळगणे, तसेच नौकेचा नोंदणी क्रमांक नौकेच्या मागील (वरच्या) भागात दोन्ही बाजूने स्पष्टपणे दिसेल, तसेच नौकेच्या केबीनच्या छतावर कोरून रंगविणे बाबतची कार्यवाही त्वरीत करण्यात यावी. सदर अटी-शर्तीची परिपूर्णता झाल्याशिवाय, कोणत्याही नौकेचा मासेमारी परवान्याचे नुतनीकरण व मासेमारी टोकन निर्गमित करु नये, अशा नौका ज्या नोंदणी क्रमांक व कलर कोडचे ठळक पणे प्रदर्शित करीत नाहीत व नौकेवरील खलाशांकडे, ठठ उेवशव आधार कार्ड अथवा स्मार्ट कार्ड आढळून येत नाहीत. अशा नौका मालकांवर महाराष्ट्र सागरी मासेमारी नियमन अधिनियम, १९८१ (सु-२०२१) अंतर्गत मासेमारी परवाना अटी-शर्तीचा भंग म्हणून मासेमारी परवाना रद्द करण्याबाबत नियमोचीत कार्यवाही करण्यात यावी व करण्यात आलेल्या कार्यवाहीचा अहवाल सादर करण्यात यावा, असे आदेश मत्स्यव्यवसाय आयुक्त किशोर तावडे यांनी दिले आहेत.

# सलग दुसऱ्यांदा भारतीय मुलींचा संघ १९ वर्षांखालील विश्वचषकाच्या अंतिम फेरीत



क्वालालंपूर : भारताच्या १९ वर्षांखालील मुलींच्या क्रिकेट संघाने सलग दुसऱ्यांदा विश्वचषकाच्या अंतिम फेरीत धडक मारली आहे. उपांत्य सामन्यात इंग्लंडने वीस षटकांत आठ बाद ११३ धावा केल्या. धावांचा पाठलाग करणाऱ्या भारताने पंधराव्या षटकातच उपांत्य सामना जिंकला. टीम इंडियाने नऊ गडी राखून इंग्लंडचा दणदणीत पराभव केला. मोठा विजय मिळवत भारताने दिमाखात विश्वचषकाच्या अंतिम फेरीत प्रवेश केला आहे.

नाणेफेक जिंकून इंग्लंडने फलंदाजीचा निर्णय घेतला. पण भारताच्या पारुनिका सिसोदियाच्या प्रभावी गोलंदाजीमुळे इंग्लंडची पुरती कोंडी झाली. भारताकडून पारुनिका सिसोदिया आणि वैष्णवी शर्माने प्रत्येकी तीन तर आयुषी शुक्लाने दोन बळी घेतले. इंग्लंडकडून डेविना पेरिनने ४० चेंडूत ४५ आणि ए. नोरग्रोव्हने २५ चेंडूत ३० धावा केल्या. जी. कमलिनी (५६ धावा) आणि गोंगडी तृषा (३५ धावा) यांनी भारताचा विजय सोपा केला.

आता १९ वर्षांखालील मुलींच्या टी २० विश्वचषकाच्या अंतिम सामन्यात भारत आणि दक्षिण आफ्रिका आमनेसामने असतील. हा सामना जिंकून विश्वचषकावर नाव कोरण्याची सुवर्णसंधी भारतीय संघाकडे आहे. याआधी २०२३ मध्ये भारताच्या १९ वर्षांखालील मुलींच्या क्रिकेट संघाने विश्वचषक जिंकला होता.

# धुळ्याचा चंद्रशेखर गवळी ठरला सुवर्ण पदकाचा मानकरी

धुळे : महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धेत धुळ्याचा उभरता मल्लयोध्दा चंद्रशेखर गवळी याने पहिल्यांदाच वरीष्ठ ८६ किलो वजन गटात सुवर्ण पदक पटकावले. हा क्षण तमाम धुळेकरांसाठी सुवर्णाक्षराने नोंदविणारा ठरला आहे. धुळ्याच्या क्रीडा इतिहासाच्या शिरपेचात आणखी एक 'सुवर्ण तुरा' खोवला गेला आहे. चंद्रशेखर गवळी यांच्या या सुवर्ण कामगिरीमुळे धुळ्यातील कुस्तीप्रेमींमध्ये आनंदाचे उधाण आले असून त्यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

प्रचंड क्षमता निर्माण केलेल्या चंद्रशेखर गवळीचे आता लक्ष्य हवे महाराष्ट्र केसरीचे. तो भविष्यात 'महाराष्ट्र केसरी'ही ओढून आणेल अशी अपेक्षा आणि सर्वशक्तिमान बजरंग यांना प्रार्थना करूयात. यापुर्वी जिल्ह्यातील अनेक पहेलवानांनी माती विभागातल्या विविध वजनी गटात सुवर्ण, रौप्य आणि रजत पदके मिळवली आहेत, त्या त्या क्षणांची आज चंद्रशेखर गवळी यांच्या यशामुळे आठवण ताजी झाली आहे.

धुळे शहर हे तसे खिलाडू आणि खेळाडूंच्या बाबतीत तसे नशीबवान आहे. कुस्ती आणि खो-खोची पंढरी म्हणून अवघ्या महाराष्ट्रात आणि अख्या भारतात प्रसिद्धीला आलेलं धुळे शहर आता चंद्रशेखर गवळी याने ८६ किलो वजन गटाच्या माती विभागात सुवर्ण पदक पटकावून पुन्हा एकदा चर्चेत आलं आहे. क्रीडा क्षेत्रात सातत्याने प्रसिद्धीच्या झोतात असलेल्या धुळे शहर आणि जिल्ह्यातील तमाम उमद्या कुस्तीगीरांना चंद्रशेखरच्या यशाने साहजिकच नवसंजीवनी मिळाली आहे.



धुळे जिल्ह्यातील अनेक मातब्बर पहेलवानांनी त्यांच्या कारकिर्दीत राज्यातल्या कुस्ती आखाड्यांमध्ये धूम केली आहे. राज्यातल्या नामवंत व्यायाम शाळेत सराव करणार्या भल्याभल्या मल्लांना माती चारून हे मल्ल धुळ्यात परतत असत. त्यांनी त्यांच्या कारकिर्दीत माती विभागात सुवर्ण पदके मिळविली आहेत. अशा मान्यवर सगळ्याच कुस्तीपटूंची नावे येथे उल्लेख करणे शक्त नसले तरी कुस्ती क्षेत्रात नवलौकिक केले ते राष्ट्रीय कुस्तीगीर संजय गिरी यांनी. राज्यातल्या नामांकित कुस्ती प्रशिक्षण केंद्रात कयेक वर्षे खुराक खाऊन गावरानी तूप पिणार्या मल्लांची कुस्ती संजय गिरी सोबत होणार म्हटलं,की अवघे स्टेडियम सुन्न. टाचणी पडली तर आवाज व्हावा एवढं शांत. सार्या हजार पाच हजार कुस्ती प्रेमी,रसिकांच्या आणि कॅमेर्यांच्या नजरा संजय गिरी यांच्या कुस्तीचे क्षण टिपण्या साठी सज्ज असायच्या.

तरीही अनेकदा अनेकांना संजय गिरीचा डाव कळण्याच्या आत प्रतिस्पर्धी मल्लाने आकाश पाहिलेले असायचे. अपवाद सोडला तर संजय गिरीने कधीही आपल्या पाठीला माती लागू दिली नाही. असेच शिवानंद (छोटू) सोनार, संजय कुटे, महेश बोरसे आणि अन्य काही गिनेचुने मल्लही धुळ्यातले लखलखते तारे ठरले होते. त्यांनी कुस्ती क्षेत्रातल्या काही वजन गटातली पश्चिम महाराष्ट्राची मक्तेदारी मोडून काढली आणि त्या त्या काळात नवा इतिहास रचला. उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाला पहिले सुवर्ण मिळवून देणारे संजय गिरी आजही उमद्या कुस्तीगिरांसाठी कुशल प्रशिक्षकाच्या भूमिकेत असतात. संजय गिरी किंवा छोटू सोनार यांच्या सोबत ज्यांची कुणाची कुस्ती असायची त्यापैकी अनेक प्रतिस्पर्धी आपल्याला मिळालेली फीत पायांना बांधतांनाच थरथरत.त्यांच्या हाताची बोटे थरथरली,की काही क्षणातच कुस्ती होईल असा अंदाज कुस्ती पाहणार्यांना येत असे. चंद्रशेखर गवळी असाच एक मल्ल आता धुळ्यात उदयाला आला आहे. त्याने अहिल्यानगर येथे सुरु असलेल्या महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धेत आपल्या ८६ किलो वजन गट माती विभागात दैदीप्यमान यश मिळविले आहे. आपल्या वजन गटातल्या प्रत्येक फेरीत प्रतिस्पर्ध्याला लोळवून चंद्रशेखरने सुवर्ण पदक मिळविले आहे. यामुळे धुळ्यातील पेठ भागातली एकनाथ व्यायाम शाळा चर्चेत आली आहे.

टीजेएसबी सहकारी बँक लिमिटेड. मल्टी-स्टेट शेड्युल्ड बँक
Bharose ka Bank Bhavishya ka Bank
ॲसेट बॅक्ड क्रेडिट
तुमच्या व्यवसायवृध्दीसाठी सदैव तत्पर
@9.25%* द.सा.पासून
कर्जाची रक्कम ₹ 1 कोटी* पर्यंत
वैयक्तिक / सर्व व्यावसायिक घटकांसाठी कर्ज
परतफेडीचा कालावधी कमाल 120 महिने*

*नियम व अटी लागू
www.tjsbbank.co.in
Toll Free : 1800 266 3466 / 1800 103 466

सोलापूर तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# आंतरराष्ट्रीय सहकार परिषद २०२५ अनुषंगाने जिल्हा बँकेत सहकार से समृध्दी या विषयावर कार्यशाळा

## २ फेब्रुवारी रोजी सहाकार दिंडीच्या स्वागताचे आयोजन

छत्रपती संभाजीनगर / प्रतिनिधी – आंतरराष्ट्रीय सहकार वर्ष २०२५ हे साजरे करण्यात येत आहे, त्या अनुषंगाने औरंगाबाद जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., छत्रपती संभाजीनगर, बँकेच्या मुख्य कार्यालयाचे सभागृहात मा. विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था छत्रपती संभाजीनगर व मा. जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था छत्रपती संभाजीनगर यांच्या संयुक्त विद्यमाने मा. विभागीय सहनिबंधक शरद जरे साहेब यांच्या अध्यक्षतेखाली सहकार से समृध्दी या विषयावर कार्यक्रम व कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. बँकेचे कार्यकारी संचालक अजय मोटे यांनी मा.विभागीय सहनिबंधक शरद जरे साहेब व उपस्थीत सर्व मान्यवरांचा सत्कार केला.

या प्रसंगी शहा मॅडम यांनी कार्यक्रमाचे सुत्र संचालन केले व मा. सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था पुणे यांनी आंतरराष्ट्रीय सहकार वर्ष २०२५ निमित्त १२ महीने विविध कार्यक्रम घेण्याचे आयोजीले आहे त्यानुसर पहिली सुरुवात औरंगाबाद जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या सभागृहात झाली, व सर्वप्रथम कार्यक्रमाची सुरुवात सहकार गीताने झाली या गीताचे गायन वैजापुर मर्जट बँकेच्या सुचिता लाहोटी मॅडम यांनी सहकार गीत सादर केले. याप्रसंगी देवगीरी नागरी सहकारी बँकेचे अध्यक्ष किशोर शितोळे, वर्धमान नागरी बँकेचे शांतीलाल सिंघवी, सहकार भारतीचे संभाजी राचुरे यांनी केंद्र शासनाचे सहकार बाबतचे धोरण याअनुषंगाने केंद्रिय सहकार मंत्री अमितजी शहा यांच्या सुचना व सहकार क्षेत्रातील मोठ्या सहकारी संस्थांनी लहान सहकारी संस्थांना द्यावयाची साथ व सहकार्य याबाबत मार्गदर्शन केले, त्यानंतर मा. विभागीय निबंधक शरद जरे साहेब यांनी उपस्थितांचे सहकार बाबतचे मत व सुचना जानुन घेऊन त्यानंतर सामान्यांसोबत विविध माध्यमातुन सहकार हे कसे जोडले गेलेले आहे. सहकार हे शासकीय काम न रहता जनमानसाची चळवळ झाल्याचे अनेक उदाहरणे दिली व केंद्र शासनाकडुन सहकार विभागासाठी असलेले धोरणा बाबत उपस्थितांना मार्गदर्शन केले. सक्षम सहकारी संस्थांनी आपल्या सोबतच्या नविन व इतर सहकारी संस्थांसमवेत नियमीत संपर्क ठेऊन कशा प्रकारे पोषक वातावरण तयार करता येईल हे पाहीले गेले पाहीजे अशी अपेक्षा व्यक्त करुन दि.२ फेब्रुवारी २०२५ रोजी सर्वांनी मुकुंदवाडी ते रेल्वे स्टेशन रोडवरील भानुदासराव चव्हाण सभागृह यामार्गावरील सहकार दिंडीत सायंकाळी ६ वाजता मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आव्हान मा. विभागीय निबंधक शरद जरे साहेबांनी केले. औरंगाबाद जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँके तर्फे मा.अध्यक्ष, मा.उपाध्यक्ष व सर्व संचालक मंडळ यांच्या मार्फत सर्व नागरीकांना बँकेच्या सर्व सभासद, खातेदार यांना दि.२ फेब्रुवारी २०२५ रोजीच्या सहकार दिंडीत सर्वांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आव्हान केले. या प्रसंगी जिल्हा विषेश लेखा परिक्षक काकडे साहेब, देवगीरी बँकेचे किशोर शितोळे, वर्धमान नागरी बँकेचे शांतीलाल सिंघवी, सहकार भारतीचे संभाजी राचुरे, जिल्हा बँकेचे कार्यकारी संचालक अजय मोटे, सरव्यवस्थापक अण्णासाहेब बडेकर उपस्थित होते. रोडगे साहेब, सहाय्यक उपनिबंधक यांनी उपस्थीत मान्यवर, सहकार संस्थांचे पदाधिकारी व कर्मचाखांचे आभार मानले.

## ॲमेझॉन एमएक्स् प्लेयर' मनोरंजनाचे भवितव्याचे दर्शन घडविणार

नाशिक : ॲमेझॉन एमएक्स प्लेयर्स– स्ट्रीमनेक्स्ट इव्हेंटच्या पहिल्या आवृत्तीत सर मार्टिन सोरेल, बेनेडिक्ट इव्हान्स आणि मनोरंजन उद्योगातील प्रमुख व्यक्ती ग्लोबल मार्केटिंग लिडर म्हणून सहभागी झाले. या झगमगत्या कार्यक्रमात भारतीय प्रेक्षकांकडून पाहिल्या जाणाऱ्या कंटेंटचे विकसित होणारे परिदृश्य आणि मजबूत त्याचप्रमाणे संस्मरणीय ब्रँड तयार करण्यासाठी ॲमेझॉन एमएक्स प्लेयर जाहिरातदारांसाठी कसे परिवर्तनशील भागीदार बनत आहेत हे दर्शविले गेले. बॉबी देओल (आश्रम ३), सुनील शेट्टी आणि जॅकी श्रॉफ (हंटर २), रेमो डिसोझा आणि मलायका अरोरा (हिप हॉप इंडिया २), अशनीर ग्रोवर (राइज अँड फॉल) आणि इतरांच्या चमकदार भूमिकांमध्ये, ॲमेझॉन एमएक्स प्लेयरने २०२५ साठी १०० हून अधिक नवीन कार्यक्रमांचा उल्लेखनीय गुच्छ सादर केला.ॲमेझॉन ॲडस् इंडियाचे प्रमुख गिरीश प्रभू म्हणाले, ॲमेझॉनच्या कोट्यवधी ग्राहक संकेतांचा लाभ घेणाऱ्या जाहिरात तंत्रज्ञानासह ॲमेझॉन एमएक्स प्लेयरची विशाल व्याप्ती एकत्र आणणे हा आजच्या संमेलनाचा हेतू आहे. यामुळे केवळ ॲमेझॉनवर विक्री करणाऱ्या सर्व ब्रँडनाच नव्हे, तर भारतातील २५ कोटींहून अधिक अद्वितीय वापरकर्त्यांपर्यंत संबंधित जाहिराती पोहोचविणे आणि वितरित करण्यासाठी सक्षम करण्याबद्दल आहे. हे थेट फनेलच्या अगदी वरच्या भागापासून अगदी तळापर्यंतचे परिणाम मोजण्याबद्दल आहे. संपूर्ण फनेल जाहिरात क्षेत्र इथे आहे!

## रस्ता सुरक्षा जागरूकता मोहिमेचे आयोजन

अहमदनगर : रस्ता सुरक्षेप्रती अविरत कटिबद्धता दाखवत होंडा मोटरसायकल अँड स्कूटर इंडिया (एचएमएसआय)ने आज अहमदनगर, महाराष्ट्र येथे रस्ता सुरक्षा जागरूकता मोहिमेचे आयोजन केले. या उपक्रमाने आर्मी पब्लिक स्कूलमधील २६०० हून अधिक विद्यार्थी व कर्मचारीवर्गामध्ये जनजागृती केली, ज्यामधून तरूणांना रस्त्यावर जबाबदारीने वागण्याबाबत प्रेरित करण्याप्रती एचएमएसआयची समर्पितता अधिक दृढ झाली. सुरक्षित वाहतूक वातावरणाला आकार देण्यामध्ये तरूण बजावणाऱ्या महत्त्वपूर्ण भूमिकेला ओळखत एचएमएसआयने सर्वसमावेशक व परस्परसंवादात्मक प्रोग्राम्सच्या माध्यमातून रस्त्यावर सुरक्षितता बाळगण्याची सवय बिंबवण्यासाठी मोहिमेची रचना केली. शाळा, महाविद्यालये आणि सरकारी व गैर-सरकारी संस्थांमध्ये असे उपक्रम नियमितपणे राबवत एचएमएसआय रस्त्यावरील अपघात मोठ्या प्रमाणात कमी करण्याचा आणि रस्त्यावर जबाबदारीने वागण्याच्या संस्कृतीला चालना देण्याचा प्रयत्न करते. या मोहिमा रस्ता सुरक्षा जनजागृतीसाठी गरजेची पूर्तता करतात आणि विशेषत: तरूण राइडर्समध्ये जबाबदार ड्रायव्हिंग सवयी बिंबवण्याचा प्रयत्न करतात.

# महाराष्ट्र दोन सुवर्ण पदकांपासून एक पाऊल दूर

## उपांत्य फेरीत दिल्ली व प. बंगालवर दणदणीत विजय

### ३८वी राष्ट्रीय क्रीडा स्पर्धा



हल्दवानी, क्री. प्र. ३१ : उत्तराखंडच्या हल्दवानी येथे सुरू असलेल्या ३८व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत महाराष्ट्राच्या महिला आणि पुरुष संघांनी दमदार प्रदर्शन करत अनुक्रमे दिल्ली व पश्चिम बंगालवर विजय मिळवत अंतिम फेरीत प्रवेश केला.

महिला गट: दिल्लीवर सहज विजय

महाराष्ट्राच्या महिला संघाने उपांत्य फेरीत दिल्लीचा एक डाव आणि ८ गुणांनी (२४-१६) पराभव केला. या सामन्यात महाराष्ट्राच्या विजयात प्रियंका इंगळे (२.४० मिनिटे संरक्षण, ६ गुण), अश्विनी शिंदे (२.४० मिनिटे संरक्षण), संपदा मोरे (२.३० मिनिटे संरक्षण), गौरी शिंदे (२ मिनिटे संरक्षण), रेश्मा राठोड (१.४० व १.२० मिनिटे संरक्षण, २ गुण), संध्या सुरवसे (२ मिनिटे संरक्षण) यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. दिल्ली संघाकडून लक्ष्मी ओझा (१.४० मिनिटे संरक्षण, २ गुण) आणि बबिता (६ गुण) यांनी चांगला खेळ केला, मात्र संघाचा पराभव टाळू शकल्या नाहीत.

पुरुष गट: पश्चिम बंगालवर मोठा विजय

महाराष्ट्राच्या पुरुष संघाने उपांत्य फेरीत पश्चिम बंगालचा १० गुणांनी (३२-२२) पराभव करत अंतिम फेरी गाठली. या सामन्यात शुभम थोरात (१.४० व २ मिनिटे संरक्षण, ६ गुण), रामजी कश्यप (१.५० व २.१० मिनिटे संरक्षण, ४ गुण), सुयश गरगटे (२ मिनिटे संरक्षण, ६ गुण), सौरभ आडावकर (१.५० मिनिटे संरक्षण, ६ गुण) यांनी उत्कृष्ट कामगिरी करत संघाच्या विजयात महत्त्वाची भूमिका बजावली. पश्चिम बंगालकडून कर्णधार सुमन बर्मन (१.४० मिनिटे संरक्षण), सुभाशिस (१.२० मिनिटे संरक्षण, ४ गुण) आणि अनुकूल सरकार (६ गुण) यांनी कडवी झुंज दिली, पण महाराष्ट्राच्या आक्रमक खेळासमोर त्यांचा प्रतिकार अपुरा ठरला.

सुवर्णपदकाच्या दिशेने महाराष्ट्राची मजल!

महिला आणि पुरुष दोन्ही संघांनी अंतिम फेरीत प्रवेश करत सुवर्णपदकाच्या दिशेने वाटचाल केली आहे. आता दोन्ही संघांकडून अंतिम सामन्यातही अशाच दमदार खेळीची अपेक्षा आहे.

# आ.अब्दुल सत्तार यांच्या पुढाकाराने सावळदबारा जि.प.सर्कल मधील मंजूर २ कोटींच्या विविध विकास कामांचे भूमिपूजन



तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.३१ जानेवारी

तालुक्यातील सावळदबारा जि.प.सर्कल मधील विविध गावात आ.अब्दुल सत्तार यांच्या पुढाकाराने मंजूर २ कोटी रुपयांच्या विविध विकास कामांचे भूमिपूजन आ.अब्दुल सत्तार यांच्याहस्ते संपन्न झाले.

सोयगाव तालुक्यातील विविध गावात पायाभूत सुविधांची कामे करण्यासाठी निधीची कमतरता भासू देणार नाही अशी ग्वाही आ.अब्दुल सत्तार यांनी यावेळी दिली. भूमिपूजन झालेली कामे गुणवत्तापूर्ण व निर्धारित वेळेत पूर्ण करण्याचे निर्देश आ.अब्दुल सत्तार यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले.या कामांचे करण्यात आले भूमिपूजन

आ.अब्दुल सत्तार यांचाहस्ते पिंपळवाडी येथे पिंपळवाडी - महालब्धा गावंतर्गत सिमेंट रस्ता करणे ३५ लक्ष, पिंपळवाडी येथे जि.प.प्रा.शाळा खोली बांधकाम करणे १२ लक्ष,सावळदबारा येथे ग्रामपंचायत ईमारत बांधकाम करणे २५ लक्ष,सावळदबारा येथे शादिखाना किचनशेड व स्वच्छतागृहाचे काम करणे १९ लक्ष,सावळदबारा येथे तलाठी भवन चे बांधकाम करणे २९ लक्ष,नांदा तांडा येथे गावंतर्गत सिमेंट रस्ता करणे १० लक्ष,नांदा तांडा येथे जि. प.शाळा खोली बांधकाम करणे १२ लक्ष,नांदा तांडा येथे गावंतर्गत पेव्हर ब्लॉक बसविणे १० लक्ष,नांदा तांडा येथे सिमेंट रस्ता करणे १० लक्ष,घाणेगाव येथे गावंतर्गत सिमेंट रस्ता करणे १० लक्ष, घाणेगाव येथे सिमेंट नाला बांध बांधणे १५ लक्ष असे जवळपास २ कोटी रुपयांच्या विकास कामांचे भूमिपूजन आ.अब्दुल सत्तार यांच्याहस्ते संपन्न झाले.याप्रसंगी शिवसेना उपजिल्हाप्रमुख प्रभाकर काळे कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती केशवराव पाटील तायडे उपसभापती दारासिंग चव्हाण,संचालक नंदकिशोर सहारे,लुकमान पठाण,माजी जि.प.सदस्य गोपीचंद जाधव, माजी सभापती धरमसिंग चव्हाण,शिवप्पा चोपडे,शिवसेना सोयगाव न.प.तील शिवसेना गटनेता अक्षय काळे, शिवसेना शहरप्रमुख संतोष बोडखे,कुणाल राजपूत,कदिर शहा,मुकुंद तळेले,विशाल चव्हाण,घाणेगाव सरपंच सुरेश चव्हाण,पिंपळवाडी सरपंच गंगाधर सदाशिवे,मोहन सुरडकर,सांडू तडवी,रमेश दुकानदार,कन्हीराम जाधव, भागवत जाधव,शांतराम कांडेलकर,शामीरखा तडवी, वासुदेव कांडेलकर, लहू राठोड, प्रवीण सपकाळ, तुकाराम राठोड, संजय चिखले, उत्तम बोरसे आदिंसह गावकरी उपस्थित होते.

# भारताच्या वाढीच्या प्रवासात ग्रामीण भारत खूपच महत्त्वाची भूमिका

## प्रियंका खंडेलवाल फंड व्यवस्थापक आयसीआयसीआय प्रुडेन्शिअल एएमसी



भारताच्या वाढीच्या प्रवासात ग्रामीण भारत खूपच महत्त्वाची भूमिका बजावत आहे, कारण आपल्या कामकरी वयातील लोकसंख्येचा मोठा भाग ग्रामीण भारतात राहतो. भारताची ६४ टक्के लोकसंख्या ग्रामीण भागांमध्ये राहते आणि भारताच्या एकूण राष्ट्रीय उत्पन्नात (जीडीपी) ग्रामीण अर्थव्यवस्थेचा वाटा सुमारे निम्मा आहे. गेल्या दहा वर्षात भारत सरकारने ग्रामीण भागातील राहणीमान उंचावण्यासाठी अनेक गुंतवणूका केल्या आहेत. या गुंतवणूकांमुळे आत्तापर्यंत अनेक लोक दारिद्र्यरेषेखालून रेषेवर आले आहेत. मात्र, सामाजिक कल्याणासाठी सर्व प्रकारे गुंतवणूक करूनही एकत्रित स्तरावरील ग्रामीण उत्पन्नाबाबत गेल्या काही वर्षांत फारशी प्रगती होऊ शकलेली नाही, कारण ग्रामीण भाग रोजगारासाठी खूप मोठ्या प्रमाणात कृषी क्षेत्रावर अवलंबून आहे.भारताने स्वातंत्र्य मिळाल्यापासून उत्पादन, बांधकामाशी निगडित रोजगार यांच्या जोरावर शेतीशी संबंधित रोजगारावरील अवलंबित्व कमी केले आहे. याला स्वयंरोजगाराचीही जोड मिळाली आहे. मात्र, गेल्या दहा वर्षांत शेतीव्यक्तिरिक्त अन्य रोजगार मिळवणाऱ्या लोकांच्या टक्केवारीत ठोस सुधारणा झाल्याचे दिसत नाही.

अर्थात, शेतीव्यक्तिरिक्त अन्य रोजगारांची स्थिती चांगली दिसत असल्यामुळे या दशकात ग्रामीण भारताची स्थितीही वेगळी असू शकते. भारतातील उत्पादन क्षेत्राला देशांतर्गत गरजा पुरवण्यासोबतच निर्यातीच्या दृष्टीने जे प्रोत्साहन दिले जात आहे, त्यामुळे शेतीव्यतिरिक्त अन्य रोजगारांच्या उपलब्धतेत सुधारणा होण्याची शक्यता आहे. रिअल इस्टेट चक्रामध्ये सुधारणा झाल्यामुळे बांधकामाशी निगडित रोजगाराची स्थिती अधिक चांगली दिसत आहे. कौशल्यविकास उपक्रम राबवण्यासाठी सरकार खूप प्रयत्न करत आहे. कौशल्यांचा विकास आपल्या मनुष्यबळाला शेतीव्यतिरिक्त अन्य नोकऱ्यांसाठी आणि स्वयंरोजगारासाठीही सज्ज करतो. 'लाडकी बहीण'सारख्या योजनांमार्फत सरकार घरगुती उत्पन्नाला आधार पुरवत आहे, त्यामुळे उपभोग आणि/किंवा बचत सुधारत असल्याचे आपल्याला दिसत आहे.

आमचा नुकताच आलेला आयसीआयसीआय प्रुडेन्शिअल रुरल ऑपॉर्च्युनिटीज फंड या वाढीच्या चालक घटकांचा लाभ घेण्याच्या दृष्टीने तयार करण्यात आला आहे. हा फंड ग्रामीण विकास व उपभोगाच्या विषयांवर आधारित आहे, परस्परविरोधी आणि रचनात्मक गुंतवणूक संधींमध्ये समतोल साधणारा आहे. ११ क्षेत्रे व ७५ समभागांना सामावणाऱ्या विविधीकृत निफ्टी इंडिया रुरल इंडेक्सचे अनुसरण हा फंड करतो. हा फंड विशिष्ट रचनात्मक विषयवस्तूंवर तसेच अपेक्षेपेक्षा कमी कामगिरी करणाऱ्या पण ग्रामीण वाढीला चालना देणारे घटक म्हणून संभाव्यता असलेल्या क्षेत्रांवर भर देतो. बहुक्षेत्रीय व लवचिक दृष्टिकोनासह उत्क्रांत होत असलेल्या ग्रामीण परिस्थितीतून वाट काढण्याचे तसेच शाश्वत, दीर्घकालीन मोबदला मिळवून देण्याचे उद्दिष्ट या फंडापुढे आहे. आयसीआयसीआय प्रुडेन्शिअल रुरल ऑपॉर्च्युनिटीज फंड म्हणजे, गुंतवणुकांचे एका आश्वासक प्रवाहात एकत्रीकरण करण्याच्या आणि समृद्ध ग्रामीण भारताच्या व्यापक दृष्टिकोनाशी जोडून घेण्याच्या दिशेने टाकलेले पाऊल आहे.

# जागतिक कर्करोग दिन: जनजागृती आणि प्रतिबंधाची आवश्यकता

दरवर्षी ४ फेब्रुवारी हा जागतिक कर्करोग दिन म्हणून साजरा केला जातो. या दिवसाचे आयोजन युनियन फॉर इंटरनॅशनल कॅन्सर कंट्रोल (UICC) या संस्थेद्वारे केले जाते. हा दिवस साजरा करण्यामागचा प्रमुख उद्देश म्हणजे कर्करोगाविषयी जागरूकता वाढवणे, प्रतिबंधात्मक उपायांची माहिती देणे आणि तज्ज्ञांकडून योग्य उपचारांची जाणीव करून देणे.

कर्करोग म्हणजे काय?

कर्करोग हा शरीरातील पेशींच्या अनियंत्रित वाढीमुळे होणारा एक घातक आजार आहे. शरीरातील कोणत्याही अवयवात हा रोग होऊ शकतो. कर्करोगाच्या ३०० पेक्षा जास्त प्रकारां ची नोंद आहे, त्यातील काही प्रामुख्याने आढळणारे प्रकार म्हणजे –

फुफ्फुसाचा कर्करोग,स्तनाचा कर्करोग,

यकृताचा कर्करोग,तोंडाचा आणि घशाचा कर्करोग,गर्भाशयाचा कर्करोग

पचनसंस्थेशी संबंधित कर्करोग.

कर्करोग होण्याची महत्वाची कारणे:

कर्करोग होण्यामागे अनेक कारणे असतात. ती अनुवंशिक, पर्यावरणीय, जीवनशैलीशी संबंधित आणि काही वेळा अज्ञात असू शकतात.

तंबाखू सेवन आणि धूम्रपान मुळे फुफ्फुस, तोंड, गळा आणि अन्ननलिकेच्या कर्करोगासाठी हे प्रमुख कारण आढळून आलें आहे.

अल्कोहोलचे अतिसेवन – यकृत, स्वादुपिंड आणि पचनसंस्थेशी संबंधित कर्करोग वाढवू शकते असे आढळून आले आहे.

अयोग्य आहार आणि स्थूलता – फास्ट फूड, प्रिझर्व्हेटिव्हयुक्त पदार्थ, जास्त साखर आणि तेल यामुळे कर्करोगाचा धोका वाढतो.

किरणोत्सर्ग आणि प्रदूषण – रेडिएशनचा जास्त संपर्क आणि हवेतील प्रदूषणामुळे कर्करोगाचा धोका वाढत असल्याचे आढळून आलें आहे.

अनुवंशिक कारणे – काही प्रकारचे कर्करोग आई-वडिलांकडून मुलांमध्ये आनुवंशिकतेने संक्रमित होतात.

संक्रमण आणि विषाणू – ह्युमन पॅपिलोमाव्हायरस (HPV) आणि हिपॅटायटिस बी, सी सारखे विषाणू कर्करोग होण्यास कारणीभूत ठरू शकतात.

लक्षणे आणि प्रारंभिक निदानाचे महत्त्व:

कर्करोगाची लक्षणे सुरुवातीच्या टप्प्यात ओळखली तर त्याचा प्रभावीपणे उपचार केला जाऊ शकतो. शरीराच्या कोणत्याही भागात गाठ किंवा सूज आढळणे,सतत खोकला आणि रक्तस्राव होणे अचानक वजन कमी होणे आणि भूक मंदावणे थकवा आणि अशक्तपणा येणे गिळताना त्रास होणे किंवा सतत अन्ननलिकेत वेदना होणे जर कोणतीही संशयास्पद लक्षणे आढळली, तर तत्काळ डॉक्टरांचा सल्ला घेणे गरजेचे आहे.

कर्करोगाचे निदान आणि उपचार पद्धती

कर्करोगाचे निदान विविध चाचण्यांद्वारे केले जाते, जसे की बायोप्सी, MRI स्कॅन, CT स्कॅन, रक्त तपासणी आणि झएढ स्कॅन.

उपचार पद्धती:

शस्त्रक्रिया (Surgery) – कर्करोगग्रस्त भाग काढून टाकणे. कीमोथेरपी (Chemotherapy) – औषधोपचारांद्वारे कर्करोगी पेशी नष्ट करणे. रेडिएशन थेरपी (Radiation Therapy) – किरणोत्सर्गाच्या सहाय्याने कर्करोगी पेशी नष्ट करणे. इम्यूनोथेरपी (Immunotherapy) – शरीराच्या रोगप्रतिकारशक्तीला वाढवून कर्करोगाशी लढा देण्यासाठी मदत करणे. होर्मोन थेरपी (Hormone Therapy) – स्त्री व पुरुषांच्या संप्रेरकांशी संबंधित कर्करोगांवर उपयोगी.

कर्करोग प्रतिबंधाचे उपाय

१. संतुलित आहार आणि जीवनशैली – ताजे फळे, भाज्या, प्रथिनयुक्त पदार्थ सेवन करावेत आणि जंक फूड टाळावे. २. धूम्रपान आणि मद्यपान टाळणे – यामुळे कर्करोग होण्याचा धोका लक्षणीयरीत्या कमी होतो. ३. नियमित आरोग्य तपासणी – कर्करोगाचे सुरुवातीच्या टप्प्यात निदान होण्यासाठी महत्त्वाचे. ४. व्यायाम आणि तणावमुक्त जीवन – योग आणि ध्यान केल्यास तणाव कमी होतो आणि प्रतिकारशक्ती सुधारते. ५. लसीकरण – HPV आणि हिपॅटायटिस बीच्या लसी घेतल्यास गर्भाशय आणि यकृताच्या कर्करोगाचा धोका कमी होतो.

भारत आणि कर्करोग: सद्यस्थिती

भारतामध्ये दरवर्षी सुमारे १४ लाख नवीन कर्करोगाचे रुग्ण नोंदवले जातात आणि कर्करोगामुळे दरवर्षी ८ ते ९ लाख मृत्यू होतात. स्तनाचा, तोंडाचा आणि फुफ्फुसाचा कर्करोग भारतात सर्वाधिक प्रमाणात आढळतो.

जनजागृती आणि शासनाच्या भूमिका

कर्करोगाविषयी जनजागृती करण्यासाठी सरकार आणि स्वयंसेवी संस्था विविध उपक्रम राबवतात:

राष्ट्रीय तंबाखू नियंत्रण कार्यक्रम – तंबाखूजन्य पदार्थांवरील निर्बंध वाढवणे.

आयुष्मान भारत योजना – कर्करोगाच्या उपचारांसाठी आर्थिक सहाय्य उपलब्ध करून देणे.

लसीकरण मोहीम आणि हेल्थ चेकअप कॅम्प – HPV आणि हिपॅटायटिस बीसाठी मोफत लसीकरण.

शैक्षणिक संस्थांमधून कर्करोगाविषयी माहिती देणे – विद्यार्थ्यांमध्ये जागरूकता निर्माण करणे.

कर्करोग हा जीवघेणा आजार असला तरी योग्यवेळी निदान आणि उपचार घेतल्यास तो बरा होऊ शकतो. सर्वसामान्य नागरिकांनी आपल्या जीवनशैलीत सकारात्मक बदल करून आणि नियमित आरोग्य तपासणी करून कर्करोग टाळण्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे. ४ फेब्रुवारी हा दिवस या विषयावर जागरूकता निर्माण करण्याची संधी देतो आणि सर्वांनी या मोहिमेत सक्रिय सहभाग घ्यावा, ही काळाची गरज आहे.

**– मस्के राजाराम.**

## जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधिश साहेब, क. स्तर न्यायालय गंगापुर ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर**

कि.वि.अर्ज क. ७६/२०२५

अर्जदार : १) स्मिता भ्र. सुभाष लाहोटी, वय ६९ वर्षे, धंदा गृहिणी रा. नाहदी पेट्रॉल पंपाच्या मागे, गोदावरी कॉलनी गंगापुर ता. गंगापुर छत्रपती संभाजीनगर २) रुपेश पि. सुभाष लाहोटी, वय ४४ वर्षे, धंदा व्यापार रा. नाहदी पेट्रॉल पंपाच्या मागे, गोदावरी कॉलनी गंगापुर ता. गंगापुर छत्रपती संभाजीनगर ३) सौ. रुपाली सचिन पनपालिया, वय ४७ वर्षे, धंदा गृहिणी, रा. अग्रवाल मेडीकलच्या समोर, सचिन इंटरप्रायजेस, माळीपुरा, अकोला ता. जि. अकोला ४) सौ. सोनाली गोपाल मुंदडा, वय ४३ वर्षे धंदा गृहिणी, रा. केशर विल्डींग, जे.पी.सी. बँक समोर, शोला चौक, जालना ता. जि. जालना

विरुध्द

गैरअर्जदार : निरंक

प्रकरण : हेअरशिप प्रमाणपत्र (वारसप्रमाणपत्र) मिळणे बाबत.

उपरोक्त विषयी सर्व जनतेस कळविण्यात येते की, या न्यायालयात अर्जदारांनी त्यांचे विधिज्ञ ॲड. श्री. ए.बी. कुलकर्णी यांच्या मार्फत अर्ज सादर केला आहे की, अर्जदार क्र.२ ते ४ हे आपसांत नात्याने सख्खे भाऊ व बहिणी असून अर्जदार क्र.१ ही अर्जदार क्र.२ ते ४ यांची आई आहे. अर्जदार क्र.१ चे पति व अर्जदार क्र.२ ते ४ बाचे वडील नामे सुभाष काशिनाथ लाहोटी हे गंगापुर ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर येथील रहिवाशी होते तं दिनाक २७/११/२०२१ रोजी मौजे गंगापुर ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर येथे मयत झालेले आहे. मयत सुभाष काशिनाथ लाहोटी यांना अर्जदार क्र.१ ते ४ हेच कायदेशीर वारसदार असुन अर्जदारांच्या व्यतिरीक्त मयतास इतर कोणीही कायदेशीर वारसदार असुन अर्जदारांच्या व्यतिरीक्त मयतास इतर कोणीही कायदेशीर वारसदार नसल्याचे नमुद करुन मयताचे मृत्यु पश्चात शासकीय व निमशासकीय कामसाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने या न्यायालयात वारसप्रमाणपत्र मिळणे कामी अर्ज सादर केला आहे.

त्याअर्थी, तमाम जनतेस याद्वारे कळविण्यात येते की, अर्जदारांच्या प्रस्तूत अर्जातील मागणीस कोणाचा काही आक्षेप-उजर असेल तर संबंधीतांनी त्याचा असलेला आक्षेप-उजर या न्यायालयात व्यक्तीशः अथवा विधीज्ञामार्फत हे प्रगटन प्रसिध्द झाले तारखेपासून ३० दिवसांच्या आत नोंदवावा मुद्तीनंतरचा आक्षेप उजर लक्षात घेतला जाणार नाही व हे न्यायालय अर्जदारांच्या हक्कात त्यांनी मागणी केले प्रमाणे वारस प्रमाणपत्र जारी करील. करीता हे प्रगटन माझे सही व शिक्क्यानी आज दिनांक ३१/०१/२०२५ रोजी दिले.

कनिष्ठ लिपीक सहाय्यक अधिक्षक
दिवाणी न्यायालय

## जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधिश साहेब, क स्तर न्यायालय गंगापुर ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर**

कि.दि.अर्ज क्र. ६९/२०२५

अर्जदार : १) ओमप्रकाश रामनाथ मंत्री, बय ६० वर्षे, धंदा व्यापार, रा. मारवाडी गल्ली गंगापुर ह.मु. राठी टॉवरच्या मागे, बिजली नगर, दशमेश नगर, छत्रपती संभाजीनगर २) धिरज रामनाथ मंत्री, वय ४८ वर्षे, धंदा व्यापार रा. मारवाडी गल्ली गंगापुर ह.मु. प्लॉट नं.२२, फ्लॅट नं.१, श्रीसुमंगल रघुलिला निवास, टिळक नगर, छत्रपती संभाजीनगर ३) सौ. प्रफुल्लता रामधन धुत, वय ६५ वर्षे, धंदा गृहिणी रा. कुकाणा, ता. नेवासा जि. अहिल्यानगर ४) श्रीमती सुनिता गोपीकिशन बलदवा, वय ५५ वर्षे धंदा गृहिणी, रा. मारवाडी गल्ली, शेवगाव ता. शेवगाव जि. अहिल्यानगर ५) सौ. वैशाली प्रदिप मुंदडा, वय ४९ वर्षे, धंदा गृहिणी रा. गोदाम गल्ली. भाजी मार्केट, कोपरगाव ता. कोपरगाव जि. अहिल्यानगर

विरुध्द

गैरअर्जदार : निरंक

प्रकरण : हेअरशिप प्रमाणपत्र (वारसप्रमाणपत्र) मिळणे बाबत.

उपरोक्त विषयी सर्व जनतेस कळविण्यात येते की, या न्यायालयात अर्जदारांनी त्यांचे विधिज्ञ ॲड. श्री. ए.बी. कुलकर्णी यांच्या मार्फत अर्ज सादर केला आहे की, अर्जदार क्र.१ व २ हे आपसांत नात्याने सख्खे भाऊ असून अर्जदार क्र.३ ते ५ ह्या अर्जदार क्र.१ व २ यांच्या बहिणी आहेत. अर्जदार क्र.१ ते ५ यांचे वडील नामे रामनाथ दगडुराम मंत्री हे मुळचे मारवाडी गल्ली गंगापुर ता. गंगापुर येथील रहिवाशी होते ते व्यवसायानिमीत्त छत्रपती संभाजीनगर येथे वास्तव्यास होते व ते तेथेच दिनांक १४/१०/२०२४ रोजी मयत झालेले आहे. तसेच अर्जदार क्र.१ ते ५ यांची आई नामे गायत्रीदेवी रामनाथ मंत्री ह्या दिनांक २२/०२/२०१० रोजी मयत झालेल्या असून त्यांच्या मृत्युची नोंद केलेली नाही. मयत रामनाथ दगडुराम मंत्री यांना अर्जदार क्र.१ ते ५ हेच कायदेशीर वारसदार असुन अर्जदारांच्या व्यतिरीक्त मवतास इतर कोणीही कायदेशीर वारसदार नसल्याचे नमुद करुन मयताचे मृत्यु पश्चात शासकीय व निमशासकीय कामसाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने या न्यायालयात वारसप्रमाणपत्र मिळणे कामी अर्ज सादर केला आहे.

त्याअर्थी, तमाम जनतेस याद्वारे कळविण्यात येते की, अर्जदारांच्या प्रस्तूत अर्जातील मागणीस कोणाचा काही आक्षेप-उजर असेल तर संबंधीतांनी त्याचा असलेला आक्षेप-उजर या न्यायालयात व्यक्तीशः अथवा विधीज्ञामार्फत हे प्रगटन प्रसिध्द झाले तारखेपासून ३० दिवसांच्या आत नोंदवावा मुद्द्तीनंतरचा आक्षेप उजर लक्षात घेतला जाणार नाही व हे न्यायालय अर्जदारांच्या हक्कात त्यांनी मागणी केले प्रमाणे वारस प्रमाणपत्र जारी करील. करीता हे प्रगटन माझे सही व शिक्क्यानी आज दिनांक ३१/०१/२०२५ रोजी दिले.

कनिष्ठ लिपीक सहाय्यक अधिक्षक
दिवाणी न्यायालय गंगापुर

**मा. दिवाणी न्यायाधीश, क. स्तर सोयगांव यांचे न्यायालय जि. औरंगाबाद.**

## जाहीर प्रगटन

किरकोळ दिवाणी अर्ज क. ३४/२०२५

अर्जदार : १. शाकेरा बेगम इफ्तेखार अहमद कासमी, वय ४० वर्षे, धंदा घरकाम, २. शफी अहमद खाजा अहमद कादरी, वय ३८ वर्षे, धंदा शेती, ३. कादरी शाजेदा बेगम मिन्हाज अहमद, वय-३६ वर्षे, धंदा घरकाम, ३. मुनाव्वर अहमद खाजा अहमद कादरी, वय-३४ वर्षे, धंदा वरील सर्व रा. फर्दापुर, ता. सोयगांव, जि. छ. संभाजीनगर. शेती,

विरुध्द

गैरअर्जदार : कुणीही नाही.

प्रकरण : वारस प्रमाण पत्र मिळणे बाबत.

सर्व संबंधितास या जाहीर प्रगटणाद्वारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदाराने वारस प्रमाणपत्र मिळणेसाठी ॲड. आर. ए. गिरी, सोयगाव, ता. सोयगाव, जि. औरंगाबाद यांच्या मार्फत या न्यायालयात अर्ज केलेला आहे. मयत सईदाबी खाजा अहमद हे दि. ०८/०८/१९८८ रोजी फर्दापुर, ता. सोयगांव, जि. छ. संभाजीनगर येथे त्यांचा मृत्यू झालेला असून त्यांच्या पश्चात वरील अर्जदार हे वारस आहे. असा अर्ज न्यायालयात वकीलांमार्फत दाखल आहे. अर्जदार क १ ते ४ हे मयत सईदाबी खाजा अहमद यांचे एकमेव वारस असुन त्यांना शासकीय व निम शासकीय लाभासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे..

तरी ज्या कोणाचा अर्जदाराच्या वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रगटनद्वारे प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदोपत्री सह उजर अगर आक्षेप नोंदवावा अन्यथा अर्जदारांना कायदेशीररित्या योग्य ते प्रमाणपत्र देण्यात येईल. पुढील तारीख १२/०३/२०२५.

आज दि. ३१/०१/२०२५ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यासह दिले.

आदेशावरुन

विभागीय लिपीक सहा. अधिक्षक
दिवाणी न्यायालय क. स्तर सोयगांव

**मा. दिवाणी न्यायाधिश, क. स्तर, सोयगांव यांचे न्यायालय, जि. औरंगाबाद.**

## जाहिर प्रगटन

दिवाणी किरकोळ अर्ज क्रं. ३६/२०२५.

अर्जदार : १. संतोष बंडु नेटके, वय. ५९ वर्षे, धंदा, शेती, २. संजु संतोष नेटके, वय. ३४ वर्षे, धंदा, शेती, ३. दिपक संतोष नेटके, वय. ३० वर्षे, धंदा, मजुरी, ४. अश्विनी योगेश शेलार, वय. २८ वर्षे, धंदा. घरकाम, सर्व रा. तिडका, ता. सोयगांव, जि. छत्रपती संभाजीनगर,

-विरुध्द-

गैरअर्जदार : कोणीही नाही.

प्रकरण : वारस प्रमाण-पत्र मिळणें बावत.

सर्व संबंधितांस या जाहीर प्रगटणांद्वारे कळविण्यांत येते की, उपरोक्त अर्जदारांने वारस प्रमाणपत्र मिळणेंसाठी ॲड. वाय. आर. जावळे, सोयगांव, ता. सोयगांव, जि. संभाजीनगर यांच्या मार्फत या न्यायलयांत अर्ज केलेला आहे. मयत यशोदाबाई संतोष नेटके हे दि. ३१/१२/२०२४ रोजी निलकमल हॉस्पीटल, जळगांव येथे त्यांचा मुत्यु झालेला असून, त्यांच्या पश्चात वरील अर्जदार हे वारस आहे असा अर्ज न्यायलयांत वकीलांमार्फत दाखल आहे. अर्जदार क्रं. १ व ४ हे मयत यशोदाबाई संतोष नेटके यांचे एकमेव वारस असुन त्यांना शासकिय लाभासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

तरी ज्या कोणाचा अर्जदारांच्या वारस प्रमाणपत्र देण्यांकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहिर प्रगटनांद्वारे प्रसिध्द झाल्यांपासुन ३० दिवसांच्या आंत या न्यायलयांत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यांसह अजर अगर आक्षेप नोंदवावा अन्यथा अर्जदारांना कायदेशिररीत्या योग्य ते प्रमाणपत्र देण्यांत येईल. पुढील तारीख : १२/०३/२०२५.

आज दि. ३०/०१/२०२५ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यांसह दिले.

आदेशांवरुन

विभागीय लिपीक सहाय्यक अधिक्षक
दिवाणी न्यायालय क. स्तर,
सोयगांव

## अग्रलेख...

# सुख दुःख जीव भोग पावे...

पुण्य मिळविण्यासाठी प्रयत्न करणे आणि पापापासून मुक्ती मिळविण्यासाठी धडपडणे हा माणसाचा स्वभाव आहे. कारण, पाप आणि पुण्य यामधील अस्पष्ट सीमारेषेची त्याला जाणीव असते. कोणती कृत्ये पाप ठरतात आणि कोणत्या कृत्याने पुण्य पदरात पडते, हेही त्याला माहीत असते. काळ बदलला, प्रगती होत गेली, भौतिक विकासाची सारी साधने हात जोडून समोर उभी राहिली आणि नव्या जमान्यासोबत पाप-पुण्याच्या कल्पनाही बदलत गेल्या, तरी संस्कृतीच्या संस्कारांचा आजही भारतीय मनावर पगडा कायम असल्याने काही कृत्यांमधून घडणारी पापे पुसून टाकण्यासाठी कळत-नकळत माणसाचे मन धडपडतच असते. पापाची सीमा धूसर असल्याने हातून घडणाऱ्या पापाचे प्रायश्चित्त घ्यावे आणि पुण्य पदरात पाडून घ्यावे, यासाठी अनेकजण अनेक उपाय करीत असतात. पण पुण्य मिळविणे हे पाप करण्याएवढे सोपे नसते. पाप धुतले जाणे म्हणजे पुण्य मिळविणे नव्हे, याची अनेकांना जाणीव नसते. केवळ पाप पुसून टाकण्यासाठी होणारी तगमग अनेक प्रसंगांतून दिसून येत असते. १४४ वर्षांनंतर येणाऱ्या प्रयागराज येथील महाकुंभ मेळ्यात झालेली कोट्यवधींची गर्दी हा पाप पुसून पुण्य पदरात पाडून घेण्याच्या प्रयत्नांचाच प्रकार म्हणावा लागेल. अर्थात, या गर्दीला भाविकतेची किनार आहेच आणि पाप-पुण्याच्या कल्पनांवर आजही भाविकांचा विश्वास आहे, याची साक्षदेखील आहे. म्हणूनच महाकुंभाच्या पर्वणीनिमित्त मौनी अमावास्येचा मुहूर्त साधून पवित्र गंगेत डुबकी मारण्यासाठी लावली जाणारी जिवाची बाजी म्हणजे, पुण्य पदरात पडण्याच्या प्रयत्नांची पराकाष्ठाच असते.

वास्तविक जगात वावरताना संसाराच्या रगाड्यातील भौतिकाच्या गर्दीत भरडता गेला की त्यातून या आध्यात्माचे आचरण करणेही तसे सोपे नसतेच. म्हणूनच मनःशांतीच्या शोधासाठी काही सोपे मार्ग निवडणे अपरिहार्य होते आणि सहज साध्य असलेला एखादा मार्ग निवडून त्यापासून पापमुक्तीच्या भावनेचे समाधान मिळविण्याचा प्रयत्न सुरू होतो. आपण ज्याच्या शोधात आहोत, ज्यापासून मुक्ती मिळविण्याची मानसिक भावना अनावर झालेली आहे. ते सारे महाकुंभाच्या पर्वणीवर पवित्र स्नान केल्यास सहजपणे प्राप्त होईल, अशा भाबड्या आणि भाविक भावनेतून जमलेल्या अनेक भाविकांचाही महाकुंभाच्या प्रयागराजच्या तीर्थस्थळावरील कोट्यवधींच्या गर्दीत समावेश आहेच. ज्या पुण्यप्राप्तीसाठी अनेकांनी कठोर तपःसाधना केली, असंख्य शारीरिक यातना सोसल्या, कठोर सत्त्वपरीक्षांना सामोरे जाऊन आपल्या निष्ठा सिद्ध केल्या आणि त्या सर्व कसोट्या पार करून पुण्यप्राप्तीची पात्रता सिद्ध केल्यानंतरच मानसिक समाधानाच्या शोधाचे ईप्सित साध्य झाले, ते सारे एका पवित्र डुबकीतून प्राप्त व्हावे, हा खरे तर भक्तिमार्गाचा जवळचा रस्ता म्हणावा लागेल. पण त्यामागेही भक्तिभाव असल्याने त्याचाही आदर करावयास हवा. म्हणूनच भाविकांची कोणतीही गैरसोय न होता त्यांच्या भक्तिभावनेस सुविधायुक्त पुण्यमार्ग दाखविण्यासाठी उत्तरप्रदेशातील योगी आदित्यनाथ सरकारने संपूर्ण पूर्वतयारी केली. भाविकांस कोणत्याही गैरसोयीचा सामना करावा लागू नये, एवढ्या प्रचंड गर्दीमुळे होणाऱ्या असंख्य अडचणींची शक्यता आगोदरच लक्षात घेऊन त्यानुसार प्रयागराजमधील कुंभनगरीची आखणी करण्यात आली. तरी सोप्या मार्गाने पुण्यप्राप्ती करतानादेखील काही कठोर सत्त्वपरीक्षा द्याव्याच लागतात आणि त्या परीक्षा पार केल्यानंतरच अपेक्षित ईप्सित साध्य केल्याचे समाधान प्राप्त होते. कुंभमेळ्याच्या निमित्ताने महाकुंभाच्या पर्वणीवर कोट्यवधींच्या गर्दीतून आपला मार्ग शोधत संगमस्थानी गंगामातेच्या संगमपात्रात पवित्र स्नान करण्याची पर्वणी साधणे तसे सोपे नव्हतेच. पापे पुसण्याच्या आणि पुण्य मिळविण्याच्या भाविकतेने जमलेल्या कोट्यवधींच्या गर्दीतून आपल्यासमोर उभ्या ठाकलेल्या कसोटीच्या क्षणांना सामोरे जाण्याची मानसिक हिंमत आणि पुण्याई पणाला लावावी तेव्हाच हे ईप्सित साध्य होते, हे याआधीही काही वेळा कुंभमेळ्यातच स्पष्ट झाले आहे. प्रयागराजच्या महाकुंभ पर्वणीत मौनी अमावास्येच्या दिवशी झालेल्या दुर्घटनेलाही नियतीने याच कसोटीचा निकष लावला असावा. साऱ्या सज्जता असूनही आणि सुरक्षिततेच्या कडेकोट व्यवस्थेची पुरेपूर आखणी करूनही अनावर आणि काहीशा आततायी गर्दीमुळे घडलेली चेंगराचेंगरीची ही घटना दुर्दैवी आहे, यात शंकाच नाही. पण, एका डुबकीच्या सोप्या मार्गाने पुण्य पदरात पाडून घेण्याची घाई अनेकांस नडली आणि त्यातूनच अनेकांना दुर्घटनेची दुर्दैवी शिकार होण्याची वेळ आली, हे तो प्रसंग प्रत्यक्ष पाहणाऱ्यांच्या अनुभव कथनातून आता स्पष्ट होऊ लागले आहे.

जगातील सर्वांत मोठा धार्मिक मेळावा असे ज्याचे वर्णन केले जाते आणि उभे जग ज्याकडे आदराच्या भावनेने पाहते, त्या महाकुंभ मेळ्यात भाविकांच्या गर्दीचे नियंत्रण करणाऱ्या यंत्रणेवर मानसिक आणि शारीरिक ताण किती असेल, याची कल्पना करणे अवघड नाही. एखाद्या छोट्या राष्ट्राच्या संपूर्ण लोकसंख्येएवढा जनसमुदाय एखाद्या निमित्ताने एखाद्या ठिकाणी एकत्र येतो, तेव्हा त्याच्या व्यवस्थेची मानसिक अपेक्षा असणे साहजिक असते. महाकुंभ ही काही केवळ बघ्यांची गर्दी जमविणारी जत्रा नाही, तर त्याला धार्मिक महत्त्व आहे. या निमित्ताने देशातील धार्मिक पंथांचे असंख्य अनुयायी आणि सामान्य नागरिक भक्तिभावाने एकत्र येत असल्याने त्यांच्या सुरक्षिततेस सर्वोच्च प्राधान्य देण्याच्या दृष्टीने योगी सरकारने केलेल्या उपाययोजनांचा गेल्या काही दिवसांपासून मोठा गाजावाजा होत होता. अत्यंत चोख व्यवस्था, सुरक्षिततेची हमी आणि प्रत्येक भाविकाला या पवित्र प्रसंगी उपस्थित राहिल्याचे मानसिक समाधान मिळेल, अशी आखणी यामुळे प्रयागराज तीर्थस्थ गेल्या काही दिवसांत सर्वत्र वाखाणले जात होते. अशा प्रसंगी, सामान्य जनतेने समंजसपणाने यंत्रणांना सहकार्य करणेही अपेक्षित असते. भाविकतेच्या भावनेला कोणत्याही उन्मादाचा रंग चढू नये, या तीर्थाचे आणि प्रसंगाचे पावित्र्य राखले जावे, अशी यंत्रणांचीही अपेक्षा असते. पण सामूहिक मानसिकतेपुढे अनेकदा व्यक्तिगत विवेकाच्या भावनेस माघार घ्यावी लागते. समूहाचे मानसशास्त्र हा बरेचदा अनाकलनीय प्रकार असतो. ते कोणत्या प्रसंगी कोणते वळण घेईल याचे आडाखे बांधणे सोपे नसते. प्रयागराज संगमावर मध्यरात्रीनंतरच्या त्या मुहूर्ताची वेळ साधण्यासाठी समूह उतावीळ झाला आणि प्रत्येकास पवित्र स्नान करण्याची आस लागली. त्यातून सारे लोंढे एका दिशेने लोटत चालले आणि सुरक्षिततेच्या भावनेने आश्वस्त असलेल्या निर्धास्त गर्दीवर या लोंढ्यांचे आक्रमण सुरू झाले. चेंगराचेंगरीची अशीच दुर्घटना यापूर्वीही महाकुंभाच्या पर्वणीप्रसंगी झाली होती. स्वातंत्र्यानंतर प्रथमच फेब्रुवारी १९५४ मध्ये प्रयागराजच्या याच संगमावर भाविकांची गर्दी अनावर झाल्याने चेंगराचेंगरी होऊन सुमारे ८०० भाविकांचा दुर्दैवी मृत्यू झाला होता. १९८६ मधील महाकुंभ मेळ्यातही अशाच चेंगराचेंगरीच्या घटनेत सुमारे २०० भाविकांना जीव गमवावा लागला होता. अशा घटनांची पुनरावृत्ती टाळण्यासाठी योगी सरकारने केलेल्या उपाययोजनांनंतरही सुमारे ३० जण चेंगराचेंगरीत प्राणास मुकले. याआधीच्या महाकुंभ मेळ्याच्या तुलनेत यंदाची भाविकांची गर्दी विक्रमी आहे, असे म्हणता येईल. अशा गर्दीत चेंगराचेंगरीसारखी दुर्घटना घडल्यास, तर काय होऊ शकते, याची कल्पना करणे कठीण नाही. तरीही, संभाव्य धोके लक्षात घेऊन केलेल्या नियोजनाच्या आखणीमुळे या दुर्घटनेचे स्वरूप पूर्वीपेक्षा काहीसे सौम्य ठरले. खरे म्हणजे, अमृतत्वाचे पुण्य पदरात बांधण्याच्या पवित्र भावनेने जमलेल्या कोणाही जिवाची अशा दुर्दैवी रीतीने अखेर व्हावी, हे दुःख असह्य असेच आहे. म्हणूनच पवित्र प्रसंगांचे पावित्र्य राखण्याचा भक्तिविवेक प्रत्येकानेच राखला पाहिजे. आता या दुर्घटनेनंतर सुरू झालेले राजकारणही दुर्दैवी आहे. अशा प्रसंगात केवळ एकमेकांवर दोषारोप करण्याऐवजी, दुर्घटनेचा दुर्दैवी आघात सोसणाऱ्यांचे दुःख वाटून घेण्याची, त्यांच्या दुःखात सहभागी होण्याची गरज आहे. राजकारण करून एकमेकांवर कुरघोडी करण्याचे अनेक प्रसंग अन्यत्र असतात. ते करण्याची ही वेळ नाही आणि प्रयागराजसारखी पवित्र पुण्यभूमी ही राजकारणाची जागाही नाही. हा विवेक दाखवून दुःखाच्या या क्षणी दुःखितांच्या संवेदनांसोबत राहण्यातच खरी मानवता आहे. ▮

## दृष्टिकोन

# ...तर लोकशाही अधिक प्रगल्भ होईल

**अभिजित वर्तक**

राज्यसभा हे संसदेचे वरिष्ठ सभागृह आहे आणि आपल्या संसदेची शानही आहे. त्यामुळे राज्यसभेचे वेगळे महत्त्वही आहे. राज्यसभेला वरिष्ठ सभागृहाचा दर्जा मिळाला आहे. तो घटनात्मक आहे. राज्यसभेत थेट जनतेतून निवडून आलेले सदस्य नसतात. ते आमदार आणि खासदारांकडून निवडले जातात तसेच काही सदस्यांची नियुक्ती ही राष्ट्रपतींकडून केली जाते. राज्यसभा हे वरिष्ठ सभागृह असले, तरी त्यात सगळेच ज्येष्ठ नागरिक असतात, असे समजण्याचे कारण नाही. पण, जे सदस्य राज्यसभेवर निवडून येतात वा नियुक्त केले जातात, ते अनुभवी असतात, विविध क्षेत्रातील तज्ज्ञ असतात. त्यामुळे त्यांच्या ज्ञानाचा आणि अनुभवाचा फायदा नेहमीच संसदेला, पर्यायाने देशाला होत असतो. ही बाब लक्षात घेतली तर राज्यसभेचे अस्तित्व किती महत्त्वाचे आहे, हे आपल्या लक्षात येईल. लोकसभेच्या तुलनेत राज्यसभेला असलेले अधिकार काही बाबतीत कमी आहेत, ही बाब मान्य करूनही राज्यसभेचे महत्त्व काही कमी होत नाही. मात्र, गतकाळात संसदेच्या अनेक अधिवेशनांमध्ये विरोधी पक्षांनी सत्ताधाऱ्यांविरोधात गोंधळ घालत कामकाज हाणून पाडल्यामुळे अनेकदा असा प्रश्न निर्माण झाला होता की, राज्यसभा बरखास्त का केली जाऊ नये. राज्यसभेमुळे महत्त्वाची विधेयकंच पारित होणार नसतील आणि त्यामुळे देशाचे नुकसान होणार असेल तर राज्यसभा ठेवायचीच कशाला, हा प्रश्न बराच काळ चर्चिला गेला. पण, सुदैवाने तसा कुठलाही प्रस्ताव संसदेच्या विचारासाठी कधी आला नाही आणि आजही राज्यसभा दिमाखात काम करते आहे, हे आपल्या लोकशाहीचे ठोस वैशिष्ट्य म्हटले पाहिजे. आजचे सत्ताधारी जेव्हा विरोधात होते तेव्हा त्यांनी राज्यसभेत गोंधळ घालून कामकाज हाणून पाडले होते, तर तेव्हाचे सत्ताधारी आता विरोधात बसून कामकाज होऊ देत नाहीत. त्यामुळे संसदेच्या कामकाजाचे असंख्य महत्त्वाचे तास वाया जातात आणि त्याचा फटका सरतेशेवटी जनतेलाच बसतो. जनतेच्या हितासाठी आणि देशाचे कामकाज सुरळीत चालविण्यासाठी कायदे तयार करण्याची जबाबदारी ज्यांच्यावर आहे, ते जर गोंधळामुळे ती जबाबदारी पार पाडू शकणार नसतील तर राज्यसभा ठेवून करायचे तरी काय, असा उद्वेगजनक सवाल अनेकांनी मधल्या काळात उपस्थित केला होता. त्या वेळी तो योग्यही होता. पण, सुदैवाने राज्यसभा कायम आहे.

गतकाळात राज्यसभेचे २५० वे अधिवेशन संपन्न झाले. त्या अधिवेशनाच्या विशेष सत्रात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जे मनोगत व्यक्त केले होते, ते अतिशय महत्त्वपूर्ण होते. सरकारला निरंकुश होण्यापासून राज्यसभेने रोखले, हे पंतप्रधान मोदी यांचे विधान महत्त्वपूर्ण होते. कारण संसदीय लोकशाहीचा आत्मा म्हणून राज्यसभेला ओळख प्राप्त झाली आहे. या वरिष्ठ सभागृहाने देशाला दृष्टी देण्याचे काम केले आहे. खरेच, पंतप्रधान म्हणाले होते त्याप्रमाणे राज्यसभेचा २५० व्या अधिवेशनापर्यंत प्रवास हा असाच झालेला नव्हता. या प्रवासाला एक गौरवशाली परंपरा, इतिहास लाभला आहे. हा प्रवास म्हणजे एक विचारयात्रा आहे, या पंतप्रधानांच्या म्हणण्याला निश्चितच काही अर्थ होता. लोकसभेने पारित केलेल्या विधेयकावर राज्यसभेतील अनुभवी आणि तज्ज्ञ सदस्यांकडून जेव्हा विचारमंथन होते, प्रत्येक पैलूवर सविस्तर चर्चा होते आणि त्यानंतरच ते विधेयक पारित होते. त्यामुळे राज्यसभेचा हा प्रवास म्हणजे एक विचारयात्रा आहे, असे म्हणणे अतिशयोक्तीचे ठरणार नाही. राज्यसभा हे वरिष्ठ सभागृह आहे म्हणजे ते ज्येष्ठांचे आहे, असे सरसकट विधान करणे चुकीचे असले, तरी राज्यसभेतील सदस्यांचे सरासरी वयोमान तपासले तर ते पूर्णपणे चुकीचे आहे, असेही म्हणता यायचे नाही. त्यामुळे ज्येष्ठ सभागृहातील ज्येष्ठांनी म्हणजेच राज्यसभेने देशाला दूरदृष्टी देण्याचेही काम केले आहे. दूरदृष्टी देण्याची क्षमताही राज्यसभेत आहे. या क्षमतेचा उपयोग सकारात्मकरीतीने करवून घेतला जाण्याची गरज आहे. गोंधळ घालणारे सभागृह अशी राज्यसभेची ओळख होता कामा नये. राज्यसभेत जर विविध क्षेत्रातील तसेच राजकारणातील ज्येष्ठ-श्रेष्ठांचा समावेश असतो तर मग हे ज्येष्ठ-श्रेष्ठ गोंधळ का घालतात, हा सामान्य माणसाला सतावणारा प्रश्न आहे. याचे उत्तर देण्याची जबाबदारी म्हणूनच राज्यसभेची आहे. राज्यसभेत कुणीही गोंधळ घालू नये. एखादा मुद्दा चर्चेला येतो, तेव्हा त्यावर सांगोपांग चर्चा घडवून आणली जाऊ शकते. प्रत्येक पैलूवर चर्चा केली जाऊ शकते, युक्तिवाद केला जाऊ शकतो. पण, याउलट होणार असेल तर त्यामुळे संसदेच्या कामकाजाचा महत्त्वपूर्ण वेळ वाया जाणार असेल तर राज्यसभेच्या अस्तित्वावर प्रश्न उपस्थित झाल्याशिवाय राहणार नाही. राज्यसभेची सदस्यसंख्या ही लोकसभेच्या सदस्य संख्येपेक्षा अर्धीही नाही. असे असतानाही लोकसभेत होतो त्यापेक्षा अधिक गोंधळ राज्यसभेत होत असेल, सदस्य अध्यक्षांच्या आसनापुढील मोकळ्या जागेत जमून घोषणाबाजी करत कामकाजात व्यत्यय आणत असतील तर या सभागृहाला ज्येष्ठत्वाचा दर्जा द्यायचा तरी कशासाठी? राज्यसभेचे जे ज्येष्ठत्व घटनेनेच मान्य केले आहे. त्याचा सन्मान राखणं हे राजकीय पक्ष आणि त्यांच्या सभागृहातील सदस्यांचं कर्तव्य आहे. ज्या कुणा सदस्याला वा सदस्यांना आपली बाजू मांडायची असते, ती जागेवर उभे राहूनही त्यांना मांडता येते. त्यासाठी अध्यक्षांपुढील मोकळ्या जागेत जाऊन गोंधळ घालण्याची आवश्यकता नाही. हीच आवश्यकता पंतप्रधान मोदी यांनी त्यांच्या भाषणात अधोरेखित केली होती, ही बाब लक्षात घेतली पाहिजे. ही बाब अधोरेखित करताना पंतप्रधानांनी शरद पवार यांची राष्ट्रवादी काँग्रेस आणि नवीन पटनायक यांच्या बिजू जनता दलाची प्रशंसा केली होती. तीसुद्धा समयोचित आणि योग्यच होती. कारण या दोन्ही पक्षांच्या राज्यसभेतील सदस्यांनी मोकळ्या जागेत जाऊन गोंधळ न घालण्याचे बंधन स्वतःहून लादून घेतले होते. लोकशाहीत यापेक्षा आनंदाची बाब दुसरी कोणती असू शकेल? २५० पेक्षा जास्त अधिवेशनं पाहणाऱ्या राज्यसभेने तीन तलाकविरोधी विधेयक पारित करविले आहे, जम्मू-काश्मीरला विनाकारण लागू होते ते कलम ३७० रद्द करण्यासाठी मदत केली आहे, नवीन मोटार वाहन कायदा पारित करण्यात मोलाचा सहभाग नोंदविला आहे. अनेक ऐतिहासिक घटनांची साक्षीदार असलेली राज्यसभा ही संसदेचे अभिन्न असे अंग आहे आणि ती काळाची गरजही आहे. त्यामुळे राज्यसभेत येणाऱ्या कोणत्याही पक्षाच्या सदस्याने गोंधळ न घालण्याचे बंधन स्वतःला घालूनच वरिष्ठ सभागृहात प्रवेश केला पाहिजे. प्रत्यक्ष कृतीतून आपण ज्येष्ठ असल्याची प्रचीती देशाला घडविली पाहिजे. विरोधकांनी गोंधळ घालू नये एवढेच पंतप्रधानांनी म्हटलेले नाही तर माझ्या पक्षाच्या सदस्यांनाही हे बंधन लागू पडते, असेही त्यांनी म्हटले होते; हेही लक्षात घेतले पाहिजे आणि म्हणूनच सत्ताधारी भाजपाचेही सदस्य भविष्यात राज्यसभेत कसे वागतील, याचे स्पष्ट संकेत मोदी यांनी आधीच दिले आहेत. गतकाळात भाजपाच्या सदस्यांनी गोंधळ घातला होता म्हणून आता विरोधी पक्षांच्या सदस्यांनी बदला घेत गोंधळ घालायचा, ही पद्धत लोकशाहीला न मानवणारी आहे. त्यामुळे ज्येष्ठांनी समाजात जसे वागायचे असते तसेच राज्यसभेतील सदस्यांनी संसदेच्या अधिवेशनात कर्तव्य पार पाडायचे असते, हे लक्षात घेतले तर सर्वकाही सुरळीत होईल आणि जगातली सगळ्यात मोठी लोकशाही अधिक बळकट, प्रगल्भ आणि परिपक्व होईल, यात शंका नाही. ▮

९४२२९२३२०१

## वेध

**प्रफुल्ल क. व्यास**

# या देवळीत माझ्या...!

ना. नितीन गडकरी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस या दोघांनी विदर्भाला वेगळ्या उंचीवर नेऊन ठेवले. फडणवीस मुख्यमंत्री झाल्यानंतर त्यांनी कामांचा धडाका लावला. गडचिरोली विकासाचे प्रवेशद्वार होईल, असा विश्वास मुख्यमंत्री फडणवीस यांनी व्यक्त केला. या दोन विदर्भपुत्रांची स्वतंत्र ओळख आहे. यांच्या पाठोपाठ माजी वनमंत्री आ. सुधीर मुनगंटीवार आणि आता विद्यमान राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर यांचेही नाव घ्यावे लागेल. या पाठोपाठ विदर्भात माजी खासदार दत्ता मेघे यांचे शिष्य असलेले एक व्यक्तिमत्त्व आहे. दोन वेळा सलग लोकसभेचा आखाडा मारणारे मल्ल माजी खासदार रामदास तडस यांच्याही नावाचा उल्लेख करावा लागेल. नंदूरबार येथील काँग्रेसचे नेते माणिकराव गावीत यांचे अत्यल्प शिक्षण असताना रेल्वे मंत्री म्हणून जबाबदारी सांभाळली होती. त्यामुळे राजकारण आणि शिक्षण याचा सुतराम संबंध नाही. ज्याला गवसले तो दीर्घकाळ नेता राहतो. वर्धा लोकसभा मतदार संघातील माजी खासदार रामदास तडस यांच्या विषयीही तसेच म्हणावे लागले. माणिकराव गावीत यांच्या पेक्षा थोडे जास्त शिकलेले तडस यांचाही राजकीय प्रवास मनोरंजक आहे. देवळीसारख्या गावातून नगराध्यक्ष ते खासदार असा प्रवास करणारे रामदास तडस हे मल्ल म्हणून राज्यात ओळखले जातात. त्यांनी विदर्भ केसरी हा कुस्तीतला किताब चार वेळा पटकावला आहे. कुस्तीत चित करणाऱ्या रामदास तडस यांनी राजकारणात प्रवेश करण्यापूर्वी एसटी थांब्यांसाठी केलेले आंदोलन हे आजही अनेकांच्या स्मरणात आहे. राजकारण हा त्यांचा आवडीचा विषय असला, तरी कुस्तीवर त्यांचे प्रचंड प्रेम आहे. राजकारणात वावरताना इतर पक्षातील नेत्यांसोबत त्यांचे तेवढेच आपुलकीचे संबंध आहेत. राजकारणात अतिशय शांत राहून अनेक गोष्टी ते खेळाडू वृत्तीने स्वीकारतात. याच खेळाडू वृत्तीने त्यांनी महानगरांना लाजवेल, मोठमोठ्या खेळाडूंना भुरळ घालेल अशा भव्य इनडोअर स्टेडियमची निर्मिती देवळीसारख्या छोट्या तालुक्याच्या स्थानावर केली आहे. राज्य सरकारच्या नगरविकास वैशिष्ट्यपूर्ण योजनेतून १२ कोटी रुपयांचे ५ हजार प्रेक्षक बसू शकतील असे भव्य स्टेडियम उभारले. 'क' वर्ग नगरपालिका असलेल्या गावातील हे स्टेडियम राज्यात पहिलेच ठरले आहे. गेल्या आठवड्यात त्याच स्टेडियमवर विदर्भात पहिल्यांदाच महाराष्ट्र राज्य कुस्तिगीर संघाच्या वतीने महिलांसाठीच्या कुस्ती स्पर्धा आटोपल्या. ते स्टेडियम पाहून येथे आलेल्या महिला खेळाडू गदगद झाल्या. आगामी एक वर्षात राष्ट्रीय कुस्ती स्पर्धा घेण्यासाठीची निरीक्षकांनी मान्यता दिली. या स्टेडियमवर आता महसूल, पोलिस विभागाच्या ऐटीत स्पर्धा होऊ शकतात. खेळाडू हा विषयच माजी खासदार रामदास तडस यांचा जिव्हाळ्याचा असल्याने त्यांनी आपल्या छोट्या गावात अ‍ॅकॅडमीची निर्मिती केली. त्या माध्यमातून देवळीत कबड्डी, कुस्ती, फुटबॉल, व्हॉलिबॉल, बॅडमिंटन आणि टेनिसचे प्रशिक्षण दिले जात आहे. विशेष म्हणजे खासदारकीची मिळणारी ३५ हजार रुपये पेन्शनही खेळाडूंना प्रशिक्षणासाठी ते देत आहेत. कुस्तीपटू ऑलिम्पिकमध्ये पोहोचविण्याचा ध्यास त्यांनी घेतला आहे. येथे प्रशिक्षणासाठी येणाऱ्या प्रशिक्षणार्थींसाठी होस्टेल शासनाने द्यावे यासाठी त्यांनी पाठपुरावा सुरू केला आहे. वर्धेसारख्या जिल्ह्याच्या ठिकाणावर नाट्यगृहाची वाट असताना रामदास तडस यांनी देवळीत राजे छत्रपती शिवाजी महाराज नाट्यगृहाची निर्मिती केली. ७०० नाट्यप्रेमी बसतील एवढी क्षमता त्या नाट्यगृहाची आहे. राष्ट्रवादी काँग्रेसमधून भाजपात प्रवेश घेऊन तडस खासदार झाले. सलग दोन वेळा खासदार राहिलेले तडस सहज उपलब्ध होतात, अशी त्यांची ओळख होती. लोकसभा निवडणुकीत त्यांचा पराभव झाला. परंतु, तो पराभव त्यांनी खेळाडू वृत्तीने स्वीकारला. निकालानंतर आठवड्यातच पुन्हा ते जनतेच्या सेवेत रुजू झाले. विद्यमान खासदार अमर काळे यांच्या वर्धेतील जनसंपर्क कार्यालयात काम घेऊन येणाऱ्या गरजूंपेक्षा जास्त लोकं आजही तडस यांच्या कार्यालयात कामं घेऊन येतात आणि आजही ते संबंधित अधिकाऱ्याला फोन करून, पत्र देऊन येणाऱ्याचे समाधान करतात. खेळ हा श्वास असल्यागत रामदास तडस यांचे काम अव्याहतपणे सुरू आहे. खेळाडूंसाठी स्वतःची पेन्शन देणारे तडस अपवादच म्हणावे लागतील. गडकरी व फडणवीस यांनी विदर्भाची वेगळी ओळख निर्माण केली असताना वर्धा जिल्ह्यातील देवळी कुस्तीचे माहेरघर होऊ पाहत असल्याने खेळायचे असेल तर या 'देवळीत माझ्या' असेच म्हणावे लागेल. प्रत्येक लोकप्रतिनिधींसाठी तडस यांचे छोट्या गावातील स्टेडियम व नाट्यगृह निर्मितीचे कार्य पथदर्शीच ठरावे. ▮



९८८१९०३७६५

## प्रासंगिक

# रुसवेफुगवे; तरीही महायुती सरकार भक्कम

**मोरेश्वर बडगे**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील महायुती सरकारला सत्तेत येऊन दोन महिने उलटले आहेत. या दोन महिन्यात या सरकारने अनेक चांगल्या गोष्टी केल्या. सर्वात महत्त्वाचे सांगण्यासारखे म्हणजे दावोस परिषदेला जाऊन मुख्यमंत्री फडणवीस यांनी १५ लाख कोटी गुंतवणुकीचे सामंजस्य करार केले. यातले सारेच उद्योग लगेच येतील अशातला भाग नाही. पण मोठी गुंतवणूक महाराष्ट्रात येत आहे. महाराष्ट्रात गुंतवणुकीसाठी चांगले वातावरण आहे हा संदेश जगभर गेला, ही मोठी गोष्ट झाली. फडणवीस सरकार मोठी झेप घेऊ शकते. एवढ्यात मोठ्या निवडणुका नाहीत. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका सर्वोच्च न्यायालयात दोन वर्षांपासून रखडल्या आहेत. परवाच्या सुनावणीत सरकारने याबाबत स्पष्ट भूमिका मांडली. मुंबईसह राज्यातील २३ महापालिका, २५ जिल्हा परिषद, २०७ नगरपालिका आणि २८४ नगर पंचायतींमध्ये सध्या प्रशासकाची राजवट आहे. मामला कोर्टात असल्याने सारेच हतबल आहेत. सरकारच्या भूमिकेने या रखडलेल्या निवडणुका लवकरच होतील, अशी आशा करायला हरकत नाही. सांगायचं हेतू हा की, सरकार जिव्हाळ्याच्या विषयांवर गंभीर आहे. पण वृत्तवाहिन्या आणि वर्तमानपत्रे पाहिली तर सरकारमध्ये सारे आलबेल नाही, असे कोणाचेही मत होऊ शकते. मात्र त्यावर विश्वास ठेवण्याचे कारण नाही. उलट उद्धव सेनेचे खासदार संजय राऊत आणि त्यांचे 'आका' यांनी आपले आमदार कसे सांभाळायचे, याची चिंता करावी. महापालिका निवडणुका लांबल्या आहेत. पाच महिने 'उपाशी' राहण्याची कळ उबाठा सोसू शकेल? तुम्ही लिहून ठेवा, निवडणुका लागतील तोपर्यंत ठाकरेंची उबाठा रिकामी झालेली असेल.

आता राज्यात तीन पक्षांच्या महायुतीचे सरकार आहे. रुसवेफुगवे, धुसफूस, थोडी वादावादी आहे आणि ती चालणारच. मीडियावाले त्या बातम्या मीठ-मसाला लावून रंगवत आहेत. राजकारणी आहेत. साधुसंत नाहीत. पण आम्ही तिघे कुठलाही निर्णय एकत्र बसून घेतो हे महायुतीच्या तिन्ही नेत्यांनी वारंवार सांगितले आहे. परवा अजितदादांनी त्याची पुन्हा ग्वाही दिली. पण विरोधकांना हे पाहवत नाही. त्यामुळे ते वावड्या उठवणारच. त्यात दम नाही. उद्धव बाळासाहेब ठाकरे म्हणजे 'शिल्लक ठाकरे सेने'ने विधानसभेच्या ९६ जागा लढवल्या अन् अवघ्या २० जागा जिंकता आल्या. हे २० आमदारही तिकडे किती टिकतील याचा भरवसा नाही. मात्र, संजय राऊत भलत्याच आवेशात बोलतात. ती त्यांची सवय आहे. अनेकदा तोंडावर पडूनही ती खोड जात नाही. मात्र मीडियाला मसाला हवा असतो. त्यामुळे संजय राऊत यांच्या वायफळ बडबडीलाही प्रसिद्धी मिळते. राजकारण म्हटलं की, राजी-नाराजी आलीच. राजकारण म्हटलं, की धुसफूस, अंतर्गत चढाओढ चालणारच. प्रत्येक राजकीय पक्षाला आपला पक्ष वाढवण्याचा हक्क आहे. त्या हिशोबाने स्पर्धा होते. मात्र म्हणून सारे एक आहेत. महाआघाडी सरकार आणि महायुती सरकार यांच्यातला हा मूलभूत फरक लक्षात घेतला पाहिजे. मंत्रिपद मिळाले नाही म्हणून अजितदादांच्या राष्ट्रवादीचे ज्येष्ठ नेते छगन भुजबळ म्हणाले होते, 'जहाँ नाही चैना, वहां नही रहना.' पण भुजबळ आहे तिथेच चैन शोधत आहेत. जातील कुठे? तरीही पतंगबाजी होते. महायुतीच्या बैठकीला दांडी मारून एकनाथ शिंदे गावाला गेले तेव्हा 'शिंदे नाराज' अशा बातम्या रंगवून सांगितल्या गेल्या. पण 'मी मात्र शपथ घेणार' असे अजितदादांनी मीडियाला सांगितले तेव्हा दोन तास आधी का होईना शिंदे शपथविधीला आले. सत्ता कोणाला नको असते? सत्ता सोडणेही सोपे नसते. लोकांच्या सेवेसाठी आम्ही राजकारण करतो असे म्हणायला सोपे आहे; पण व्यवहारात जेव्हा घरी बसायचा निरोप येतो तेव्हा चेहरा पडतो. एक लक्षात घ्या, 'देवेंद्र फडणवीस एकच असतो.' एकनाथ शिंदे यांच्याकडे मुख्यमंत्रिपद देण्याचे भाजपाने ठरवले तेव्हा फडणवीसांनी संघटनेत काम करायची इच्छा जाहीर केली. मात्र पक्षाचा आदेश आला तेव्हा पदावनती घेऊन उपमुख्यमंत्रिपद स्वीकारले. नुसते स्वीकारले नाही तर एकनाथ शिंदे यांच्यासोबत मिळून काम केले. पुढे अजितदादांना घेऊन महायुतीचा रथ पुढे नेला. ते पाहूनच जनतेने पुन्हा एकदा या त्रिमूर्तीकडे राज्याचा कारभार दिला. महायुतीच्या साऱ्याच आमदारांनी हे लक्षात घेतले पाहिजे.

आणखी एक गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे . फडणवीस कुठलाही निर्णय एकट्याने घेत नाहीत. शिंदे आणि अजितदादा यांच्याशी चर्चा करूनच फडणवीसांनी पालकमंत्र्यांची यादी फायनल केली. तरीही पालकमंत्री वाटपावरून रायगड आणि नाशिकमध्ये तिढा निर्माण झालेला दिसतो. शिंदे सेनेचे भरतशेठ गोगावले रायगडसाठी तर दादा भुसे नाशिकसाठी हट्टाला पेटले आहेत. तिकडे अजितदादांच्या माणिकराव कोकाटे यांनीही कल्ला चालवला आहे. रायगडचा पालक बदलला तर अजितदादा नाराज होणार. नाशिकचा पालक तर भाजपाचाच आहे. कोणालाही हलवले तरी नाराजी असणार. फडणवीस हा गुंता कसा सोडवतात ते पाहायचे. तसे पाहिले तर शिंदे आणि अजितदादांनीच आपल्या आमदारांना फटकारले पाहिजे. हे का ढील देत आहेत? मंत्रिपद मिळाले असताना या तिघांना ही काय अवदसा आठवली? मुख्यमंत्र्यांच्या निर्णयाला कोणी मंत्री कसे आव्हान देऊ शकतो? उद्धव ठाकरे यांच्या महाआघाडी सरकारने अडीच वर्षात केलेली घाण निस्तरून महाराष्ट्राला पुन्हा प्रगतीच्या रुळावर आणायचे आहे. चांगला कारभार द्यायचा आहे. महाआघाडीच्या नेत्यांसारखेच तुम्हीही भांडाल तर मग जनतेने दाखवलेल्या विश्वासाचे काय? जनतेच्या मतांशी तो दगा होईल. उद्धव ठाकरे असेच वागले तेव्हा जनतेने त्यांना जन्मभर आठवेल अशी अद्दल घडवली. अलिकडे मतदार हुशार झाला आहे. लोकसभेत भाजपाला 'शिक्षा' देणाऱ्या मतदारांनी विधानसभेला महायुतीला डोक्यावर घेतले, यावरून काय ते ओळखा. दबाव आणला तर फडणवीस दबतील अशा मस्तीत कुणी राहू नये. फडणवीसांचे एक विशेष आहे. ते समोरच्याला चुका करू देतात, पण त्यांच्याकडे चुकीला माफी नसते.


माझा मुद्दा याहून वेगळा आहे. फडणवीस यांच्या रूपाने राज्याला एक व्हिजनरी मुख्यमंत्री मिळाला आहे. फडणवीस कामाला वाघ आहेत. १८-१८ तास काम करतात. रिझल्ट देऊ शकतात. त्यांना 'फाईल' कळते, प्रशासनावर पक्की मांड आहे. त्यांना महाराष्ट्र खूप पुढे न्यायचा आहे. दिल्लीतली हायकमांड त्यांच्या पाठीशी आहे. फडणवीसांना काम करू द्या. त्यांनी मित्रपक्षांची भांडणं सोडवावी यासाठी त्यांना खपवू नका. मतदारांचा विश्वास गमावाल तर महापालिकेच्या निवडणुकांमध्ये जनता ठोकून काढेल. गेल्या निवडणुकीत युतीत ५६ जागा मिळाल्या असताना ठाकरे शरद पवारांच्या नादी लागले. त्यांना मुख्यमंत्री व्हायचे होते. त्या मोहात त्यांनी जनमताचा कौल लाथाडला. त्याची किंमत आज उद्धव मोजत आहेत. उद्धव ठाकरे यांच्या नादी आता शरद पवारच काय सोनिया गांधीही लागणार नाहीत. बळ नसताना उद्धव ठाकरेंनी स्वबळाची भाषा चालवली आहे. त्यांच्याकडे बळ आहे कुठे? देण्यासारखे काहीही नसताना ठाकरे-राऊत फुकटच्या डरकाळ्या फोडत आहेत. महापालिका निवडणूक जाहीर होऊ द्या. उद्धव यांच्यासोबत शिवसैनिक तर सोडा, संजय राऊतही नसतील. नियती उधारी ठेवत नाही. या जन्मीचे याच जन्मी भोगावे लागते. ▮

९८५०३०४१२३

(लेखक ज्येष्ठ पत्रकार आहेत.)

### भक्ती, प्रार्थना आणि दृढभाव

ईश्वरी नामाचा जप करून जीवनात तृप्ती मिळते आणि शरणागती म्हणजेच नामाचा जप असतो . मानवाचे शरीर हे कायम भाड्याच्या घरात रहाते. ईश्वर जिथे राहातो तेच मानवाचे घर असते म्हणूनच तो आनंद वेगळा असतो आणि तसाच आनंद देह सोडताना जर वाटला तरच परमेश्वराच्या ठिकाणी असलेला दृढभाव जागृत होतो. यासाठी जिवंतपणी वृत्ती भगवंताच्या ठिकाणी चिकटली पाहिजे . 'मना एवं मानव्यं करणम् बंधन मोक्षयो' देवाच्या इच्छेप्रमाणे वागले पाहिजे तरच अपेक्षेपेक्षा अद्भुत घडते. प्रपंचातली खरी विश्रांती म्हणजे नामस्मरण. यासाठीच चांगले कर्म करणारा प्रत्येक माणूस हा देव असतो .सत्कृत्यात देव आहे. एकाग्रतेतच आध्यात्मिकतेचा प्रवास सुखकारक होतो. माझे हृदय हेच परमेश्वर मानले तर त्यासारखा जीवनात आनंदच नसतो. मूल्य आणि संस्काररूपी दोरी सुटली की जीवनाचा पतंग खाली येतो हा निसर्गनियम आहे. यासाठी दृढभाव जागृत असावा.



**अमोल करकरे**/९९६७९२७६१७

## वाचक पत्रे

### एक सुखद अनुभव

मोहिनी मिशन विश्व मांगल्य फाऊंडेशन गांधीनगर येथे मी व विनया फडणवीस गेलो होतो. ही संस्था किन्नर म्हणजे तृतीयपंथी लोकांची आहे. कोरोनाच्या काळात श्रद्धा जोशी यांच्या सहकार्याने स्थापन झाली. मोहिनी पीआरओ आहेत. त्यांनी भारतात मिनिस्ट्री मिलिस्ट्री ऑफ कल्चर गव्हर्मेंट कार्यक्रम घेतले आहे. त्यांनीच प्रथम तृतीयपंथी कार्यक्रम संपूर्ण भारतात घेतले. सनातन धर्माचा हाच मुख्य उद्देश. मोहिनी यांचे बोलणे अत्यंत नम्रतेचे व त्या सौंदर्याची खान आहे. या संस्थेतील काही किन्नर शिकलेले असून नोकरी करतात. श्रेया खरे उच्च पदावर आहेत. शिक्षण घेताना त्यांना खूपच त्रास झाला. म्हणून बहुतांशी किन्नर शाळेत जात नाही. त्यांना पैसे मागायला आवडत नाही. समाजात तुमच्या घरी कामे करण्याची त्यांची तयारी आहे. परंतु समाज त्यांना घेत नाही. हळदी-कुंकू कार्यक्रमात नीरा जोगती व सोनी जोगती यांनी हृदयस्पर्शी गाणे म्हटले. जोगवा वाढा किंवा नाही! निंदा जोगवाची करू नका, त्यांना मन-भावना आहेत, परंतु समाजाची साथ नाही. हळद-कुंकू नंतर सुंदर जेवण व वाण म्हणून त्यांनीच विणलेले पाय-पुसणे दिले. त्यांचा स्वयंनिर्मित व्यवसाय म्हणून कमी किमतीत ते विणून विकतात. सर्वांनी त्यांचा फायदा घ्यावा. मला बोलाविले. हळदी-कुंकू वाण दिले हे माझे भाग्य.

**निर्मला गांधी**/९११२२७५२८४

### मन गंगेसारखं निर्मळ हवे

काँग्रेसचे ज्येष्ठ नेते व राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खडगे यांनी महाकुंभात गंगेत डुबकी लावल्याने देशाची गरिबी दूर होईल काय? अशी टीका केल्याचे वाचले. गेल्या ५० वर्षांपासून काँग्रेसचा नारा होता 'गरिबी हटाव - देश बचाव' किती गरिबी हटली हे सांगा. आज कुंभमेळ्यामुळे किती लोकांना रोजगार मिळाला आहे. किती लोकं कुंभमेळ्यामुळे पोट भरत आहेत. बस-ट्रॅव्हल्सवाले, पूजेचे साहित्य विकणारे, फूलवाले, मालावाले, न्हावी, नावाडी, रिक्षावाले, पुजारी जवळपास सर्वच समाजाच्या लोकांना कुंभमेळ्यामुळे रोजगार मिळतो आहे. एवढंच काय विमान सेवा, रेल्वे, राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय सेवेमुळे देशाची आर्थिक प्रगती होण्यासाठीसुद्धा हातभार लागतो आहे. हा विचार ज्येष्ठ काँग्रेस अध्यक्षांनी बोलताना करायला हवा होता. नंतर त्यांनी माफी मागितली, याला काहीच अर्थ नाही. आज कितीतरी काँग्रेस नेते पक्षाच्या नावाखाली नाही तर वैयक्तिकदृष्ट्या कुंभस्नान करीत आहेत. शेवटी एकच सांगायचं आहे. गंगेत स्नान केल्यावर गरिबी दूर होते का? किंवा गंगेत स्नान केल्यावर पाप धुतले जात का हा प्रश्नच करायला नको. एवढाच विचार करावा, आज गंगा आमच्याच देशात आहे आणि ती पवित्र आहे आणि राहतेसुद्धा. माझ्याकडे २५ वर्षांपासून गंगा आहे. तिला वास नाही किंवा घाण नाही, त्यात अळ्या नाही, म्हणून खडगेजी कुंभमेळ्यामुळे भलेही गरिबी तुमच्या दृष्टीने दूर नसेल होणार, पण रोजगार तर नक्कीच मिळतो आहे आणि लोक कुंभमेळ्याच्या पावन पर्वाचा आनंद घेत आहेत. चुकीची व्यक्तव्य करायची आणि माफी मागायची याला काहीच अर्थ नाही. गंगेबद्दल आणि पवित्र कुंभमेळ्याबद्दल आपल्या भावना किती संकुचित आहे, हे दिसून आले आहे. गंगेचे पवित्र्य आणि कुंभमेळ्याचे पावित्र्य समजायला मन गंगेसारखं निर्मळ हवे असते. ▮



**शिरीष पटवर्धन**/९४२२११००१५

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल अ‍ॅड्रेस
tbedit2016@gmail.com

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

# राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उद्या हदगावात

**तभा वृत्तसेवा**
**हदगाव,दि. ३१ जानेवारी**

महाराष्ट्र राज्याचे यशस्वी व लोकप्रिय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे येत्या २ फेब्रुवारी रोजी सकाळी नागपूरहून थेट हेलिकॉप्टर द्वारे हदगाव येथे साडेअकराच्या सुमारास हदगावात नवपर्व व कलशारोहण कार्यक्रमास उपस्थित राहणार असल्याची माहिती अविनाश ठाकरे यांनी पत्रकार परिषदेत दिली असून मुख्य कार्यक्रमास उपस्थित राहिल्यानंतर लगेच त्यांची रवानगी नागपूरला होईल असे कळविले. यावेळी आ. बाबुराव कदम कोहळीकर ,संभाराव लांडगे, बबन कदम, राजू तावडे, बबन माळोदे, तातेराव वाकोडे, भागवत देवसरकर, शेखर कदम, व्यंकटेश लोणे, निळू पाटील कल्याणकर, उमाकांत भोरे ,आनंदराव भंडारे , बाळा पाटील, सूर्यकांत हनवते, नंदकुमार वारकड, अमोल मोरे, बाळू शंकुरवार यांच्यासह भाजपाचे पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.



हदगाव येथील देव उखळी आश्रमाचे कै. महंत दत्ता बापू यांच्या संकल्पनेतून सुरू झालेल्या श्रीकृष्ण मंदिराचे काम विद्यमान मठाधिपती महंत योगीराज बापू यांनी भक्तगणांची व सर्व भाविक नागरिकांच्या सहकार्याने पूर्णतत्त्वास नेले आहे.२६ जानेवारी पासून या महोत्सवाला सुरुवात झाली असून १ फेब्रुवारीला शोभायात्र व २ फेब्रुवारीला कलशारोहण सोहळ्यास राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे उपस्थित राहणार असल्याची माहिती अविनाश ठाकरे यांनी यावेळी दिली .

# पीएमएवाय-यु घरकुल योजनेचे थकीत अनुदान येत्या दोन दिवसात लाभार्थ्यांच्या खात्यावर : नगराध्यक्ष दोसानी

**तभा वृत्तसेवा**
**माहूर,दि. ३१ जानेवारी**

सन २०१८ मध्ये माहूर शहरात नगरपंचायतच्यावतीने सुरू करण्यात आलेल्या पीएमएवाय - यु अर्थात पंतप्रधान घरकुल योजना शहरीचे मंजूर चार डीपीनूसार एकूण १ हजार १०३ लाभार्थी असून ,सर्वांचेच उर्वरित अनुदान दिर्घकालावधीपासून रखडले होते. विशेषतः प्रथम डीपीतील मंजूर ८२ लाभार्थ्यांचे अनुदानाचे १ लाख ४० हजार रुपयांचे हप्ते तीन टप्प्यांत वाटप करण्यात आल्यानंतर सप्टेंबर २०१९ पासून तब्बल सव्वा पाच वर्षांपासून उर्वरित १ लाख १० हजार रुपयांचे अनुदान रखडले होते. सर्वच लाभार्थ्यांना रखडलेल्या उर्वरित अनुदानाची चातकाप्रमाणे प्रतीक्षा होती. मात्र ही प्रतीक्षा आता संपली असून, येत्या दोन दिवसात थकीत हप्ते लाभार्थ्यांच्या बँक खात्यात जमा होणार असल्याची माहिती नगराध्यक्ष फिरोज दोसानी यांनी दिली आहे.



माहूर शहरात नगरपंचायतच्यावतीने आतापर्यंत राबविण्यात आलेल्या मंजूर चार डीपीनूसार एकूण १ हजार १०३ लाभार्थी आहेत. या योजने अंतर्गत काही लाभार्थ्यांना घरकुल बांधकाम करण्याकरिता अनुदानाचे ४० हजार,४० हजार व ६० हजार रुपये असे मिळून १ लाख ४० हजार रुपयांचे तीन हप्ते देण्यात आले तर काहींचे पहिल्याच हप्त्यावर काम थांबले होते.त्यामुळे वेळेवर उर्वरित रक्कम लाभार्थ्यांच्या बँक खात्यात जमा न झाल्याने बांधकाम ठप्प झाले.शासनाकडून आज ना उद्या उर्वरित अनुदान मिळेल या आशेवर काहींनी पदरमोड व उसनवारी करून बांधकाम पूर्ण केले. मात्र तब्बल सव्वा पाच वर्षांपासून अनुदान मिळाले नसल्याने ते कर्ज बाजारी झाले. लाभार्थ्यांचे रखडलेले उर्वरित अनुदान त्यांना मिळावे यासाठी म्हाडा - शासनाकडे नगराध्यक्ष फिरोज दोसानी,मुख्याधिकारी विवेक कांदे, उपनगराध्यक्ष नाना लाड, व नगरसेवकांनी सुरवातीपासूनच पाठपुरावा केला होता.परंतु, शासनाकडून अनुदान मिळण्यासाठी प्रचंड विलंब होत होता.मात्र आता ही दिर्घ प्रतीक्षा संपली असून, येत्या दोन दिवसात ज्या लाभार्थ्यांचे बांधकाम झाले आहे,किंवा ज्यांचे काम प्रगती पथकावर आहे त्या सर्व लाभार्थ्यांचे थकीत अनुदान त्यांच्या बँक खात्यात जमा होणार असल्याची माहिती नगराध्यक्ष फिरोज दोसानी यांनी दिली आहे. दरम्यान, PMY U २.० अर्थात पंतप्रधान घरकुल योजना शहरी २.० गरीब आणि मध्यमवर्गीय कुटुंबांना पक्की घरे देण्याची ही शासनाची महत्त्वाकांक्षी योजना असून, सप्टेंबर २०२४ पासून सुरू करण्यात आलेल्या या योजनेतून ३१ ऑगस्ट २०२९ पर्यंत पात्र लाभार्थ्यांना आर्थिक सहाय्य देऊन पुढील पाच वर्षांत परवडणारी घरे उपलब्ध करून देण्याचे सरकारचे उद्दीष्ट आहे. माहूर नगरपंचायतकडून प्रधानमंत्री आवास योजना शहरी २.० ही राबविण्यात येत असून, त्यासाठी शासन निकषानुसार पात्र नागरीकांनी सर्व कागदपत्रांसह नगरपंचायतकडे तातडीने अर्ज सादर करावा असे आवाहन देखील यावेळी माहिती देताना नगराध्यक्ष दोसानी यांनी केले आहे.

## संक्षिप्त वृत्त

### चिटमोगरा जि. प. शाळेत वार्षिक स्नेह संमेलन



**नायगाव**-काळाच्या ओघात ग्रामीण भागातील बालकांना त्यांच्या मधील आसलेल्या सुप्तगुणांना बाल वव्यापासून चालना मिळावी व त्यांच्यातील आत्मविश्वास निर्माण व्हावा याअनूषंगाने चिटमोगरा येथील जिल्हा परिषद शाळेतील मुख्याध्यापक शिक्षकांनी वृद्धांच्या नेतृत्वाखाली ७६ व्या प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून. दर वर्षाप्रमाणे या ही वर्षी दि.२९ जानेवारी रोज बुधवार सायंकाळी ७ वा. येथील शाळे च्या पटांगणा मध्ये वार्षिक स्नेह संमेलन आयोजित करण्यात आले. यावेळी स्नेह संमेलनाच्या कार्यक्रमाला उद्घघाटक देगलूर बिलोली विधानसभे चे आमदार जितेश अंतापुरकर यांची विशेष प्रमुख उपस्थिती होती. सर्व प्रथम भाजपाचे देगलूर बिलोली विधानसभेचे आमदार जितेश अंतापुर करांच्या हस्ते. स्त्री शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवणारी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यां च्या प्रतिमेचे पूजन व पुष्प अर्पण करून अभिवादन केले. तद्नंतर स्नेह सम्मेलन कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. विद्यार्थ्यांनी आपल्या अंगी असलेले कलागुणांचे रंगमंचावर सादरीकरण केले. यावेळी आमदार अंतापुर कर म्हणाले की विकासाची काम तर होतच राहतील परंतु विशेष करून विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षणासह त्याच्यांतील सुप्त कलागुणांना वाव मिळाले पाहिजे. यासाठी त्यांना कुठे काही कमी पडता कामा नये जसे पश्चिम महाराष्ट्र मध्ये प्रत्येक घराघरांमध्ये अधिकारी व कला कार घडविले जातात त्याच पद्धतीने महाराष्ट्रामध्ये देगलूर बिलोली मतदार संघामध्ये सुद्धा चमत्कार घडला पाहिजे. म्हणून मी प्रत्येक घराघरात अधिकारी व कर्मचारी व्हावे यासाठी मी सतत प्रयत्नशील राहील. असे ते या वेळी म्हणाले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी चिटमोगरा नगरीचे प्रथम नागरिक सरपंच आकाश कोकणे होते. उद्घघाटक म्हणून जितेश अंतापुरकर होते.रामतीर्थ ठाण्याचे साह्यक.पोलीस निरिक्षक.श्रीधर भागवतराव जगताप, फुले शाहू आंबेडकर क्रांती मंच संस्थापक अध्यक्ष भास्कर भेदेकर, चेअरमन श्याम मजगे,बीट जमदार शिवशंकर शिंदे,मोहन पेंडल वाड, किनाळा येथील सरपंच विठ्ठल माने, हिप्परगामाळ येथील सरपंच तिरूपती डाखोरे, कोलमकर , शालेय समितीचे अध्यक्ष श्रीहरी मेहेत्रेआदि मान्यवरांची उपस्थिती होती. यावेळी शिक्षक वृंद मुख्याध्यापक आशोक बावणे, जोशी मॅडम, झुंजारेसर, दुडे सर, स्वामी मॅडम, संतोष खराडे सर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अनिल गायकांबळे यांनी केले.

### लोणी यात्रेत अवैध दारू विक्रीवर मरखेल पोलिसांची कारवाई



**देगलूर**-देगलूर तालुक्यातील मरखेल पोलीस स्टेशन अंतर्गत येणाऱ्या अवैध धंदे बंद करण्याच्या दृष्टिने पोलीस निरीक्षक रवि हुंडेकर यांच्या मार्गदर्शनाखाली अवैध धंद्यावर धाडी टाकत कारवाई कली जात आहे. परंतु२८ जानेवारी रोजी लोणी यात्रेत विनापरवाना दारू अड्ड्यावर धाडी घालून केलेल्या कारवाईत १८ हजार ६७०रुपायची अवैध दारू जप्त केली आहे. देगलूर तालुक्यातील लोणी येथील राज्याच्या सीमेवर असल्याने या ठिकाणी कै.नारायण महाराज मठ संस्थान या निमित्ताने लोणी मध्ये मोठी यात्रा भरली जाते या परिसरातील मोठ्या संख्येने नागरिक या यात्रेमध्ये सहभागी होतात या यात्रेमध्ये मरखेल स्टेशनचे पोलीस निरीक्षक रवी हुंडेकर यांच्या मार्गदर्शनाखाली यात्रेमध्ये अवैध दारू विक्री करू नये असे सूचना दिल्यानंतर सुद्धा लोणी बसस्थानक शेजारी बेकायदेशीररित्या अवैध दारू टिन पत्राच्या हॉटेलमध्ये विक्री होत असलेली गुप्त माहिती मरखेल पोलीसांना मिळाल्यानंतर मरखेल पोलीसांनी अचानकपणे धाड टाकुन अवैध दारू विनापरवाना बेकायदेशीरित्या साठवलेली दारू एम. सी. १९ बाटल्या, देशी दारूचे बॉक्स जप्त केली आहे. त्यांची एकूण किंमत १८ हजार ६७० एकूण मुद्देमाल जपु करण्यात आला आहे. पोलीस कॉन्स्टेबल सचिन गिरी यांच्या फिर्यादीवरून धोंडू बाई किशवे, हॉटेलचालक लिंगुराम यादव गुडलिंगु हे दोघेही रा. लोणी यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस निरीक्षक रवी हुंडेकर, पो. कॉ. रवींद्र भुले, सचिन गिरे, राजीव लोखंडे, पुढील तपास बिट जमादार अहमद बारी शेख यांनी करीत आहे. पोलीस निरीक्षक रवी हुंडेकर यांनी मरखेल पोलीस स्टेशनचा पदभार घेतल्यापासून अवैध धंद्यावर कारवाईचा सपाटा सुरू केला असून अवैध धंद्याचे धाबे दणाणले असल्याचे दिसून येत आहे.

तरुण भारत
वार्ताहर नेमणे आहे
नांदेड जिल्ह्यातील **कुंडलवाडी, तामसा,**
या गावांमध्ये एजंट व वार्ताहर तात्काळ नेमणे असून अनुभव असणाऱ्यास प्राधान्य देण्यात येईल.
------------------------------------------
**कार्यालय - दै. तरुण भारत**
**जनता मार्केट, शिवाजीनगर, नांदेड**
**मो. नं.** 9850952439

# आलूरच्या बालाजी मुत्तेपवारचा गाढव ठरला सर्वात 'देखणा'

**तभा वृत्तसेवा**
**बिलोली,दि. ३१ जानेवारी**

तालुक्यातील सगरोळी येथील कृषी विज्ञान केंद्र आयोजीत कृषी तंत्रज्ञान महोत्सवात शुक्रवार (दि.३१) रोजी पशु प्रदर्शन व येथील धर्मा डाँकी सँच्यूअरी या संस्थेतर्फे देखणा व सुदृढ गाढव स्पर्धेचे आयोजन केले होते. यामध्ये आलूर (ता.देगलूर) येथील बालाजी मुत्तेपवार यांच्या गाढवाने प्रथम, सगरोळी (ता.बिलोली) येथील दत्ता इबितवार व संजय इबितवार यांच्या गाढवाने अनुक्रमे द्वितीय व तृतीय पारितोषिक मिळवत सदृढ व देखणा गाढव हा मान मिळविला आहे.

येथील तीन दिवसीय कृषी तंत्रज्ञान महोत्सवात शेवटच्या दिवशी पशु प्रदर्शन व देखणा गाढव स्पर्धेचे आयोजन केले होते. यामध्ये शेतकरी व पशु पालकांनी गाय, म्हैस, बैल, शेळी, अश्व, कोंबड्या व विविध जातीचे श्वान प्रदर्शनात आणली होती. परंतु या स्पर्धेचे मुख्य आकर्षण हे देखणा व सुदृढ गाढव स्पर्धेचे ठरले. प्रथमच धर्मा डाँकी सँच्यूअरी संस्थेने या स्पर्धेचे आयोजन केले होते. त्यास गाढव पालकांनी प्रतिसाद दिला. यावेळी ४२ गाढव स्पर्धेत सहभागी झाली होती. पशुवैद्यक डॉ. निहाल मुल्ला, डॉ. संजय आलमवार, डॉ. अजय कचरे, डॉ. व्यंकट जाधव, डॉ.स्नेहा स्वामी व डॉ. अक्षय मुसळे यांनी गाढवांचे परीक्षण करून निकाल जाहीर केला. विजेत्यांना धर्मा डाँकी सँच्यूअरी संस्थेचे संचालक रोहित देशमुख यांच्या हस्ते रोख पारितोषिक देऊन गौरविण्यात आले. कमी कालावधी व प्रथमच या सर्धेचे आयोजन केल्यानंतरही गाढव पालकांनी चांगला प्रतीसाद दिला, पुढील वर्षी या स्पर्धेची व्याप्ती मोठ्या प्रमाणात करण्यात येऊन गाढव पालकांना प्रोत्साहन देण्यात येईल असे रोहित देशमुख यांनी सांगितले. यावेळी पशु संवर्धन विभागाचे उपायुक्त डॉ. राजकुमार पडिले व जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी डॉ. प्रवीण घुले यांनी भेट देऊन पाहणी करून कौतुक केले.



येथील धर्मा डाँकी सँच्यूअरी ही संस्था गत २० वर्षांपासून गाढवांचे उपचार व पशुपालकांमध्ये जनजागृती करण्याचे कार्य करीत आहे. कष्टाळू व दुर्लक्षित असलेल्या गाढवांची निगा उत्तम प्रकारे ठेवण्यास प्रोत्साहित करण्यासाठी या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले असल्याचे संस्थेतर्फे सांगण्यात आले.

# इसापूर प्रकल्पाचे पाणी सहस्त्रकुंडपर्यंत पोहचतच नाही!

## प्रकल्पाचे पाणी पैनगंगेत सोडा अन्यथा आमरण उपोषणाचा इशारा

**तभा वृत्तसेवा**
**इस्लापूर,दि. ३१ जानेवारी**

इसापूर प्रकल्पातून पैनगंगानदी पात्रात पाणी सोडण्यात यावे, अशी मागणी या भागातील नागरिक सातत्यानं करीत आहेत. प्रशासनाने वेळेवर दखल घेतली नाही, म्हणून येत्या २ तारखेपर्यंत पैनगंगेत पाणी सोडण्यात यावे. अन्यथा ३ फेब्रुवारीपासून नदी पात्रात आमरण उपोषण करण्यात येईल. असा इशारा नदीकाठावरील नागरिकांनी दिला आहे.



पैनगंगा नदीकाठावरील परोटी, परोटीतांडा, इस्लापूर, वाळकी, रोडानाईक तांडा, नंदगाव, कोल्हारी, मुरली, परोटीवन, इरेगाव, सोनदाबी, बोरीवन, मंगरूळ, रिठ्ठा, नंदगाव तांडा, सहस्त्रकुंड, आदि गावांच्या ग्रामपंचायतींच्या ठराव व उपरोक्त मागणीच्या संदर्भाने इसापूर प्रकल्पांच्या डाव्या कालव्यातून ५ टीएमसी पाणी सोडण्यात आले होते, परंतू सदरचे पाणी सहस्त्रकुंड पर्यत आलेच नाही. या अगोदरही या भागातीलनागरीकांनी यवतमाळ चे पालकमंत्री, नांदेड चे पालक मंत्री, जलसंपदा मंत्री, राज्यमंत्री, जिल्हाधिकारी यांना निवेदने सादर करून पाण्याची मागणी केली होती.

परंतु शासन व प्रशासनाने उपरोक्त बाबीची खऱ्या अर्थानं गंभीर नोंद घेतली नाही.

**नळ योजनाही बंद होण्याच्या मार्गावर**

पैनगंगा नदीतच पाणीच नसल्याने नदीवरून चालविण्यात येणाऱ्या नळ योजनाही बंद पडण्याच्या मार्गावर आहेत. जनावरांसह जनतेच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न अतिशय गंभीर स्वरूपाचा बनत चालला आहे. शासन व प्रशासन स्तरावर या बाबीची गंभीर दखल घेऊन तात्काळ इसापूर प्रकल्पातून पैनगंगा नदी पात्रात पाणी सोडण्यात यावे. अन्यथा सहस्त्रकुंड येथील जुन्या पाण्याच्या टाकीजवळ नदी पात्रात आमरण उपोषणाचा इशारा गावकऱ्यांनी दिला आहे.

# आळणी बुवा मठ संस्थान धनेगाव तारातीर्थ येथे भाविकांची अलोट गर्दी



**तभा वृत्तसेवा**
**नवीन नांदेड,दि. ३१ जानेवारी**

आळणी बुवा मठ संस्थान तारातीर्थ धनेगाव येथे दिनांक ३० जानेवारी रोजी पंचक्रोशीतील हजारो भाविक भक्तांनी मोठ्या संख्येने दर्शनास अलोट गर्दी केली होती.

आळणी बुवा मठ संस्थान तारातीर्थ हे गेल्या हजारो वर्षापासून नांदेड येथील गोदावरी नदीकाठी वसलेले असून या ठिकाणची पारंपारिक प्रथा संत चरण राजदास श्री बाळगीरजी पंचगिरी (गौतमाश्रमी) श्री रावसाहेब महाराज यांच्या वतीने चालत आहे. तेव्हा येतील आळणी बुवा मठ संस्थान येथे दिनांक ३० जानेवारी रोजी पहाटे ५ ते ८ रुद्र अभिषेक श्री यदुबन गंभीर बन महाराज कोलंबीकर यांच्या शुभहस्ते पार पडले. यावेळी रावसाहेब महाराज यांच्या वतीने या ठिकाणी आलेल्या प्रमुख अतिथी महंत संत तसेच राजकीय क्षेत्रातील माजी जिल्हा परिषद सदस्य मनोहर पाटील शिंदे यांचेही शाल व पुष्पहार घालून स्वागत करण्यात आले.त्यानंतर १० ते ४ महाप्रसाद व दुपारी १२ ते ३ या दरम्यान तारतीर्थ येथे महात्मा ह.भ.प. सखाराम महाराज सुकळीकर व ह.भ.प. हरी महाराज येळेगावकर यांच्या कीर्तनाचा कार्यक्रम पार पडला यावेळी पंचक्रोशीतील भाविक भक्तांनी सदरील किर्तन व महाप्रसादाचा लाभ घेतला.यावेळी नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोळकर यांच्या मार्गदर्शनाखाली कडेकोट बंदोबस्त करण्यात आला होता.

# राधिका रस्तोगी यांनी घेतले श्री रेणुका मातेचे दर्शन



**तभा वृत्तसेवा**
**माहूर,दि. ३१ जानेवारी**

राज्य शासनाच्या प्रधान सचिव अपील व सुरक्षा गृह विभाग तथा राज्याच्या पालक सचिव श्रीमती राधिका रस्तोगी यांनी दि.३० जानेवारी रोजी माहूरगडावर येऊन श्री रेणुकादेवी मंदिरात मातेचे दर्शन घेत महाआरती केली. यावेळी सहाय्यक जिल्हाधिकारी तथा श्री रेणुकादेवी संस्थानच्या सचिव मेघना कावली, धर्माबादच्या उपविभागीय अधिकारी स्वाती दाभाडे, माहूरचे तहसीलदार तथा संस्थानचे कोषाध्यक्ष किशोर यादव यांचेसह संस्थानचे विश्वस्त चंद्रकांत भोपी व संजय कान्नव यांचे सह पुजारी मंडळाकडून त्यांचा संस्थानच्या कार्यालयात हृदय सत्कार करण्यात आला.

राज्याच्या प्रधान सचिव श्रीमती राधिका रस्तोगी ह्या मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या १०० दिवसांच्या कार्यक्रमांतर्गत नांदेड जिल्हा दौऱ्यावर असून, या दौऱ्यात सुशोभीकरणाची कामे,पर्यटन विकास, जिल्हा विकास आराखडा यासह इतर विकास कामांच्या पाहणी दौऱ्यातून वेळ काढत त्यांनी दि.३०रोजी माहूर गडावरील श्री रेणुकादेवीच्या दरबारी उपस्थिती लावून श्री रेणुका मातेचे दर्शन घेऊन महाआरती केली.

यावेळी प्रधान सचिव श्रीमती राधिका रस्तोगी यांनी माहूरगडावर सुरू असलेल्या लिफ्ट आणि स्काय वॉकच्या कामाची पाहणी केली. तसेच सहाय्यक जिल्हाधिकारी मेघना कावली, उपविभागीय अधिकारी स्वाती दाभाडे,तहसीलदार किशोर यादव यांचेसह संस्थानचे विश्वस्तांसोबत विकास कामांबाबत चर्चा करून माहिती घेतली.



**इस्लापूर- येथुन जवळच असलेल्या वाळकी येथे गजानन मोहिते यांच्या घराला आग लागून घरातील सर्व साहित्य खाक झाले. या आगीमुळे गजानन मोहिते यांचे कुटुंब उघड्यावर आले असून शासनकडून त्यांना नुकसान भरपाई मिळावी अशी मागणी ग्रामस्थांकडून होत आहे.**

# श्रीमती आर. जी. वैराळे मल्टीस्टेट को-ऑप क्रेडिट सोसायटीत पिग्मी एजंटांची फसवणूक ; करोडोचा घोटाळा

**तभा वृत्तसेवा**
**लोहा,दि. ३१ जानेवारी**

शहरातील श्रीमती आर. जी. वैराळे मल्टीस्टेट को. ऑप. क्रेडीट सोसायटीमध्ये जवळपास १ कोटी रुपयांचा घोळ झाल्याची तक्रार ८ पिग्मी एजंटांनी पोलीस अधिक्षक नांदेड यांच्याकडे दिली आहे.

लोहा येथील श्रीमती आर. जी. वैराळे मल्टीस्टेट को. ऑप. क्रेडीट सोसायटी कार्यरत होती. त्यात पिग्मी एजंट या पदावर सचिन भानुदास मुडसे, मंगेश मारोती वंजारे, शेख सिकदर शेख बाबु, हनमंत मनोहर कागणे, गोविंद हरीभाऊ पवार, अनिल किशनराव वट्टमवार हे कार्यरत होते. सोसायटीने त्यांना दाखवलेल्या कमिशनच्या लोभात अडकून त्यांनी अनेक सदस्य बनवले. पण त्यांना मिळणारा कमिशनचा भाग आणि गुंतवणुकदारांना मिळण्याचा हक्क मिळत नव्हता. तेंव्हा सध्याचे या सोसायटीचे अध्यक्ष अमोल बाजीराव ढगे, सचिव गजानन उत्तमराव शिंदे, उपाध्यक्ष मनोजकुमार श्रावण दिवेकर, लोहा शाखाचे अध्यक्ष सुनिल भानुदास मैड, सदस्य गौतम गुणाजीराव वैराळे, आत्माराम रामजी मानुरकर, त्र्यंबक हनमंतराव पाटील, दत्ताहरी बाबाराव कदम, हिरामण दशरथ घोरबंद, ऐश्वर्या अमोल ढगे, लताबाई बालाजी ढगे आणि विनोदकुमार बद्रीनारायण धुत यांच्याकडे अनेक वेळा तक्रार करुन तोडगा काढण्यासाठी चर्चा केली यांच्या सोबत फसवणुकीची केली या प्रकरणात कोणीच प्रतिसाद दिला नाही. सर्व एजन्टानी मिळुन पोलीस अधिक्षक नांदेड यांच्याकडे तक्रार केली.



वेगवेगळे अर्ज देवून यात असे म्हटले आहे की, तुमच्या कमिशनपेक्षा २ टक्के जास्त कमीशन देवू तसेच खातेदारांना अर्थात गुंतवणूकदारांना १२ टक्केऐवजी १५ ते १८ टक्के परतावा देवू परंतू असे काही घडले नाही. आणि आमची फसवणूक झाली असल्याचे यात नमूद केले आहे. आपल्या अर्जात अर्जदारांनी २०१७ ते २०२२आणि सन २०१३ ते २०१७ या कालखंडात कोणते कार्यकारी मंडळ सोसायटीत कार्यरत होते? यांचा पुरावा सादर केला.

हि तक्रार लोहा पोलिस स्टेशनला वर्ग केली आहे पोलिस निरीक्षक आयलाने काय तपास करुन कोणता निर्णय घेतील याकडे एजन्टचे लक्ष लागले आहे पण शहरातील खातेदारात खळबळ उडाली आहे शहरातील अनेक खातेदारानी क्रिडेट को.ऑफ सोसायटी जाऊन आपल्या ठेविली चौकशी करत आहेत.

# आमदार केराम यांच्या नेतृत्वाखाली शहराचा कायापालट : व्यंकट नेमानीवार

**तभा वृत्तसेवा**
**किनवट,दि. ३१ जानेवारी**



विकासाच्या माध्यमातून शहराचा आणि मतदारसंघाचा कायापालट करणाऱ्या भाजपाचे आमदार भीमराव केराम यांना पुन्हा आमदार म्हणून निवडुन देणे म्हणजे ,त्यांनी त्यांच्या कार्यकाळात केलेल्या विकास कामांची पावती असल्याचे मत भाजपचे या प्रभागाचे माजी नगरसेवक, न.पा.चे माजी उपाध्यक्ष व्यंकट गोपालराव नेमानीवार यांनी केले आहे. किनवट शहरातील श्रीराम नगर प्रभागात आयोजित सत्कार समारंभात नवनिर्वाचित आमदार भीमराव केराम यांचा प्रभागातील नागरिकांकडून सत्कार करण्यात आले.या कार्यक्रमाचे आयोजन बालाजी न्यालाम वार,गोविंद पत्तेवार राम ओद्दीवर कृष्णा कलकुंटलवार व त्यांच्या सहकाऱ्यांनी केले.तर या वेळी माजी नगराध्यक्ष आनंद मच्छेवार, शिवा कयातमवार,राजु कलकुंटलवार, सतिष बिराजदार, सुनील मछेवार, दिलीप रामचेत्तिवार दगुलवार,बालाजी मादसवार साईं गोपाल तीरमानवर आदींची उपस्थिती होती.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# तीन विद्यार्थीनींची धावत्या ऑटोतून उडी

## एकीचा मृत्यू, दोघी गंभीर जखमी, शासकीय रूग्णालयात उपचार सुरू



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ३१ जानेवारी**

हिंगोली ते नर्सी नामदेव मार्गावर राहोली पाटी शिवारात धावत्या ऑटो क्रमांक एमएच ३८ डब्लू ०५९५ मधून अचानक तीन विद्यार्थीनींनी उडी मारली. त्यामध्ये एका विद्यार्थीनीचा मृत्यू झाला असून दोघी गंभीर जखमी झाल्या आहेत. त्यांना उपचारासाठी हिंगोलीच्या शासकीय रूग्णालयात दाखल करण्यात आले असून एकीवर प्राथमिक उपचार करून पुढील उपचारासाठी नांदेडला हलविण्यात आले आहे. या मुलींनी धावत्या ऑटोतून उडी का मारली याचे कारण अद्याप समजू शकले नाही. दरम्यान माजी आ. डॉ संतोष टारफे, आदिवासी युवक कल्याण संघाचे जिल्हाध्यक्ष डॉ सतीश पाचपूते यांनी जखमी मुलीची रूग्णालयात भेट घेतली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहीतीनुसार हिंगोली शहरातील एका महाविद्यालयात इयत्ता अकरावी वर्गात शिक्षण घेणाऱ्या तीन विद्यार्थीनी शुक्रवार दि ३१ जानेवारी रोजी दुपारच्या सुमारास हिंगोली येथून ऑटो क्रमांक एमएच ३८ डब्लू ०५९५ एका विद्यार्थीनीच्या बहिणीकडे जात होत्या. सदर ऑटो हिंगोली ते नर्सी नामदेव मार्गावर राहोली पाटी शिवारात आल्यानंतर त्यापैकी अंजना तुकाराम कऱ्हाळे रा पार्डी ता कळमनुरी हिने अचानक धावत्या ऑटोतून उडी मारली. त्यामुळे घाबरलेल्या दोघींनीही धावत्या ऑटोतून उडी मारली. यामध्ये अंजनासह अन्य दोघी रस्त्यावर पडून गंभभर जखमी झाल्या. सदर प्रकार त्याठिकाणी असलेल्या गावकऱ्यांच्या लक्षात आला. या घटनेची माहीती मिळताच हिंगोली ग्रामीण पोलिस ठाण्याचे सहाय्यक पोलिस निरीक्षक शामराव डोंगरे, महिला पोलिस उपनिरीक्षक श्रीदेवी वग्गे, जमादार सुधीर ढेंबरे, असलम गारवे, नंदकुमार जाधव, प्रकाश कांबळे यांच्या पथकाने तातडीने घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांनी नागरिकांच्या मदतीने तिघींना उपचारासाठी हिंगोलीच्या शासकीय रूग्णालयात दाखल केले. मात्र अंजना हिचा मृत्यू झाल्याचे वैद्यकीय अधिकाऱ्यांनी जाहीर केले.

या घटनेची माहीती मिळताच माजी आ. डॉ संतोष टारफे, डॉ सतीश पाचपूते यांनी जिल्हा रूग्णालयात धाव घेतली तसेच पाहणी केली.

दोन जखमी विद्यार्थीनींवर प्राथमिक उपचार करण्यात आले असून एकीची प्रकृती गंभीर असल्याने तिला पुढील उपचारासाठी नांदेड येथे हलवण्यात आले आहे. या विद्यार्थीनींनी ऑटोतून उडी का मारली हे अद्यापही स्पष्ट झाले नाही. पोलिस ऑटो चालकाची चौकशी करीत आहेत.

### हिंगोलीत वसतीगृहातील मुली असुरक्षित?

येथील समाज कल्याण विभागांतर्गत आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक संवर्गातील मुलींच्या वसतीगृहातील सतरा वर्षीय अल्पवयीन विद्यार्थीनी पोर्णिमा विलास कांबळे रा उमरखोजा ता हिंगोली ही बारावी वर्गात शिकत होती. तिच्याच गावातील अजय लक्ष्मण मोरे रा उमरखोजा हा वारंवार फोन करीत होता. तसेच वसतीगृहाच्या परिसरात येत होता. त्याच्या दबावामुळे पोर्णिमाने दि १८ जानेवारी रोजी गळफास घेतला. तिचे दि २८ जानेवारी रोजी नांदेड येथे उपचारादरम्यान निधन झाले. तिच्या आई-वडीलांनी दि ३० जानेवारीला सहाय्यक आयुक्त समाज कल्याण विभागाला पत्र दिले. अजय लक्ष्मण मोरे हा वारंवार मोबाईल क्र ७४४८१९१२८० वरून पोर्णिमाला तिच्या मैत्रिणींच्या मोबाईलवर फोन करीत होता. त्यामुळे प्रचंड तणावात होती. हा प्रकार वसतीगृहातील वॉर्डन किंवा प्रशासनाच्या लक्षात आला नाही का? वसतीगृह प्रशासनाने पोलिसात अद्यापही कोणतीही तक्रार दिली नाही. पोर्णिमाचे आईवडील आल्यानंतर आणि तिच्या मृत्युनंतर समाज कल्याण विभाग खडबडून जागा झाला आहे.

वसतीगृहातील मुलींचा प्रश्न आता ऐरणीवर आला आहे. शहरात शासकीय आणि खाजगी मुलींचे अनेक वस्तीगृह आहेत. शहरात काही टोळके वसतीगृहात राहणाऱ्या मुलींचा पाठलाग करीत आहेत. सतत त्यांच्या मागावर राहून त्यांची माहीती संकलीत करीत आहेत. त्यानंतर संबंधित मुलींवर दबावतंत्राचा वापर करीत असल्याचे दिसत आहे. बदनामी आणि दबावामुळे मुली अशा टोळक्यांकडे दुर्लक्ष करीत आहेत. जिल्हा प्रशासनाने या घटनांचा गांभीर्याने विचार करून शहरात ग्रामीण भागातून शिक्षणासाठी आलेल्या मुलींची सुरक्षितता निश्चित करावी अशी मागणी जोर धरू लागली आहे.

# जिल्हाधिकारी कार्यालयात सात कलमी कार्यक्रमांतर्गत स्वच्छता श्रमदान

## जिल्हाधिकारी अभिनव गोयल यांचाही सहभाग



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ३१ जानेवारी**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या शंभर दिवसात विविध अशा सात कलमी कार्यक्रमांतर्गत आज सकाळी जिल्हाधिकारी कार्यालय व परिसरात जिल्हाधिकारी अभिनव गोयल यांच्या मार्गदर्शनाखाली स्वच्छता श्रमदान कार्यक्रम घेण्यात आला.

यावेळी जिल्हाधिकारी अभिनव गोयल यांनी ही मोहिम जिल्ह्यातील सर्व कार्यालयामध्ये राबविण्यात येणार आहे. सात कलमी कार्यक्रमांतर्गत यानंतरही कार्यालय व परिसर स्वच्छता कार्यक्रम मोहिम राबविण्यात येणार असल्याचे सांगितले.

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या आतील व बाहेरील परिसरात जिल्हा प्रशासन व हिंगोली नगर परिषदेच्या संयुक्त विद्यमाने आज स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. यावेळी जिल्हाधिकारी कार्यालयाच्या परिसरात सर्व अधिकारी, कर्मचारी यांनी व जेसीबी मशीनच्या सहायाने मोठ्या प्रमाणात कचरा काढण्यात आला. त्यामुळे हा परिसर स्वच्छ दिसत आहे. काही कर्मचाऱ्यांनी जेसीबीचा आधार घेत प्रशासकीय इमारतीच्या खिडकीवर चढून स्वच्छता केली. यावेळी जिल्हाधिकारी अभिनव गोयल, निवासी उपजिल्हाधिकारी अभिमन्यू बोधवड, उपजिल्हाधिकारी मंजुषा मुथा, मुख्याधिकारी अरविंद मुंडे, उपनगर अभियंता प्रतीक नाईक, स्वच्छता निरीक्षक बाळू बांगर यांच्यासह प्रशासकीय इमारतीमधील जवळपास दीडशे ते दोनशे अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयाच्या परिसरात स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. या मोहिमेसाठी हिंगोली नगर परिषदेच्या वतीने सफाईगार कर्मचारी, जेसीबी, कचरा वाहून नेणारे वाहन आदी साहित्य उपलब्ध करुन देण्यात आले.

# सेनगाव पंचायत समितीतील कपातीच्या रकमेचे २०० पेक्षा अधिक धनादेश संशयास्पद, वैयक्तिक बँक खात्यात वटविले

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ३१ जानेवारी**

सेनगाव पंचायत समितीतील कपातीच्या रकमेचे सुमारे २०० पेखा अधिक धनादेशावर संशय व्यक्त करण्यात आला असून सदर धनादेश वैयक्तिक बँक खात्यात वटविण्यात आल्याचे प्राथमिक चौकशीत स्पष्ट झाले आहे. त्यामुळे आता बँकेकडून प्राप्त झालेल्या माहीतीवरूनच सर्व बाबी स्पष्ट होणार आहेत. तूर्तास पंचायत समितीचे काही कर्मचारी तर काही माजी पदाधिकारी संशयाच्या भोवऱ्यात आहेत.

सेनगाव पंचायत समितीअंतर्गत झालेल्या बांधकामामध्ये कंत्राटदाराकडून कपात करण्यात आलेल्या जीएसटी, कामगार विमा, १० टक्के ठेवी यासह इतर कपातीच्या रकमांची चौकशी सुरू आहे. जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, मुख्य लेखा वित्त अधिकारी दिगंबर माडे यांच्या मार्गदर्शनाखाली एका समितीकडून या प्रकाराची चौकशी सुरू आहे. यामध्ये मागील पाच वर्षात किती रकमा योग्य बँक खात्यात जमा करण्यात आले आहेत काय तसेच धनादेश कोणाच्या नावे देण्यात आले याची चौकशी केली जात आहे. यामध्ये चार सदस्य असलेल्या समितीने पंचायत समितीचे सर्व दस्तावेज तपासणी सुरू केली असून सदर काम अंतीम टप्प्यात आले आहे.

दरम्यान, मागील पाच वर्षात देण्यात आलेल्या कपातीच्या रकमेच्या धनादेशापैकी सुमारे २०० पेक्षा अधिक धनादेशावर शंका व्यक्त करण्यात आली आहे. सदर धनादेश शासकीय बँक खात्यात जमा करण्याऐवजी वैयक्तिक बँक खात्यात जाम करण्यात आल्याचा संशय असून त्यानुसार प्राथमिक चौकशीमध्ये काही धनादेश वैयक्तिक बँक खात्यात वटविण्यात आल्याचे स्पष्ट झाले आहे. तयनंतर लेखा विभागाने बँकेला पत्र देऊन या धनादेशा संदर्भात सविस्तर माहीती मागवली आहे. यामध्ये सहा बँकानी माहीती सादर करण्याचे काम सुरू केले असून काही बँकांनी माहीती सादर केली आहे. त्यातून पंचायत समितीचे काही कर्मचारी व माजी पदाधिकारी सध्या तरी चौकशीच्या फेऱ्यात अडकण्याची चिन्हे दिसू लागली आहेत. सदर अहवाल तयार करण्याचे काम सुरू असून अहवाल अंतीम टप्प्यात आल्याचेही समजते. सदर अहवाल वरिष्ठांकडे सादर केल्यानंतरच त्यावर पुढील कारवाई होणार आहे.



**हिंगोली- डॉ हेडगेवार दंत महाविद्यालयाच्यावतीने महाराष्ट्र राज्य अेओएमएसआय ११ व्या वार्षिक परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमास जिल्हाधिकारी अभिनव गोयल, आ. तान्हाजीराव मुटकुळे, पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे, डॉ चक्रधर मुंगर, हेडगेवार महाविद्यालयाचे संचालक ललीत खुराणा, हंसराज खुराणा, जगजीतराज खुराणा आदींची उपस्थिती होती. छाया- विजय गुंडेकर**

# मुलीची छेड का काढली असा जाब विचारण्यास गेलेल्या आई-वडीलांना मारहाण

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ३१ जानेवारी**

माझ्या मुलीची छेड का काढली असा जाब विचारण्यात गेलेल्या मुलीच्या आई-वडील आणि भावाला आरोपींनी लोखंडी रॉडने मारहाण करीत जातीवाचक शिवीगाळ केल्याची घटना घडली असून याप्रकरणी शहर पोलिस ठाण्यात आरोपीविरूध्द विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी आरोपींचा शोध सुरू केला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहीतीनुसार हिंगोली शहरातील एक अल्पवयीन मुलगी दि २५ जानेवारी रोजी सकाळी साडेआठ वाजण्याच्या सुमारास शहरातील इंदिरा गांधी चौक येथून जात असतांना अरबाज पठाण या तरूणाने त्या मुलीचा पाठलाग करून अश्लील बोलून निघून गेला. मात्र त्याच्या बोलण्याकडे मुलीने दुर्लक्ष केले. त्यानंतर पुन्हा त्यानेच मुलीच्या घरासमोर येऊन तिच्या आई, वडीलांना जातीवाचक शिवीगाळ केली तसेच हातपाय तोडण्याची धमकी दिली. या प्रकारामुळे त्या मुलीचे कुटुंबीय चांगलेच घाबरून गेले. त्यानंतर मुलीचे वडील, आई आणि भाऊ गुरूवार दि ३० जानेवारी रोजी अरबाज पठाण याच्या घरी जाब विचारण्यासाठी गेले असतांना त्यांना चौघांनी जातीवाचक शिवीगाळ करून लोखंडी रॉडने मारहाण केली. यावेळी मुलीच्या आईला देखील मारहाण करण्यात आली. या मारहाणीत ते जखमी झाले.

या प्रकारानंतर त्या मुलीच्या वडीलांनी थेट हिंगोली शहर पोलिस ठाणे गाठून रितसर तक्रार दाखल केली. यावरून पोलिसांनी अरबाज पठाण, गुलाब पठाण, अक्रम पठाण, सलमान पठाण यांच्या विरूध्द जातीवाचक शिवीगाळ करणे तसेच पोक्सो कायद्यांतर्गत गुन्हा दाखल केला आहे. पोलिस उपाधिक्षक ए एस भुसारे, पोलिस निरीक्षक नरेंद्र पाडळकर, सहायक पोलिस निरीक्षक संगमनाथ परगेवार, जमादार अशोक धामणे, संजय मार्के, धनंजय क्षीरसागर यांच्या पथकाने घटनास्थळी भेट दिली आहे.

# वाघजाळीत १४ वीजचोरी करणाऱ्यांवर कारवाई

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ३१ जानेवारी**

सेनगाव तालुक्यातील वाघजाळी येथे महावितरणच्या लघुदाब विद्यूत वाहीनीवर आकडे टाकून वीज चोरी करणाऱ्या १४ आकडे बहाद्दरांवर सेनगाव पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

महावितरणकडून मागील काही दिवसांपासून सेनगाव तालुक्यात वीजचोरी करणाऱ्यांविरोधात जोरदार मोहीत उघडण्यात आली आहे. ग्रामीण भागात सर्रास वीजचोरीचे प्रकार या मोहीमेत उघडकीस येत आहेत. सेनगाव, गोरेगाव, कडोळी आदी भागात ही कारवाई करण्यात आल्यानंतर वाघजाळी येथे सहाय्यक अभियता सत्यनारायण वडगावकर यांच्या पथकाने दि २६ डिसेंबर २०२४ रोजी पाहणी केली होती. काही घरामध्ये महावितरणच्या लघुदाब विद्युत वाहीनीवर आकडे टाकून वीज चोरी करतांना आढळून आले. याची दखल घेत दि २९ जानेवारी रोजी सत्यनारायण वडगावकर यांनी सेनगाव पोलिस ठाण्यात दिलेल्या तक्रारीवरून लक्ष्मण दत्तराव तांबीले, सुभाष एकनाथ तांबीले, शिवाजी तुकाराम तांबीले, सत्यभामा वसंत तांबीले, सोपान बबन तांबीले, त्र्यंबक तान्हाजी मोरे, दिगांबर पंडीत पठाडे यांच्यासह १४ जणांवर गुन्हा दाखल केला.

# रिझर्व बँकेच्या पुढाकाराने बडगद शाळेत ई-लर्निंगचे धडे

**तभा वृत्तसेवा**
**वसमत, ३१ जानेवारी**



तालुक्यातील जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळा लोकवर्गणीतून डिजिटल, ई-साक्षर होत असतानाच साखर कारखाना केंद्रातील प्राथमिक शाळा बगडद त्याच वाटचालीने काम करत आहे. म्हणतात ना प्रयत्नांती परमेश्वर मिळतात. शाळेत नुकतेच ६ महिन्यापूर्वी हजर झालेल्या धडपड्या गुरुजींनी प्रयत्न केले अन् रिझर्व बँक ऑफ इंडिया मुंबई कडून शाळेला दोन संगणक संच व एक प्रिंटर मिळाले त्यामुळे आता या शाळेतील विद्यार्थी देखील ई-लर्निगचे धडे घेवू शकणार आहेत.

बगडद शाळेतील शिक्षक समाधान शिंदे यांनी रिझर्व बँक ऑफ इंडिया मुंबई यांच्याकडे पाठपुरावा करून ही सुविधा शाळेत उपलब्ध करून घेतली. याचा उपयोग आता संगणक ओळख नसलेल्या विद्यार्थ्यांना होणार आहे शाळा ई -साक्षर झाल्यास गुणवत्तेत वाढ होणार आहे

आरबीआयकडून प्राप्त झालेले दोन संगणक संच व एक प्रिंटर स्वीकारताना शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष गुलाब शिंदे, उपाध्यक्ष चांदोजी शिंदे, ग्रामपंचायत सदस्य देवानंद कुटे, सदस्य उद्धव शिंदे, नवनाथ कुटे,गजाननशिंदे,नवनाथ शिंदे,रामाशिंदे,सीताराम कुटे, वैजनाथसावंत,साहेबराव सावंत, काशिनाथ शिंदे, प्रकाश शिंदे, डिगंबर शिंदे, कामाजी शिंदे, रघुनाथ शिंदे, मारुती शिंदे, बळीराम शिंदे, युवा प्रशिक्षक मुंजाजी शिंदे, मुख्याध्यापक सुनील मणी, समाधान शिंदे उपस्थित होते. केंद्राचे केंद्रप्रमुख श्री शिवभगत यांनी शाळेस भेट देवून अभिनंदन केले.

# जिल्हा वार्षिक योजनेच्या १८६ कोटी ५९ लाखांच्या प्रारूप आराखड्यास मान्यता

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ३१ जानेवारी**

जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) अंतर्गत सन २०२५-२६ या वर्षासाठी १८६ कोटी ५९ लाख रुपयाच्या प्रारुप आराखड्यास जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत राज्याचे अन्न व औषध प्रशासन, विशेष सहाय्य मंत्री तथा हिंगोलीचे पालकमंत्री नरहरी झिरवाळ यांच्या अध्यक्षतेखाली मान्यता देण्यात आली.

येथील जिल्हा नियोजन समितीची बैठक राज्याचे अन्न व औषध प्रशासन, विशेष सहाय्य मंत्री तथा पालकमंत्री नरहरी झिरवाळ यांच्या अध्यक्षतेखाली दूरदृश्य प्रणालीद्वारे आयोजित करण्यात आली होती. या बैठकीस विधान परिषद सदस्य डॉ. प्रज्ञा सातव, आमदार सर्वश्री तान्हाजी मुटकूळे, राजू नवघरे, पालक सचिव रिचा बागला, जिल्हाधिकारी अभिनव गोयल, मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, पोलीस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी पालकमंत्री नरहरी झिरवाळ म्हणाले की, चालू वर्षातील कामे तातडीने पूर्ण करुन निधी वेळेत खर्च करावा. पीकविमा अनुदान व अतिवृष्टीचे अनुदान देण्याची कार्यवाही राज्यस्तरावर सुरु आहे. सर्व शेतकऱ्यांच्या खात्यावर लवकरच डीबीटीद्वारे अनुदान जमा होईल. मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती भोसले यांनी शाळा व अंगणवाडी इमारतीच्या कामाचा प्राधान्यक्रम ठरवून क्रम लावावा. प्राधान्यक्रमानुसार कामे प्रस्तावित करावीत, अशा सूचना त्यांनी यावेळी केल्या. तसेच त्यांनी हिंगोली जिल्ह्यासाठी राज्याकडून जास्तीत जास्त निधी मिळविण्यासाठी एक बैठक घेऊन ठरविण्यात येईल, असे सांगितले.

जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत आरोग्य विभाग, महावितरण विभाग, शालेय शिक्षण विभाग, जलसंधारण, तीर्थस्थळ, पर्यटन स्थळ यासाठी उपलब्ध निधीचे योग्य नियोजन करुन सदर निधी लोककल्याणकारी योजना राबविण्यासाठी वेळेत खर्च करावा. तसेच सन २०२४-२५ आराखड्यातील विविध कामांवर झालेल्या खर्चाचा तसेच नियोजित प्रस्तावित खर्चाचा देखील आढावा घेतला. सर्वसाधारण वार्षिक योजना, अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती उपयोजनेतंर्गत नाविन्यपूर्ण योजनांसाठी झालेल्या खर्चाचा व नियोजित खर्चाचा आढावा घेतला. सर्व संबंधित विभागांनी सन २०२४-२५ अंतर्गत त्यांना प्राप्त झालेल्या निधीचे योग्य नियोजन करुन वेळेत खर्च करावा, अशा सूचनाही पालकमंत्री नरहरी झिरवाळ यांनी यावेळी संबंधितांना दिल्या.

यावेळी आमदार डॉ. प्रज्ञा सातव यांनी जिल्ह्यात रोजगार, आरोग्य, शिक्षण यासह सिंचन विकासावर भर द्यावा आणि जिल्ह्यातील तीर्थक्षेत्र व पर्यटन विकासामध्ये महत्वाच्या ठिकाणाचा समावेश करावा. तसेच सर्व कामे दर्जेदार व्हावीत, अशा सूचना केल्या. आमदार राजू नवघरे यांनी शाळा, अंगणवाडी इमारती, प्राथमिक आरोग्य केंद्राच्या इमारती, ग्रामीण रस्ते, सीसीटीव्ही, पीकविमा, अतिवृष्टी अनुदान तातडीने उपलब्ध करुन देण्याच्या सूचना केल्या. आमदार तानाजी मुटकुळे यांनी एमआयडीसीतील रस्ते व इतर सुविधासाठी अतिरिक्त निधीची मागणी करावी, तसेच सिंचनासाठी बंधारे बांधणे, चिरागशहा तलाव दुरुस्तीसाठी जास्तीत जास्त निधी उपलब्ध करुन देण्याची मागणी केली. लोकप्रतिनिधी व समिती सदस्यांनी दिलेल्या सूचना व मागण्याच्या अनुषंगाने सर्व संबंधित शासकीय यंत्रणेने त्याचे निरसन करावे व केलेल्या कार्यवाहीची माहिती संबंधित सदस्यांना वेळेत मिळेल याची दक्षता घ्यावी, असे निर्देशही पालकमंत्री नरहरी झिरवाळ यांनी दिले.

नियोजन विभागाने दिलेल्या कमाल आर्थिक मर्यादेनुसार सन २०२५-२६ या वर्षासाठी सर्वसाधारण वार्षिक योजनासाठी १८६ कोटी ५९ लाख तर अनुसूचित जाती उपयोजनासाठी ५२ कोटी ११ लाख आणि अनुसूचित जमाती उपयोजनेतंर्गत २३ कोटी ७९ लाख ७० हजार अशा एकूण २६२ कोटी ४९ लाख ७० हजार खर्चाच्या तयार केलेल्या प्रारुप आराखड्यास जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत मान्यता देण्यात आली.

पालक सचिव रिचा बागला यांनी जिल्ह्यातील विविध विकास कामे गतीने पूर्ण करावेत. चालू वर्षाची कामे प्रशासकीय व तांत्रिक मान्यतेची कार्यवाही तातडीने पूर्ण करुन आपणास दिलेला निधी वेळेत खर्च करावा. उर्वरित शिल्लक असलेला निधी लवकरच उपलब्ध करुन देण्यात येईल. विविध विकास कामासाठी मान्यता देण्यासाठी जागेची अडचण आल्यास ती तातडीने सोडविण्याची व्यवस्था करावी, अशा सूचना त्यांनी यावेळी केल्या.

जिल्हाधिकारी अभिनव गोयल यांनी सन २०२५-२६ चा प्रारुप आराखडा मान्यतेसाठी समितीसमोर सादर केला. तसेच सन २०२४-२५ च्या खर्चाचा सविस्तर आढावा सादर केला. तसेच सन २०२४-२५ चा निधी शंभर टक्के निधी खर्च करण्यात येईल. तसेच शासनाच्या आदेशानुसार यातील २५ टक्के निधी विकास आराखड्यावर खर्च करण्यासाठी मान्यता द्यावी, असे सांगितले. तसेच पंतप्रधान पिकविमा योजनेची रक्कम व अतिवृष्टीचे अनुदान अदा करण्याची कार्यवाही करण्यासाठी पाठपुरावा सुरु असल्याचे सांगितले.

शेवटी जिल्हा नियोजन अधिकारी ग. गो. चितळे यांनी बैठकीस उपस्थित सर्व पदाधिकारी, अधिकारी, कर्मचारी यांचे आभार मानले. यावेळी बैठकीस जिल्हा नियोजन अधिकारी ग. गो. चितळे, समाज कल्याण आयुक्त यादव गायकवाड, आदिवासी विकास विभागाचे प्रकल्प संचालक सुनिल बारसे तसेच सर्व विभागाच्या विभाग प्रमुखांची दूरदृश्य प्रणालीद्वारे बैठकीस उपस्थिती होती.

# शासकीय सोयाबीन खरेदीला मुदतवाढ द्या : खा. अजित गोपछडे

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. ३१ जानेवारी**

शासकीय सोयाबीन खरेदीस मुदतवाढ द्या या मागणीसह जिल्ह्यातील अवैध धंद्याला लगाम घालण्यासाठी कठोर उपाययोजना करा अशा सूचना देत कामचुकार अधिकाऱ्यांबाबत डीपीडीसी च्या बैठकीत खा. डॉ.अजित गोपछडेंनी प्रशासनाला धारेवर धरले. स्मशान भूमीवरील अतिक्रमणे त्वरीत हटवा, जिल्ह्यातील अवैध धंद्याला लगाम घाला. अशा अनेक लोकहिताच्या मागण्या आज नांदेड जिल्हा नियोजन समिती बैठकीत खा. डॉ. गोपछडे यांनी केल्या.

नांदेड जिल्ह्यात शासनाच्या वतीने खरेदी करण्यात येणाऱ्या सोयाबीनच्या खरेदीला मुदतवाढ



देण्यात यावी या प्रमुख मागणी सह खासदार डॉ.अजित गोपछडे यांनी प्रशासनाची कान उघाडणी केली.

जिल्ह्यातील स्मशानभूमीवरील अतिक्रमण त्वरित हटवा . जिल्ह्यातील अवैध धंदे बंद करून आरोग्य सेवेला अधिक सक्षम करण्यासाठी प्राथमिक आरोग्य केंद्राच्या इमारतींचे नूतनीकरण करा आदी मागण्या मांडल्या. जिल्हा नियोजन बैठकीत खा. अजित गोपछडे हे लोक प्रश्नांवरून आक्रमक झाले होते. पालकमंत्री अतुल सावे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या जिल्हा नियोजन बैठकीत खा. अशोकराव चव्हाण , खा. डॉ. अजित गोपछडे , खा. रवींद्र चव्हाण यांच्यासह अनेकांची उपस्थिती होती . या बैठकीत खा. डॉ. अजित गोपछडे यांनी जिल्ह्यातील लोकहिताचे असंख्य प्रश्न उपस्थित केले. पांदण रस्ते योजना का यशस्वी होत नाही असा सवाल उपस्थित करत त्यांनी अधिकाऱ्यांना धारेवर धरले. वन्य प्राण्यांचा शेतात सुळसुळाट झाल्यामुळे शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान होत आहे . त्यामुळे शेतकऱ्यांना संरक्षित करण्याच्या अनुषंगाने तातडीने पावले उचलावीत , बिलोली, देगलूर तालुक्यामध्ये सुरू असलेली रेतीची तस्करी , अवैध गौण खनिज उत्खनन त्वरित थांबवा , रात्रभर विना नंबरच्या हायवा गाड्या सुसाट धावत आहेत , त्यामुळे अनेकांच्या जीवितला धोका निर्माण झाला आहे . शिवाय शासनाचा महसूल ही मोठ्या प्रमाणात बुडतो आहे . त्या परिस्थितीवर अंकुश लावण्यासाठी वाळू माफीयांच्या नाकात वेसन घालण्यासाठी कायद्याचा बडगा उगारा अशा सूचनाही त्यांनी प्रशासनाला केल्या. जिल्ह्यातील अनेक भागात स्मशानभूमीवर अतिक्रमण सध्या मोठ्या प्रमाणात सुरू आहेत. लँड जिहाद या माध्यमातून शासकीय जमिनी बळकवणे , त्यावर कब्जा करणे , समशान भूमीच्या जागेवरती कब्जा करणे आदी प्रकार सुरू आहेत. त्यामुळे ग्रामीण भागात स्मशानभूमीचे प्रश्न मोठ्या प्रमाणात निर्माण होत आहेत. हे प्रश्न तातडीने मार्गी लावण्याचे अनुषंगाने प्रशासनाने तातडीने समशानभूमीवरील अतिक्रमणे हटवावीत अशी मागणी त्यांनी यावेळी केली.

## जि. प. शाळेला शाळा व्यवस्थापन समितीचे वावडे का?

**तभा वृत्तसेवा**
**फुलवळ,दि. ३१ जानेवारी**

कंधार तालुक्यातील फुलवळ हे जि. प. गटाचे गाव असून येथे विविध शासकीय कार्यालयाबरोबरच जि. प. ची केंद्रीय प्राथमिक शाळा असून वर्ग पहिली ते चौथी पर्यंत प्रत्येक वर्गाच्या दोन तुकड्या कार्यरत आहेत. याच शाळेतील शालेय व्यवस्थापन समिती चा कार्यकाळ संपून सहा महिने पेक्षा जास्तीचा कालावधी उलटून गेला , या शैक्षणिक वर्षातील सुद्धा सहा महिने कार्यकाळ संपून गेला परंतु अद्यापही या शाळेत नवीन शालेय व्यवस्थापन समिती गठीत केली नसल्याने सदर शाळेच्या मुख्याध्यापकाच्या कार्यप्रणालीवर प्रश्नचिन्ह उपस्थित करत पालक वर्गातून याबतीत संताप व्यक्त केला जात आहे.

सदर शाळा ही सहा शिक्षकी असून शाळेत मुख्याध्यापकाला धरून अन्य पाच सहशिक्षक कार्यरत आहेत. विशेष म्हणजे येथील मुख्याध्यापकाकडे विस्तार अधिकाऱ्याचा अतिरिक्त भार प्रभारी गटशिक्षण अधिकारी यांनी दिलेला असल्यामुळे येथील मुख्याध्यापक हे कोणत्या ना कोणत्या कामानिमित्त असो का आपली शाळा सोडून इतर शाळेच्या चौकश्यासाठी , तपासण्यासाठी हे मुख्याध्यापक नियमितच दौऱ्यावर असतात. त्यामुळे त्यांना आपल्या स्वतःच्या शाळेकडे लक्ष घालायला वेळच नसल्यागत परिस्थिती निर्माण झाल्याचे दिसून येत आहे. करण्या शिक्षण क्षेत्राताचा उद्धार स्वीकारला अतिरिक्त भार , वरिष्ठांच्या सांगण्यावरून हे गुरुजी नेहमीच दौऱ्यावर पण इथे शाळा आणि विद्यार्थी मात्र वाऱ्यावर असेच काहीसे चित्र निर्माण झाल्याचेही पालकवर्गातून बोलले जात आहे.

अडीच वर्षांपूर्वी गठीत केलेल्या शाळा व्यवस्थापन समिती चा कार्यकाळ संपून सहा महिने झाले तरीही अद्यापही नवीन शाळा व्यवस्थापन समिती निवडीसंदर्भात ना नोटीस काढण्यात आली ना गेले कित्येक महिने झाले या शाळेत पालकमेळावा घेण्यात आला. त्यामुळे हम करे सो कायदा.. अशीच ओळख निर्माण करण्याची तर येथील मुख्याध्यापकाची मानसिकता नाही ना असेही पालकांतून बोलले जात आहे.

## संक्षिप्त वृत्त



### महात्मा ज्योतिबा फुले महाविद्यालयात मराठी भाषा संवर्धन पंधरवडा साजरा

**मुखेड**-शहरातील महात्मा ज्योतिबा फुले महाविद्यालयाच्या मराठी विभाग व ग्रंथालय विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने मराठी भाषा संवर्धन पंधरवडा दि.२८ जानेवारी रोजी साजरा करण्यात आला . या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस.बी.अडकिणे तर प्रमुख पाहुणे म्हणून हिंदी विभाग प्रमुख प्रा.डॉ. एम.के.राऊत , इंग्रजी विभाग प्रमुख प्रा.डॉ. पी.ए.जोशी , संस्कृत विभाग प्रमुख प्रा.डॉ. जी.वाय. कहाळेकर हे उपस्थित होते . प्रास्ताविक मराठी विभाग प्रमुख प्रा.डॉ. डी.के.आहेर , सूत्रसंचालन प्रा.डॉ. विजय वारकड तर आभार प्रदर्शन ग्रंथपाल डॉ. अर्जुन गजमल यांनी केले . मान्यवरांच्या हस्ते ग्रंथ प्रदर्शनाचे फित कापून व महात्मा फुले यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून कार्यक्रम सुरू करण्यात आला . मान्यवरांच्या मार्गदर्शन प्रसंगी मराठी भाषा ही महाराष्ट्राबरोबरच जागतिक स्तरावर देखील आपल्या भाषेची थोरवी गात आहे . यामुळेच नुकतेच या भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाला आहे . ही सर्व मराठी भाषा प्रेमींसाठी अभिमानाची बाब आहे . या भाषेमध्ये बोलीभाषा , प्रांत भाषा , व्यहाराची भाषा आणि प्रमाण भाषा अशा विविध भूमिकेतून आपल्या ज्ञान , मनोरंजन , माहिती व तंत्रज्ञानाचा प्रचार - प्रसार वाढत आहे . या भाषेतील मौल्यवान रत्नांचा संग्रह प्रत्येक मराठी भाषिक करणे आवश्यक आहे . विविध संशोधन कार्यातून नवनवीन प्रेरणा , कर्तबगारी सिध्द करण्यासाठीच्या संधी उपलब्ध आहे असे विचार मांडले. अध्यक्षीय भाषणात प्राचार्य डॉ. अडकिणे यांनी मराठी भाषेतील गोडवा कायम ठेवला पाहिजे . या आपल्या मातृभाषेतून मिळणारे शिक्षण हे खुप मोलाची कामगिरी बजावत असते . मराठी भाषेच्या संवर्धनासाठी प्रत्येक जण सर्वतोपरी सहकार्य करावे . मराठी भाषेचे संवर्धन झाले तरच आपला इतिहास , संस्कृती व संस्कार टिकणार आहेत . त्याकरिता सर्वच स्तरातून मराठी भाषा संवर्धन करणे आवश्यक आहे . प्राथमिक ते आरोग्य शिक्षणापर्यंत सर्वच शिक्षण आता मराठी भाषेत मिळत आहे आणि इतरही शिक्षण मिळणार देखील आहेत . त्या मिळालेल्या ज्ञानाचा उपयोग सर्वांगीण विकासासाठी पूर्ण करावा असे सांगितले . यावेळी बहुसंख्येने प्राध्यापक , शिक्षकेत्तर कर्मचारी वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता .

### निवघा-तळणी सर्कल मराठी पत्रकार संघाची संयुक्त बैठक संपन्न

**निवघा बाजार**-येथे निवघा तळणी सर्कल मराठी पत्रकार संघाची संयुक्त बेठक मराठी पत्रकार संघटनेचे तालुकाध्यक्ष संजय सुर्यवंशी यांच्या उपस्थित माजी तालुकाध्यक्ष पंडितराव पतंगे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली या बेठकीतअ. भा. मराठी पत्रकार परिषेदेच्या निवघा / तळणी सर्कल अध्यक्षपदी गजानन कदम पाटील तर उपाध्यक्षपदी महेश बोरकर पाटील यांची तर कार्याध्यक्ष देवानंद महाजन, सचिव सतिष जारंडे , कोषाध्यक्ष अशोक गव्हाणे सहसचिव दिगंबर शिंदे, सदस्य शिव कदम, पंजाबराव सूर्यवंशी, सल्लागार पदी को. रा. देशमुख व रामेश्वर बोरकर, मार्गदर्शक सुदर्शन कऱ्हाळे व देविदास कल्याणकर यांची बिनविरोध निवड करण्यात आली. या वेळी तालुका अध्यक्ष संजय सूर्यवंशी, गजानन पाटील, यादव सुकापुरे, शेख जुनेद, देशमुख, रामेश्वर बोरकर, बंडू माटाळकर, देवानंद महाजन, अशोक गव्हाणे, शिवप्रसाद कदम, बाळू शिंदे, शरद कदम अदी पत्रकार उपस्थित होते.

### जिल्हा कोषागार कार्यालय नांदेड कडून नांदेड पोलिस सदानंद सपकाळे यांचा सन्मान

**नांदेड**-संचालनालय, लेखा व कोषागारे, कर्मचारी कल्याण समिती कडून विभागीय क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धा २०२५ चे आयोजन करण्यात आले होते त्या करिता कोषागारे कर्मचारी नांदेड यांना पोलिस कॉन्स्टेबल सदानंद सपकाळे यांनी सलामी व पथसंचलन याचे प्रशिक्षण देऊन तयार केले कोषागारे कर्मचारी यांनी सुंदर असे सलामी व पथसंचलन केले आणि विभागीय क्रीडा स्पर्धा मध्ये प्रथम पारितोषक आणले आहे.

# ॲड. प्रतीक केराम यांनी नगराध्यक्षपदाची निवडणूक लढवावी ; भाजप पदाधिकारी व कार्यकर्त्यांची ईच्छा

**तभा वृत्तसेवा**
**किनवट,दि. ३१ जानेवारी**

भाजपाचे युवानेते प्रतिक केराम यांच्या सूक्ष्म नियोजनबद्ध रणनीतीमुळे विधानसभा निवडणुकीत भारतीय जनता पक्षाला यश मिळाले.दांडगा संपर्क, संघटनात्मक कौशल्य लक्षात घेता युवानेते ऍड प्रतीक केराम यांनी किनवट नगराध्यक्ष पदासाठी निवडणूक लढवावी अशा अपेक्षा स्थानिक पदाधिकारी व युवा कार्यकर्ते करू लागले आहेत विकासाची दूरदृष्टी असलेला एक तरुण तडफदार नेता म्हणून शहरातील सर्वच समाजघटकातून त्यांच्या नावाला सर्वाधिक पसंती असल्याचे पदाधिकारी व कार्यकर्ते सांगत आहेत.



किनवट माहूर विधानसभेचे आमदार भीमराव केराम यांचे चिरंजीव युवानेते प्रतीक केराम हे राजकीय व सामाजिक क्षेत्रात सक्रियपणे कार्यरत असून वडिलाप्रमाणेच त्यांच्याकडेही संघटनात्मक कौशल्य आहे.भाजपाचे युवानेतृत्व म्हणून त्यांनी मागील काळात किनवट माहूर विधानसभा मतदारसंघात तरुण कार्यकर्त्याची मोठी फौज तयार करून पक्षाशी जोडली आहे. नुकत्याच संपन्न झालेल्या विधानसभा निवडणुकीत प्रतीक केराम यांच्या सूक्ष्म नियोजनामुळे व प्रचार यंत्रणेमुळे भारतीय जनता पक्षाला अभूतपूर्व यश लाभले.त्यांचे राजकीय कौशल्य, दांडगा जनसंपर्क आणि पक्ष संघटनात्मक कार्य लक्षात घेता आगामी किनवट नगर परिषदेच्या निवडणुकीत नगराध्यक्ष पदासाठी ऍड प्रतीक केराम यांनी निवडणूक लढवावी अशी इच्छा पदाधिकारी व युवा कार्यकर्ते व्यक्त करत आहेत. विकासाची दूरदृष्टी असणारा एक तरुण तडफदार युवा नेता म्हणून किनवट शहरातील सर्वच समाज घटकातुन प्रतीक केराम यांच्या नावाला पसंती असल्याचे भाजपाचे पदाधिकारी च युवा कार्यकर्त्यांकडून सांगण्यात येत आहे. प्रतीक केराम यांनी यापूर्वी विद्यार्थी दशेत असताना गोकुंदा जिल्हा परिषद गटातून निवडणूक लढविली होती. त्यावेळी अल्पशा मताने पराभव झाला.सध्या सुप्रीम कोर्टामुळे स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका लांबणीवर पडत आहेत २५ फेब्रुवारी रोजी अंतिम सुनावणी होऊन एप्रिल महिन्यात निवडणुका होण्याचा अंदाज वर्तवीला जात आहे. या पार्श्वभूमीवर राजकीय पक्ष त्यांचे नेते कार्यकर्ते व किनवट शहरवासीयांना निवडणुकीची उत्सुकता लागली असून नगराध्यक्ष पदासाठी आमदार भीमराव केराम यांचे चिरंजीव ऍड प्रतीक केराम यांचे नाव नगराध्यक्ष पदासाठी समोर येऊ लागल्यामुळे उन्हाळ्यासह राजकीय तापमानातही वाढ होताना दिसत आहे.

## प्रहार दिव्यांग संघटनेच्या वतीने संजय गांधी विभागाला घड्याळ भेट



**तभा वृत्तसेवा**
**मुदखेड,दि. ३१ जानेवारी**

प्रहार दिव्यांग क्रांती संघटना व प्रहार जनशक्ती पक्ष तालुका मुदखेड च्या वतीने दि. २६ जानेवारी रोजी प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधुन रोहिपिंपळगाव येथील जिल्हा परिषद हायस्कुल शाळेतील प्रत्येक वर्गात भिंतीवरची घड्याळ वाटप करण्यात आले. तसेच दिनांक ३० जानेवारी रोजी प्रहार महिला अध्यक्ष व प्रहार तालुका अध्यक्ष पदाधिकारी यांनी संजय गांधी विभागीय व पुरवठा अधिकारी यांच्या कार्यालयात छोट्या खानी भिंतींच्या घड्याळी सहभेट आठवण म्हणून भेट दिली.

यावेळी नायब तहसीलदार संतोष कामटेकर, विनोद चव्हाण, कारकुन दत्ता, पाटील गिरे, व नव्याने रुजू झालेले शिवचरणं भायेगावे, यासह प्रहार ता.प्रमुख अनिल शेट्टे पा,प्रहार कार्यक्रर्ते उपस्थित होते.

# हैदराबाद मुक्ती संग्रामाचा लढा हा सुट्या-सुट्या पद्धतीने लढल्या गेला : तात्यासाहेब देशमुख

**तभा वृत्तसेवा**
**बिलोली,दि. ३१ जानेवारी**

हैदराबाद मुक्तिसंग्रामातील महत्वपूर्ण वैशिष्ट्य आहे की, हा लढा सुट्या- सुट्या पद्धतीने लढल्या गेला. याचबरोबर नांदेड जिल्ह्यातील उमरी तालुक्यातील बँक लूट प्रकरणानंतर मराठवाडा मुक्ती संग्रामातील योद्धांना अपराधी ठरविण्यात येत असल्याकारणाने, यातील योद्धांनी आपली कामगिरी न सांगता मौन धारण करणे योग्य समजले. यामुळे या लढ्यातील अनेक महत्त्वपूर्ण स्वातंत्र्य सैनिक अज्ञात राहिले. असे प्रतिपादन ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते तात्यासाहेब देशमुख यांनी केले. ते अर्जापूर (ता. बिलोली) येथे आयोजित कार्यक्रमात प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते.

दिनांक ३० जानेवारी अर्जापूर येथील कै.जयराम अंबेकर विद्यालयात राष्ट्रपिता महात्मा गांधी यांची पुण्यतिथी व हुतात्मा दिनाचे पुण्यस्मरण याचे औचित्य साधून गाथा हैदराबाद मुक्तिसंग्रामाची याबाबत विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष आंतरभारती शिक्षण संस्थेचे अध्यक्ष तथा माजी आमदार गंगाधररावजी पटणे होते तर प्रमुख व्याख्याते तात्यासाहेब देशमुख हे होते. यावेळी ज्येष्ठ पत्रकार तथा प्रमुख समन्वयक प्रश्न सिमावर्ती भागाचे..! श्री गोविंद मुंडकर, पानसरे महाविद्यालयाचे मराठी विभागाचे प्रा.डॉ.गोपाळ चौधरी, पंचायत समितीचे माजी सभापती व्यंकट पांडवे, गंगाधर कल्याणकर बिलोली, देगलूर महाविद्यालय देगलूरचे निवृत्त प्राध्यापक



बाबुराव उप्पलवार, बिलोलीचे माधव फुलारी, प्रशालेचे मुख्याध्यापक सुभाष देगलूरकर यांची विशेष अतिथी म्हणून उपस्थिती होती.

तात्यासाहेब पुढे म्हणाले की, हैदराबाद मुक्तिसंग्रामासाठी लढलेल्या हुतात्म्यांच्या आठवणीसाठी, मराठवाड्यात ७१ हुतात्मा स्मारके आहेत. जवळपास सर्व हुतात्मा स्मारकांच्या परिसरात १७ सप्टेंबर १९९८ ते २ ऑक्टोबर १९९८ या काळात सभा घेऊन, जागर यात्रा काढण्यात आली. या यात्रेतील तीन संयोजकापैकी मी एक संयोजक होतो. गोविंदराव मुंडकर यांच्या वडिलाप्रमाणे माझे वडील चळवळीतील स्वातंत्र्य योध्ये होते. पी व्ही नरसिंहराव सरकारने या लढ्याला स्वातंत्र्याचा लढा म्हणून घोषित केले होते. याचा आम्हाला मनस्वी आनंद झाला. हुतात्म्यांच्या कार्याला, त्यांच्या बलिदानाला मोठ्या कालखंडानंतर न्याय मिळाल्यामुळे, अशा विषयाच्या अनुषंगाने आमच्या तीन संस्था एकत्र येऊन ही यात्रा काढली होती. तात्यासाहेब देशमुख यांनी रजाकराच्या अत्याचारा विरोधात सर्वच जाती - धर्मातील लोक आपापल्या कुवत क्षमतेप्रमाणे विरोध कसे करत होते. हे स्पष्ट करतानाच, या लढ्यातील पहिले हुतात्मा गोविंदराव पानसरे हे होते तर शेवटचे हुतात्मा शोहेबूल्लाह असल्याचे त्यांच्या कार्यासह स्पष्ट केले. मुस्लिम समाजातील शोहेबूल्लाह हे परखड लिखाणाने, पत्रकारितेच्या माध्यमातून निजामाला कसे विरोध केले या व अन्य अनभिज्ञ विषयावर अभ्यासपूर्ण प्रकाश टाकला. कार्यक्रमाच्या सुरुवातीस महात्मा गांधी यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी तात्यासाहेब देशमुख यांनी हैदराबाद मुक्तिसंग्रामातील आठवणी सांगतानाच निबंध स्पर्धा आयोजित करण्याविषयी सुचवून, पुरस्काराची घोषणा केली. माजी आमदार गंगाधरराव पटणे यांनी म्हाळप्पा पटणे, संतराम कागठीकर यांच्या कार्याविषयी उपस्थितांना जाणीव करून दिली.प्रा. डॉ. गोपाळ चौधरी यांनी यावेळी स्वच्छता, सत्य याचे जीवनातील महत्त्व विशद करून सांगितले. यावेळी गोविंद मुंडकर, व्यंकट पांडवे यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. यावेळी एक मिनिट स्तब्ध राहून हुतात्म्यांना आदरांजली व्यक्त करण्यात आली. अध्यापक पवार यांनी केले. सौ स्वामी यांनी सर्वांचे आभार मानले. याप्रसंगी मोरे,बाळके, भीमराव बडूरकर, बसवंत मुंडकर यासह बिलोली, देगलूर अर्जापूर येथील नागरिक, विद्यार्थी- विद्यार्थिनी मोठ्या प्रमाणात उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुयोग्य सूत्रसंचालन अध्यापिका मुंगडे यांनी केले. राष्ट्रगीत आणि कार्यक्रमाचा समारोप झाला.

# नैसर्गिकरित्या पिकवलेले अन्न सेवन करणे खूप महत्त्वाचे जिल्हाधिकारी अभिजीत राऊत

**तभा वृत्तसेवा**
**सोनखेड,दि. ३१ जानेवारी**

दापशेड येथील शेतकरी विश्वनाथ गोविंदराव होळगे यांच्या आर्या नैसर्गिक शेतीमध्ये जिल्हाधिकारी राऊत साहेब यांनी रात्री सात पर्यंत आर्या नैसर्गिक शेती मध्ये रमले. जिल्हाधिकारी साहेब यांचे आर्या नैसर्गिक शेतीमध्ये आगमन झाल्या नंतर सुरुवातीला त्यांचं विश्वनाथ गोविंदराव होळगे यांच्या कुटुंबातर्फे साहेबांचं औक्षन करण्यात आले. त्यानंतर मा. जिल्हाधिकारी साहेब यांनी आर्या नैसर्गिक शेतीच्या सर्व पिकाची पाहणी केली नंतर जीवामृत घनामृत दशपर्णी अर्क विविध प्रकारचे टॉनिक कशी बनवतात हे सर्व मा. विश्वनाथ होळगे यांच्या मार्फत निरिक्षण केले. सर्व आलेले पाहुणे चिंचेच्या झाडाखाली स्थानापन्न झाली .आर्या नैसर्गिक शेतीच्या कुटुंबाच्या वतीने मा. जिल्हाधिकारी साहेबांचा सत्कार करण्यात आला. त्यानंतर आर्या नैसर्गिक शेतकरी गट दापशेड यांच्यामार्फत मा. जिल्हाधिकारी साहेबांचा सत्कार करण्यात आला. प्रास्ताविक करताना विश्वनाथ होळगे यांनी आर्या नैसर्गिक शेती मधील गेल्या दहा वर्षापासूनचे अनुभव थोडक्यात व्यक्त केले. जिल्हाधिकारी साहेब यांनी सखोल असं मार्गदर्शन केलं.आर्या नैसर्गिक शेतीचे कार्य जिल्हा राज्य तथा देशपातळीवर गेले आहे. नैसर्गिकरित्या पिकवलेले अन्न सेवन करणे खूप महत्त्वाचा आहे व अशा शेतीच्या माध्यमातून हे ध्येय साध्य होताना दिसत आहे. मला या ठिकाणी येऊन खूप आनंद झाला असे मत मा. श्री अभिजीत राऊत साहेब जिल्हाधिकारी नांदेड यांनी व्यक्त केले.



**उमरी - तालुक्यातील बितनाळ येथिल केंद्रीय जि. प. शाळेत शिक्षण घेतलेली सायली लगदिवे यांचा नागपूर येथे एम .एम .बी एस साठी नंबर लागल्याने उमरी पंचायत समितीचे सभापती शिरीष देशमुख गोरठेकर , उदोजक मारोतराव कवळे गुरुजी , मुख्याध्यापक भगवान संपतवार , विस्तार अधिकारी शंकर बेळकोणे , केंद्रप्रमुख चाटोरीकर , सर्व शिक्षक गण , गावकरी यांच्या कडून भव्य सांस्कृतीक संप्तरंगी कार्यक्रमात कु . सायली लगदिवे सह त्यांचे आई - वडिल सौ .भाग्यश्री गंगाधर लगदिवे यांचा सत्कार करण्यात आला.**

# बारड नागेली नुतनीकरण रस्त्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाचे दुर्लक्ष ; पालकमंत्र्याकडे तक्रारीचे निवारण करण्यासाठी साकडे

**तभा वृत्तसेवा**
**मुदखेड,दि. ३१ जानेवारी**

बारड ते नागेली चार किमी रस्ता नूतनीकरणासाठी पालकमंत्री अतुल सावे यांच्या कडे भाजप कार्यकर्त्यांनी साकडे घातले असून यावेळी भाजप किसान मोर्चा जिल्हा उपाध्यक्ष भगवानराव पुयड यांनी रस्ता काम तातडीने मार्गी लागण्यासाठी निवेदन देऊन मागणी केली आहे अद्याप काम मार्गी लागले नसून सार्वजनिक बांधकाम विभागाचे याकडे दुर्लक्ष होत असल्याने नागरिकांकडून प्रशासनाच्या हलगर्जी कारभारावर संताप व्यक्त केला जात आहे.

मागील पाच वर्षापासून रस्ता नादुरुस्त स्थितीत असून रस्ता दुरुस्तीच्या नावाखाली अनेकदा देयक उचलण्यात आले आहेत परंतु रस्त्याची दुरुस्ती काही झाली नसल्याने रस्त्यावरील पंचक्रोशीतील रहदारीदार यांना




नेहमीचा त्रास बनला असल्याने या प्रकरणात रोष व्यक्त करण्यात येत आहे

बारड नागेली हा रस्ता शेतकऱ्यासाठी महत्त्वपूर्ण असून या ठिकाणी बागायतदार शेतकऱ्यांच्या मालाची वाहतूक करण्यासाठी एकमेव रस्ता असल्याने नादुरुस्त रस्त्यावर उसाचे डंपर केळीच्या गाड्या अनेकदा अपघात झाल्याच्या घटना घडल्या आहेत परंतु याकडे सार्वजनिक बांधकाम विभाग जाणून बुजून दुर्लक्ष करत असल्याने रस्ता नूतनीकरण कधी असा संतप्त सवाल नागरिक ग्रामस्थ यांच्याकडून उपस्थित होत आहे

नूतनीकरणासाठी खासदार अशोकराव चव्हाण यांच्या आदेशानुसार रस्ता नूतनीकरण फलकाचे अनावर पाच महिण्याखाली करण्यात आले आहे फलक ऊभा आहे परंतु अद्याप कामाची सुरुवात झाली नसल्याने रस्ता कधी होणार असा प्रश्न निर्माण झाला आहे. रस्त्याचे नुतनीकरण काम तातडीने चालू करून रस्ता दुरुस्ती काम वेगाने करुन देण्याची मागणी यावेळी भाजप किसान मोर्चा उपाध्यक्ष भगवानराव पुयड यांनी यावेळी पालकमंत्र्याकडे लेखी निवेदन देऊन केली आहे. रस्त्याचे तातडीने कामे सुरू झाली नसल्यास उपोषणाचा इशारा यावेळी निवेदनात देण्यात आला आहे.

# श्री संत निवृत्ती महाराज माध्यमिक विद्यालय, कंधार येथे वार्षिक स्नेहसंमेलन मेळावा

**तभा वृत्तसेवा**
**कंधार,दि. ३१ जानेवारी**

श्री संत निवृत्ती महाराज माध्यमिक विद्यालय, कंधार येथे वार्षिक स्नेहसंमेलन मेळाव्याचे आयोजन मोठ्या उत्साहात करण्यात आले. या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून श्री डॉ. स्वप्निल रणदिवे, खउउ क्लासेसचे संचालक आदित्य गव्हाणे सर, तसेच महाराष्ट्र ग्रामीण बँकेचे मॅनेजर शिरफुले साहेब उपस्थित होते.

या कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी विविध सांस्कृतिक आणि शैक्षणिक उपक्रमांमध्ये भाग घेतला. त्यांच्या उत्कृष्ट कामगिरीस प्रोत्साहन देण्यासाठी खउउ क्लासेस तर्फे विद्यार्थ्यांना विशेष भेटवस्तू प्रदान



करण्यात आल्या. विद्यार्थ्यांनीही या सन्मानाचा आनंद व्यक्त केला.प्रमुख पाहुण्यांनी मार्गदर्शनपर भाषणे देत विद्यार्थ्यांना शिक्षणासोबतच व्यक्तिमत्त्व विकासावर भर देण्याचा सल्ला दिला. आयोजक मंडळ, शिक्षकवृंद, पालक आणि विद्यार्थी यांच्या सहकार्याने हा कार्यक्रम यशस्वीपणे पार पडला.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी विद्यालयाचे शिक्षक, कर्मचारी, आणि विद्यार्थी यांचे विशेष सहकार्य लाभले. हा मेळावा विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी आणि आनंददायी ठरला. यावेळी शाळेचे मुख्याध्यापक श्री शिंदे सर,श्री नवनाथ तोरणे सर, श्री कल्याणकर सर, माझे सहकारी श्री गजानन पांचाळ सर, दीपक मुंडे, विष्णू घुगे, प्रेम कदम, गणेश उगले , श्री बालाजी देवकांबळे मामा उपस्थित होते!

## राष्ट्रसंत भगवान बाबा सभागृहाचे भूमिपूजन

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. ३१ जानेवारी**

शहरातील सिडको येथील कागणे नगर येथे राष्ट्रसंत भगवान बाबा सभागृह बांधकामाचे भूमिपूजन लक्ष्मण कागणे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी वंजारी संघाचे जिल्हाध्यक्ष संतराम गीते, शिवसेना जिल्हाध्यक्ष उमेश मुंडे, मनपाचे सह आयुक्त गिरीश कदम, अभियंता स्वामी, टाकळीकर, मुलंगे, भाजपा कार्यकर्ते राजेश केंद्रे, रमेश धात्रक आदींची उपस्थिती होती. राष्ट्रसंत भगवान बाबा सभागृहास मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडून दोन कोटींचा निधी आणल्याबद्दल शिवसेना जिल्हाप्रमुख उमेश मुंडे, सभागृहकरिता मोकळी जागा उपलब्ध करून दिल्याबद्दल ॲड. नितीन कागणे, आशिष बियाणी तसेच चार्टड अकाउंटंट करवा यांचे आभार व्यक्त करण्यात आले.

# न्यायाचार्य नामेदव शास्त्री धर्माच्या की अधर्माच्या बाजूने

# भगवानगडावरून मंत्री धनंजय मुंडेंची पाठराखण



**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.३१ जानेवारी**

वारकरी सांप्रदायातून सामाजिक भेदभाव दूर करून समाज एकसंघ ठेऊन समाजात सामाजिक स्वास्थ्याला आलेली मरगळ दूर करण्यासाठी संतांचे फार मोठे योगदान आहे. हे कधीच नाकारून चालणार नाही. याबद्दल कोणाचेच दुमत नाही. मात्र बीड जिल्ह्यात घडलेल्या सरपंच स्व.संतोष देशमुख यांची झालेली क्रूर हत्या यामुळे जिल्ह्यातील समाज मनामध्ये दरी निर्माण झाली आहे. ही दरी दूर व्हावी यासाठी संतांनी प्रयत्न करणे गरजेचे आहे. यामध्ये जातीपातीला संत संप्रदाय थारा देत नाही. मात्र राष्ट्रसंत भगवानबाबा यांच्या गादीवर बसून न्यायाचार्य नामदेव शास्त्री यांनी संतोष देशमुख यांच्या हत्येला जबाबदार असणाऱ्या प्रवृत्तीची उघडपणे पाठराखण करून वाईट प्रवृत्तीचे समर्थन केले आहे. तर ज्या वाईट प्रवृत्ती मंत्री धनंजय मुंडे यांच्या आश्रयाने सक्षम झाल्या आहेत त्यांनी ही हत्या घडवून आणली. याचे समर्थन कोणीच करू शकत नाही. त्यामुळे नामदेव शास्त्री यांनी राष्ट्रसंत भगवानबाबा यांच्या गडाचा उपयोग चुकीच्या प्रवृत्तींना पाठिशी घालण्यासाठी केला का ? असा प्रश्न निर्माण होत आहे.

आठरापगड जाती जमातीमधून नामदेव शास्त्री यांच्या विधानाचा निषेध होत आहे. या प्रकरणात धनंजय मुंडे हे दोषी नाहीत, त्यांच्या संदर्भात या प्रकरणात कुठलाही पुरावा नाही. त्यांच्या निकटवर्तीयांकडून सत्तेचा गैरवापर झाला. या अधिकाराचा वापर करण्यासाठी धनंजय मुंडेंची मूकसंमती होतीच ? त्याशिवाय संतोष देशमुख यांच्या हत्येतील आरोपी एवढी मजल मारू शकत नाहीत.

स्व.गोपीनाथ मुंडे यांनी आठरापगड जाती जमातीला सोबत घेऊन बीड जिल्ह्याचा विकास करण्याचे प्रामाणिक प्रयत्न केले. त्यांना जिल्हावासियांनी डोक्यावर घेतले. ते लोकनेते झाले. त्यांनी कधीच जातीयवाद केला नाही. जातीयवादाचे समर्थन केले नाही म्हणूनच ते लोकनेते झाले. मात्र त्यांच्या निधनानंतर न्यायाचार्य नामदेव शास्त्री यांनी गोपीनाथ मुंडे यांची कन्या पंकजा मुंडे यांना गडाचे दरवाजे बंद करून काय साध्य केले ? ते आज ठामपणे धनंजय मुंडे यांची बदनामी होऊ नये याच्यासाठी ठोकून पाठराखण करत आहेत. हा न्यायाचार्यांचा भेदभाव असल्याचे समोर येत आहे.

कोणताही संत एका जातीचा नसतो. भगवानबाबांचा शिष्य संप्रदाय आठरापगड जाती जमातीमध्ये आहे. भगवानबाबांना मानणारा मोठा वर्ग जिल्ह्यात व जिल्ह्याबाहेर आहे. मात्र न्यायाचार्य नामदेव शास्त्री यांनी असे वादग्रस्त विधान करून भगवानबाबा यांच्या कार्याची उंची छोटी केली आहे. संतांना सर्व जाती जमाती सारख्या असतात. सरपंच संतोष देशमुख यांची हत्या झाल्यानंतर त्यांच्या त्या कुटूंबाप्रती संवेदना व्यक्त करणे हे नामदेव शास्त्री यांचे धार्मिक, नैतिक काम होते. मात्र त्यांनी त्या घटनेबद्दल ब्र शब्द देखील काढला नाही. मात्र धनंजय मुंडे बदनाम होत असल्याची भिती वाटल्याने धनंजय मुंडे यांच्या सहकार्याच्या चुकीच्या प्रवृत्तीला खतपाणी घालण्याचे काम केले आहे ? हे नाकारून चालणार नाही असा भेदभाव संतांकडून अपेक्षित नाही. याबद्दल जनतेत उलटसुलट चर्चा आहे.

## संक्षिप्त वृत्त

### माजलगाव कृ.ऊ.बा.समितीचे कर्मचारी सुरेश टाकणखार सेवानिवृत्त



**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.३१ जानेवारी**

कृषी उत्पन्न बाजार समितीचे कनिष्ठ लिपिक सुरेश टाकणखार हे दिनांक ३१ जानेवारी २०२५ रोजी शासन नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झाले त्यांनी ३९ वर्ष सेवा दिली त्यांच्या निरोप समारंभाचा कार्यक्रम बाजार समिती कार्यालयामध्ये ३१ जानेवारी रोजी ०४: ०० वाजता संपन्न झाला या निरोप समारंभाला कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती जयदत्त (अण्णा) नरवडे,उपसभापती श्रीहरी (नाना) मोरे,संचालक नंदकिशोर सजगणे,अमोल जाधव बाजार समितीचे सचिव हरिभाऊ सवणे हे उपस्थित होते व यावेळी सुरेश टाकणखार यांचा आहेर व अंगठी देऊन सपत्नीक सत्कार करण्यात आला यावेळी सर्व अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.

### जि.प.प्रा. शाळा राजेगाव केंद्र-शिरूर (घाट) येथील स्तुत्य उपक्रम; आनंदनगरी उत्साहात साजरी

**तभा वृत्तसेवा**
**केज दि.३१ जानेवारी**

दि.३०-०१-२०२५ वार-गुरुवार रोजी प्रा.शा. राजेगाव येथे बाल आनंद मेळावा म्हणजेच आनंदनगरी मोठ्या उत्साहात संपन्न झाली.



या उपक्रमाचे उदघाटन शा.व्य. स.अध्यक्ष श्री. अनिस शेख व पालक,गावकरी यांच्या उपस्थितीत करण्यात आले.यावेळी तब्बल ३५ वेगवेगळ्या खाद्य पदार्थांचे स्टॉल्स विद्यार्थ्यांनी लावले होते.यामध्ये भेळ,वडापाव,उसळ,शाबू वडे,पोहे, चहा, पाणीपुरी, गुलाब जामुन, लाडू, मुरकुल, चॉकलेट , पाणीपुरी, मेंदू बालुशाही, वडा, इ.पदार्थ विक्रीसाठी होते.यादरम्यान खरेदी विक्रीतून अंदाजे ५ हजार ६ रुपयांची उलाढाल होईल.

या आनंदनगरी मध्ये मुलांना प्रोत्साहन देण्यासाठी बहुतांश ज्येष्ठ नागरिक,पालक,गावकरी,शिक्षणप्रेमी नागरिक यांनी सहभाग नोंदविला.सदरील कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मु.अ. मोराळे मॅडम, सहशिक्षिका काळे मॅडम, ट्रेनी शिक्षिका पुनम कदम मॅडम, यांनी परिश्रम घेतले व एक कल्पक आणि विद्यार्थ्यांचे व्यवहार ज्ञान, उत्साह वाढविणारा कार्यक्रम घेतला.

### पुष्पलता देशमुख यांचे निधन

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.३१ जानेवारी**



येथील गुजराती कॉलनी भागातील ज्येष्ठ नागरिक पुष्पलता लक्ष्मीकांत देशमुख (वय ६८) यांचे ३० जानेवारी रोजी सकाळी ११ वाजेच्या सुमारास अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर मोंढा रोडवरील अमरधाम येथे रात्री अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात दोन मुले, एक मुलगी, जावई, सुना, नातवंडे असा परिवार आहे. लोकमत बीड कार्यालयातील आयसीडी विभागाचे शामसुंदर देशमुख यांच्या त्या आई होत.

### आ नमिताताई मुंदडा यांच्या माध्यमातून आज पर्यंत चिंचोली (माळी) ला

## एक कोटी पेक्षा जास्त निधी; सुनिल गलांडे



**तभा वृत्तसेवा**
**केज दि.३१ जानेवारी**

केज विधान सभेच्या आमदार नमिताताई अक्षय मुंदडा यांच्या माध्यमातून चिंचोलीमाळी येथे तीर्थक्षेत्र विकास योजनेतून, उर्दू शाळेला २ वर्गखोल्या, विविध भागातील सिमेंट रस्ते व सभागृह या साठी आता पर्यंत एक कोटी पेक्षा जास्त रुपयाचा निधी त्यांनी चिंचोली माळी गावासाठी दिला असून त्यांच्याच माध्यमातून महादेव मंदिरासमोर सात लाख रुपयाच्या सभागृहाचे भूमिपूजन भाजपाचे नेते सुनिल गलांडे यांचे हस्ते शुक्रवारी सकाळी १० वाजता करण्यात आले. यावेळी त्यांनी आ नमिताताई अक्षय मुंदडा, व भाजपाचे जेष्ठ नेते नंदकिशोर काकाजी मुंदडा यांचे आभार मानून त्यांना धन्यवाद दिले.

यावेळी बोलताना सुनील आबा गलांडे म्हणाले की ,आज पर्यंत आ नमिताताई अक्षय मुंदडा यांच्या विकास निधीतून तीर्थ क्षेत्र विकास निधीतून श्री संत नामदेव महाराज मंदिरासमोरील सभागृह, मुस्लिम समाजाच्या विध्यार्थ्यांसाठी उर्दू शाळेच्या २ वर्ग खोल्याचे बांधकाम, दलित वस्ती सह विविध भागातील सिमेंट रस्ते, काळे वस्तीवरील मुंजाबा मंदिरासमोर सभागृह आणि महादेव मंदिरा समोरील सभागृहासाठी सात लाख रुपयाचा निधी असा एकूण १ कोटी पेक्षा जास्त विकास निधी चिंचोलीमाळी च्या विकासासाठी आ नमिताताई अक्षय मुंदडा यांनी दिला आहे. शुक्रवारी सकाळी १० वाजता महादेव मंदिरासमोरील सभागृहाचे भूमिपूजन भाजपाचे जेष्ठ नेते सुनिल गलांडे यांचे हस्ते श्रीफळ फोडुन करण्यात आले. यावेळी बोलताना त्यांनी चिंचोलीमाळी च्या विकासासाठी भरघोष निधी दिल्याबद्दल तसेच चिंचोली माळी - सारुकवाडी- डोका, - हादगाव - लाखा हा रोड खराब झाल्यामुळे या रस्त्याच्या सिमेंट रोड साठी बारा कोटी रुपये निधी आमदार नमीताताई अक्षय मुंदडा यांच्या माध्यमातून उपलब्ध झाला असून त्याचे टेंडर झाले आहे लवकरच या रोडचे उद्घाटन करण्यात येणार आहे. लाईट चा प्रश्न असो, दवाखान्याचे काम असो आ नमिताताई अक्षय मुंदडा व भाजपाचे जेष्ठ नेते नंदकिशोर काकाजी मुंदडा हे गोरगरीब सामान्य माणसाला सतत मदत करत असतात.म्हणून आ नमिता ताई अक्षयजी मुंदडा व जेष्ठ नेते नंदकिशोरजी मुंदडा काकाजी यांचे आभार मानून त्यांना धन्यवाद दिले.

या प्रसंगी भाजपचे ज्येष्ठ नेते सुनीलआबा गलांडे, चेअरमन अरुण तात्या काळे, उपसरपंच धीरज वनवे, ग्रामपंचायत सदस्य, अशोक शिंदे, ग्रामपंचायत सदस्य माणिक गालफाडे, दिपक शिंदे, दगडु दळवे, दिलीप गायकवाड, चंद्रकांत भुजबळ, रविंद्र गलांडे तर मधुकर निंगुळे, सुनील नखाते, सुरज सारुक, अशोक राऊत, दत्ता काळे, मनोज गालफाडे, राजाभाऊ नखाते, संदिप राऊत, विष्णू काळे, जालिंदर गलांडे, राजा सुतार, संजय शिंदे, अवधूत माने, गोरख काळे, ज्ञानोबा घोडके, चांद सय्यद, दत्तु नखाते,नाना नेमट,मोहन नखाते, नंदकुमार घुंबरे सुनील नखाते, चंद्रकांत पवार, जनार्दन केंद्र, बिभीषण गायकवाड, चंद्रकांत घोडके, कृष्णा पवार, संदिप शिंदे, श्रीकृष्ण मगर, अनिल शिंदे, भगवान हुंबे, जितेंद्र शिंदे, महादेव नखाते, मोहन नखाते, प्रल्हाद सोळंके, अशोक पवार, आबा गलांडे, संदिप राऊत, श्रीकांत शिंदे, रामेश्वर चिंचोलकर व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## धारूर तालुक्यात राष्ट्रीय रोजगार हमी योजनेचा गैरवापर, शेतकऱ्यांचे नुकसान

**तभा वृत्तसेवा**
**धारूर दि.३१ जानेवारी**

धारूर तालुक्यात राष्ट्रीय रोजगार हमी योजनेअंतर्गत अल्पभूधारक शेतकऱ्यांना विहिरी मंजूर करण्याच्या नावाखाली मोठ्या प्रमाणात घूसखोरी होत असल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. या प्रकरणात शेतकऱ्यांना विहीर मंजूरीसाठी, कामाच्या प्रत्येक टप्प्यावर आणि काम पूर्ण झाल्यानंतरही अधिकारी-कर्मचाऱ्यांना मोठ्या प्रमाणात पैसे द्यावे लागत असल्याचे उघड झाले आहे.



या प्रकरणी भोगाव्या लागणाऱ्या शेतकऱ्यांच्या मते, विहीर मंजूरीसाठी ४ लाख रुपयांची विहीर मंजूर करण्यासाठी अधिकारी-कर्मचारी यांना १५ हजार रुपये द्यावे लागत आहे. त्यानंतर विहीर कामाच्या प्रत्येक टप्प्यावर शेतकऱ्यांना २ ते ३ हजार रुपये द्यावे लागतात आणि काम पूर्ण झाल्यानंतरही १५ ते १८ हजार रुपये द्यावे लागतात. यात रोजगार सेवक, अभियंता, गटविकास अधिकारी अशा सर्वच अधिकारी-कर्मचारी या घूसखोरीत सहभागी असल्याचा आरोप आहे.

पैसे न देणाऱ्या शेतकऱ्यांचे विहीर कामे अडकून पडत असून, पंचायत समितीचे अधिकारी या सर्व प्रकारांकडे दुर्लक्ष करत असल्याचा आरोप आहे. यामुळे शेतकऱ्यांना विहीर पूर्ण करण्यासाठी दलालांची मदत घ्यावी लागत असून, वर्षानुवर्षे विहीर कामे अर्धवट पडून आहेत. अधिकारी-कर्मचारी शेतकऱ्यांना चुकीची माहिती देत असल्याने शेतकऱ्यांमध्ये संताप व्यक्त होत आहे.

या प्रकरणी शेतकरी सरकारकडे कडक कारवाईची मागणी करत आहेत. शेतकऱ्यांची ही वेदना पाहता या प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषी अधिकारी-कर्मचाऱ्यांवर कठोर कारवाई करणे गरजेचे आहे. तसेच, शेतकऱ्यांना मिळणारी मदत थेट त्यांच्या खात्यात जमा करण्याची व्यवस्था करणे आवश्यक आहे.

धारूर तालुक्यात राष्ट्रीय रोजगार हमी योजनेचा गैरवापर होत असल्याचे या प्रकरणातून स्पष्ट झाले आहे. यामुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होत आहे. सरकारने या प्रकरणाकडे गांभीर्याने लक्ष देऊन त्वरित उपाययोजना करणे आवश्यक आहे.

रोजगार हमी योजनेत काही चुकीचे प्रकार घडत असल्याची मला माहिती मिळाली आहे. याबाबत मी लवकरच बैठक घेणार आहे. या बैठकीत सर्व कर्मचाऱ्यांना स्पष्ट सूचना दिल्या जातील. यानंतर असे प्रकार पुनरावृत्त होऊ नयेत, याची सर्वांनी काळजी घ्यावी. - वैजनाथ लोखंडे, गटविकास अधिकारी, धारूर

### अॅनेमिया मुक्त भारत कार्यक्रम राबविण्यासाठी आरोग्य विभाग प्रयत्नशील असून राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून यशस्वी करु-डॉलक्ष्मण मोरे

**तभा वृत्तसेवा**
**परळी वैद्यनाथ दि.३१ जानेवारी**



भारत सरकारच्या वतीने संपूर्ण देशात अॅनेमिया मुक्त भारत अभियान राबविण्यात येत आहे. अॅनेमिया मुक्त भारत कार्यक्रम राबविण्यासाठी आरोग्य विभाग प्रयत्नशील असून राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून यशस्वी करु असे प्रतिपादन तालुका आरोग्य अधिकारी डॉ लक्ष्मण मोरे यांनी केले. तर मोबाईल शाप नाही तर योग्य वापर केला तर ते योगदान आहे असे प्रा डॉ बाबासाहेब शेप यांनी सांगितले. सेलू परळी येथे आयोजित करण्यात आलेल्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या शिबीराच्या समारोपात ते बोलत होते.

लक्ष्मीबाई देशमुख महिला महाविद्यालयाच्या वतीने सेलू परळी येथे २३ ते २९ राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने विशेष युवती शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. समारोप कार्यक्रमाच्या सुरुवातीला संस्थेचे सचिव रवींद्र देशमुख, कोषाध्यक्ष प्रा प्रसाद देशमुख, प्राचार्या डॉ विद्या देशपांडे, डॉ लक्ष्मण मोरे, रामचंद्र (बाळू) फड, प्रा डॉ लक्ष्मण मुंडे, विष्णू मुंडे या मान्यवरांच्या हस्ते क्रांती ज्योती सावित्रीबाई फुले, गाडगे बाबा, श्यामराव देशमुख यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. यावेळी सात दिवशीय शिबीरात उत्कृष्ट कार्य केलेल्या स्वयंसेवक विद्यार्थिनी नेतल शर्मा, गौरी पुजारी, आदिती फड, आरती वाघमारे यांचा मान्यवरांच्या हस्ते स्मृती चिन्ह व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी स्वयंसेवक विद्यार्थिनीनी मनोगते व्यक्त केले. पुढे बोलताना डॉ मोरे यांनी सांगितले की, राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून राष्ट्र सेवा केली जाते. राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी अॅनेमिया मुक्त भारत कार्यक्रम राबविण्यासाठी आरोग्य विभागास मदत करावी, आजच्या काळात शासनाच्या सर्व विभागात डिजिटलचा उपयोग होत आहे.

## परळी औष्णिक केंद्राच्या अधिकाऱ्यांनी केली गावकऱ्यांची दिशाभूल- ग्रामस्थ

### दाऊदपूरचा बेरोजगार आत्मदहन करणार तर ग्रामस्थांचे पुन्हा आमरण उपोषण

**तभा वृत्तसेवा**
**परळी वैद्यनाथ दि.३१ जानेवारी**

परळी तालुक्यातील दाऊदपूर येथील प्रदूषण बाधीत स्थानिक नागरीकांना शंभर टक्के कोटा ठरवून दिलेला बेसिक दर ७५ रूपये टन दराने पाऊंड अॅश (राख) उचलण्याची परवानगी मिळावी या मागणीसाठी उपोषण करण्याचा इशारा दिला आहे. तर दुसरीकडे स्थानिक लोकांना डावलून परळी औष्णिक विद्युत केंद्राच्या प्रशासनाने आपल्या आश्वासनावर खरे उतरले नाही. यामुळे प्रदुषण बाधीत गावातील शेकडो बेरोजगार झाले आहेत. त्यामुळे येत्या सहा फेब्रुवारी रोजी परळी औष्णिक विद्युत केंद्राच्या युनिट ६/७समोर आत्मदहन करण्याचा इशारा राम सलगर यांनी दिला आहे. त्यामुळे परळीत पुन्हा एकदा खळबळ उडाली आहे. त्यामुळे औष्णिक विद्युत केंद्राच्या प्रशासनाने या गंभीर बाबीची नोंद घेऊन तात्काळ मागण्या मान्य कराव्यात असे निवेदन दिले आहे.

परळी औष्णिक विद्युत कें द्राच्या प्रशासनाला वेळोवेळी मौजे दाऊदपूर प्रक्षण बाधीत राख नियंत्रण कृती समितीने निवेदन देऊन सदरील पौंडश टेंडर प्रक्रिया रद्द करावी. शंभर टक्के कोटा ठरवून दिलेला बेसिक दर ७५ रूपये प्रमाणे पौंड अॅश उचलण्याची परवानगी द्यावी. २३ जानेवारी २०२५ रोजी काढण्यात आलेल्या जाहीर सूचना तात्काळ रद्द कराव्यात.

सुधारीत जाहीर सूचना फक्त राख प्रदुषण बाधीत दाऊदपूरासाठी निविदा काढावी. दाऊदपूर गावाच्या विकासासाठी सीएसआर निधी उपलब्ध करून द्यावा. नसता ४ फेब्रुवारी रोजी येथील ग्रामस्थ सामूहिक आमरण उपोषण करण्याचा इशारा देत असताना काल दाऊदपूर येथील बेरोजगार राम सलगर यांनी परळी औष्णिक विद्युत केंद्र यांच्या अधिकाऱ्याने राख नियंत्रण कृती समितीची दिशाभूल केली आहे. प्रमुख

मागण्या मान्य करण्याचे आश्वासन या अगोदरच्या अधिकाऱ्याने दिले असताना अचानकपणे वेगळीच निविदा प्रक्रिया राबवून स्थानिक दाऊदपूर प्रदुषण बाधीत गावांना डावलण्याचा प्रयत्न केला आहे. त्यामुळे राम सलगर यांनी उपविभागीय अधिकारी यांना निवेदन देऊन ६ फेब्रुवारी २०२५ रोजी औष्णीक विद्युत केंद्र युनिट ६/७गेटसमोर आत्मदहन करण्याचा इशारा दिला आहे. त्यामुळे परळीत पुन्हा एकदा खळबळ उडाली आहे. सदरील निविदा प्रक्रिया राबविताना नवीन आलेल्या अधिकारी, कर्मचाऱ्यांनी कोणत्या नियमाचे कायद्याचे पालन केले याची चौकशी होणे गरजेचे असल्याची चर्चा या आंदोलनाच्या माध्यमातून होत आहे.